सोलापूर
# तरुण भारत
SOLAPUR TARUN BHARAT
न मे कर्मफले स्पृहा
सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहिल्यानगर व सातारा येथून वितरित
सोलापूर | शुक्रवार, ३१ जुलै २०२६ । युगाब्द ५१२८ । वर्ष ४२ वे अंक २४३ । पाने १२ । किंमत रु. ८/-
| RNI Regd. No. 46878/87 | Postal Regd No.. SLP/32/2024-2026. Posted daily at Medical college, Solapur.P.O. |
ही आमची ई-पेपर आवृत्ती असून ती 'तरुण भारत'च्या छापील आवृत्तीची प्रतिकृती नाही
dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com

## विचारपुष्प



ही मातृभूमी आमची माता आहे आणि आम्ही तिचे पुत्र आहोत. ती आम्हा सर्वांना सोबत घेऊन चालणारी संस्कृती आहे आणि याच संस्कृतीसमान या मातृभूमीसाठी, तिच्या रक्षणासाठी ज्यांनी आपले प्राण दिले, लढा दिला आणि संघर्ष केला, ते सर्व लोक आपले पूर्वज आहेत.

**– स्व. कुप्प. सी. सुदर्शनजी**
रा. स्व. संघाचे पाचवे सरसंघचालक

## महत्त्वाचे

### चढ-उतारांनंतर सेन्सेक्स वधारला

**मुंबई :** शेअर बाजारात गुरुवारी मोठ्या प्रमाणात चढ-उतार पाहायला मिळाले. आयटी क्षेत्रातील शेअर्समध्ये झालेल्या खरेदीच्या जोरावर भारतीय शेअर बाजारातील प्रमुख निर्देशांकांनी व्यवहाराच्या शेवटी वाढ नोंदवली. रिअल्टी, कॅपिटल गुड्स, हेल्थकेअर आणि काही मोठ्या कंपन्यांच्या शेअर्समध्ये झालेल्या विक्रीमुळे बाजारातील ही वाढ काही प्रमाणात मर्यादित राहिली. दिवसभराच्या व्यवहारानंतर सेन्सेक्स २७३.५५ अंकांनी म्हणजेच ०.३५ टक्क्यांनी वाढून ७७,९२८.१५ वर बंद झाला.

# महाराष्ट्र-कर्नाटकचा संपर्क तुटला

### चिंचपूर बंधारा पाण्याखाली बुडाला

**तभा वृत्तसेवा,**
**द. सोलापूर, दि. ३० जुलै-**

पुणे जिल्ह्यातील मुसळधार पावसाने उजनी धरण ओव्हरफ्लो झाले. त्यामुळे भीमा नदीपात्रात हजारो क्युसेक पाण्याचा विसर्ग झाल्याने भीमा नदीने रौद्ररुप धारण केला आहे. या महापुरात भीमा नदीवरील अनेक बंधारे पाण्याखाली गेले. दक्षिण सोलापूरच्या चिंचपूर बंधाऱ्यावरून पाणी वाहत असल्याने बंधारा पूर्णपणे बंद झाला आहे. यामुळे महाराष्ट्रातील चिंचपुर परिसरासह कर्नाटकातील अनेक गावांचा संपर्क तुटला आहे.

मंद्रुपचे तहसीलदार विष्णू बुटे, पोलिस निरीक्षक शंकर पटवारी, सहाय्यक पोलिस निरीक्षक देविदास करंडे, पोलिस उपनिरीक्षक राज डांगे, अमितकुमार करपे यांनी घटनास्थळी जावून पाहणी केली. बंधाऱ्यावरील वाहतूक पूर्णपणे बंद करण्यात आली असून नदीकाठच्या गावांना सतर्क राहण्याचे आवाहन करण्यात आले.



# लोकपरीक्षा विधेयकाला राज्यसभेचीही मंजुरी


### आठ तास वादळी चर्चा; वंदे मातरम्ही पारित

**नवी दिल्ली, ३० जुलै**

लोकसभेनंतर गुरुवारी राज्यसभेनेही लोकपरीक्षा (अनुचित प्रकाराला आळा घालणे) दुरूस्ती विधेयकाला मंजुरी दिली आहे. सभागृहात तब्बल आठ तास वादळी चर्चा झाल्यानंतर विधेयक संमत झाले. संसदेच्या दोन्ही सभागृहांची

मंजुरी विधेयकाला मिळाली असून राष्ट्रपतींच्या स्वाक्षरीनंतर विधेयकाचे कायद्यात रुपांतर होणार आहे. सरकारच्या वतीने केंद्रीयमंत्री डॉ. जितेंद्र सिंह विधेयकावर उत्तर देण्यासाठी उभे राहिले असता विरोधकांनी गोंधळ घालत सभात्याग केला.

वंदेमातरमचा अनादर करणाऱ्यांना शिक्षेची तरतूद असलेल्या राष्ट्रीय गौरव अपमान निवारण दुरुस्ती विधेयक म्हणजे वंदेमातरम विधेयकाला गुरुवारी संसदेची मान्यता मिळाली. आता हे विधेयक स्वाक्षरीसाठी राष्ट्रपतींकडे पाठवले जाणार आहे.



मनुस्मृतीबाबतच्या खडगे यांच्या विधानावरून

गदारोळ मनुस्मृतीबाबत विरोधी पक्षनेते

मल्लिकार्जुन खडगे यांनी केलेल्या विधानावरुन गुरुवारी राज्यसभेत गदारोळ उडाला. यावरुन काँग्रेस आणि सत्ताधाऱ्यांमध्ये शाब्दिक चकमकही उडाली. लोकपरीक्षा दुरुस्ती विधेयकावर चर्चा सुरु असतांना खडगे यांनी अभ्यासक्रमातील बदलाचा मुद्दा उपस्थित केला. शुद्राच्या तोंडून वेदपठण ऐकतांना त्याचे कान शिसे आणि जस्ताने भरुन टाकावे, असा भाग समाविष्ट केल्याचा आरोप खडगे यांनी केला.

## आंदोलकांवर कारवाई नाही

**नवी दिल्ली, ३० जुलै**

जंतर मंतरवरील आंदोलनात सहभागी झालेल्यांना दिल्ली सरकारने मोठा दिलासा देणारा एक महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. सरकारच्या निर्णयानुसार, आंदोलनात सहभागी झालेल्यांवर कोणतीही प्रतिकूल किंवा दंडात्मक कायदेशीर कारवाई केली जाणार नाही. परिस्थिती सामान्य करण्याच्या आणि व्यवस्थेवरील नागरिकांचा विश्वास पुन्हा प्रस्थापित करण्याच्या दिशेने हे एक महत्त्वपूर्ण पाऊल मानले जात आहे. सरकारने सांगितले की, कारवाईपासून मिळणारे हे संरक्षण सर्वांसाठी नाही. न्यायालयाच्या निर्देशांनुसार पूर्वी गुन्हेगारी पृष्ठभूमी असलेल्या व्यक्तींना या निर्णयांतर्गत कोणतीही सवलत किंवा संरक्षण दिले जाणार नाही.

# व्यसनाधीनता देशाला पोखरण्याचे षडयंत्र

### जाळे उद्ध्वस्त करणार : मुख्यमंत्री

**मुंबई, ३० जुलै**

भारत आज वेगाने महासत्तेकडे वाटचाल करत असून, थेट युद्धात भारताला हरवणे शक्य नसल्याने आता शत्रूने छुप्या युद्धाचा मार्ग अवलंबला आहे. देशाच्या तरुण पिढीला अमली पदार्थांच्या (ड्रग्स) विळख्यात अडकवून भारताला आतून पोखरण्याचे हे मोठे षडयंत्र आहे. मात्र, छत्रपती शिवरायांच्या 'गनिमी काव्या'चा वापर करून हे अमली पदार्थांचे जाळे आपण निश्चितपणे नेस्तनाबूत करू, असा ठाम विश्वास राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला.

मुंबईत आयोजित नशामुक्त मुंबई अभियानाच्या शुभारंभ आणि शपथग्रहण सोहळ्यात ते बोलत होते. यावेळी शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना अमली पदार्थांपासून दूर राहण्याची आणि इतरांनाही परावृत्त करण्याची सामूहिक शपथ देण्यात आली. या कार्यक्रमाला मंत्री मंगलप्रभात लोढा, अधिकारी यांच्यासह हजारो विद्यार्थी उपस्थित होते.



**'नशामुक्त मुंबई' अभियानात बोलताना मुख्यमंत्री**

उपस्थित तरुणाईला मार्गदर्शन करताना फडणवीस म्हणाले की, आज आपला भारत अंतराळ, संरक्षण आणि कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) अशा प्रत्येक क्षेत्रात गरुडझेप घेत आहे. ◂ (तभा वृत्तसेवा)

## तुकाराम मुंढेंविरोधात २९ कर्मचाऱ्यांची तक्रार

**मुंबई, ३० जुलै**

अन्न भेसळविरोधी धडक कारवायांमुळे चर्चेत असलेले अन्न व औषध प्रशासन (एफडीए) आयुक्त तुकाराम मुंढे आता विभागातील अंतर्गत वादामुळे चर्चेत आले आहेत. छत्रपती संभाजीनगर येथील राज्य अन्न व औषध प्रशासन प्रयोगशाळेतील २९ अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी त्यांच्या कार्यपद्धतीविरोधात अन्न व औषध प्रशासन मंत्री नरहरी झिरवळ यांच्याकडे लेखी तक्रार केली आहे. वाढीव कामाचा ताण, दोन शिफ्टची कार्यपद्धती आणि सुट्टीच्या दिवशीही काम करण्याच्या आदेशाला त्यांनी विरोध करत तीव्र नाराजी व्यक्त केली.



झिरवळ यांच्याकडे केलेल्या तक्रारीत कर्मचाऱ्यांनी म्हटले की, प्रयोगशाळेत अचानक दोन शिफ्टमध्ये काम सुरू करण्याचा निर्णय घेण्यात आला. मात्र, त्यासाठी आवश्यक मनुष्यबळ, तांत्रिक सुविधा आणि संसाधने उपलब्ध करून देण्यात आली नाही. त्यामुळे विद्यमान कर्मचाऱ्यांवर अतिरिक्त कामाचा भार पडत असून सकाळी ९ वाजतापासून रात्री उशिरापर्यंत काम करावे लागत आहे. शनिवार, रविवार आणि सार्वजनिक सुट्टीच्या दिवशीही काम करण्याचे आदेश देण्यात आल्याने कर्मचाऱ्यांच्या आरोग्यावर परिणाम होत आहे. वाढीव कामासाठी आवश्यक सुविधा किंवा अतिरिक्त मनुष्यबळ न देता कामकाज वाढविण्यात आल्याने कर्मचाऱ्यांमध्ये असंतोष असल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले. तक्रारीवर मंत्री झिरवळ किंवा एफडीएकडून अद्याप अधिकृत प्रतिक्रिया आलेली नाही.

◂ (वृत्तसंस्था)



सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## महत्वाचे...



## राष्ट्ररत्न फाउंडेशनतर्फे गुरु पौर्णिमेनिमित्त आई-वडिलांचे पूजन

**सोलापूर दि. ३० जुलै-**

आई-वडील हेच जीवनातील पहिले गुरु असून त्यांचा सन्मान करणे हीच खरी गुरु पौर्णिमा आहे, हा प्रेरणादायी संदेश देत राष्ट्ररत्न सोशल फाउंडेशन, सोलापूर यांच्या वतीने गुरु पौर्णिमेनिमित्त संस्कारमय कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या उपक्रमात आई-वडिलांचे पूजन करून त्यांच्या चरणी वंदन करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी राष्ट्ररत्न सोशल फाउंडेशनच्या संस्थापक अध्यक्षा प्रांजली मोहीकर या होत्या. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून, निवृत्त प्राचार्य पाटील, गौरीशंकर घेवारे उपस्थित होते तसेच संस्थेचे अध्यक्ष प्रांजली मोहीकर, उपाध्यक्ष प्रा. प्रेमचंद मेने, विश्वस्त ज्योती मेने, शैलेश मोहीकर, वेदांत मोहीकर, स्वप्निल मेने यांची विशेष उपस्थिती होती. संस्थेचे सदस्य व पदाधिकारी, अनुराधा निकम, वैशाली गायकवाड, प्रकाश शिंपी, चंचला खरात, सुनिता कोरे, त्रिवेणी सुतार, शितल सोनवणे, पूजा पाटील, नम्रशी निकम, वैजयंती चिताघुरे, सारिका शेजाळ उपस्थित होते. सूत्रसंचालन प्रांजली मोहीकर यांनी केले, तर आभार आनंद खरात यांनी मानले.



## जिजामाता प्रशालेत वक्तृत्व स्पर्धा

**सोलापूर, दि. ३० जुलै-**

कोंडी येथील जिजामाता प्रशालेत संस्थाध्यक्ष सचिन ठोकळ आणि शिल्पा ठोकळ यांच्या प्रेरणेने व मुख्याध्यापक उदय जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली गुरुपौर्णिमेनिमित्त वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. स्पर्धेत यशस्वी ठरलेल्या विद्यार्थ्यांची नावे पुढील प्रमाणे- स्नेहल शिंदे, श्रेयस चट्टे, समर्थ भोसले, आरती कांबळे, विश्वजीत इंगळे, स्वाती निचरे, आरती वाघमारे, प्रगती भोसले, अर्पिता हुंडेकरी, आरती भक्ते व साक्षी भांडारकवठे. स्पर्धेसाठी परीक्षक म्हणून डॉ. नितीन अवताडे, कैलास देशमुख व मुकुंद मेने यांनी काम पाहिले. सूत्रसंचालन आकांक्षा जाधव व विजयकुमार लांडगे यांनी केले तर आभार लक्ष्मण आगलावे यांनी मानले. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी संतोष क्षीरसागर व संतोष कासे यांनी परिश्रम घेतले.



## अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेच्या वतीने गुरुपौर्णिमा साजरी

**सोलापूर, दि. ३० जुलै-**

अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेच्या वतीने सोलापूर महानगरात गुरुपौर्णिमा साजरी करण्यात आली. यावेळी शिवस्मारक येथील कार्यालयात जिल्हाप्रमुख प्रा. धन्यकुमार बिराजदार व प्रा. जगदेव बिराजदार यांच्या प्रमुख उपस्थितीत महर्षी व्यास यांच्या प्रतिमेचे पूजन करून त्यांना अभिवादन करण्यात आले. यावेळी प्रा. धन्यकुमार बिराजदार म्हणाले की, भारतीय संस्कृतीत गुरुचे स्थान सर्वोच्च मानले गेले आहे. महर्षी व्यास यांनी वेद, पुराणे, महाभारत यांसारख्या महान ग्रंथांची निर्मिती करून भारतीय ज्ञानपरंपरेला समृद्ध केले. त्यांच्या कार्यातून प्रेरणा घेऊन विद्यार्थ्यांनी अध्ययन, संशोधन आणि सृजनशीलतेचा ध्यास घ्यावा. भारताला पुन्हा विश्वगुरू बनविण्यासाठी युवकांनी ज्ञान, संस्कार आणि राष्ट्रीय मूल्ये आत्मसात करून समाजहित व राष्ट्रहितासाठी कार्य करावे. या निमित्ताने महानगरातील सर्व कार्यकर्त्यांनी कॉलेज कॅम्पस वर जाऊन कॉलेज प्राचार्यांना भेटून वृक्ष भेट देऊन शुभेच्छा दिल्या.




## आरतीमुळे समाजात भक्ती, एकतेची भावना : हभप सुदाम महाराज पानेगावकर

**पंढरपूर, दि. ३० जुलै-**

चंद्रभागेच्या आरतीमुळे केवळ धार्मिक विधीच होत नाही, तर समाजात भक्ती, श्रद्धा आणि एकतेची भावना वाढते. डॉ. विश्वनाथ कराड यांनी सुरू केलेली ही आरतीची प्रथा वारकऱ्यांचे मन परिवर्तन करते, असे विचार ह.भ.प. सुदाम महाराज पानेगावकर यांनी व्यक्त केले. विश्व शांती केंद्र (आळंदी), माईर्स एमआयटी, पुणे, भारत, श्री क्षेत्र आळंदी-देहू परिसर विकास समितीच्या वतीने पवित्र चंद्रभागेची आरती या नित्य उपक्रमाचा एक भाग म्हणून आषाढ शुद्ध एकादशीच्या पूर्व संध्येला भक्त पुंडलिक घाटावर ह.भ.प. सुदाम महाराज पानेगावकर यांच्या हस्ते चंद्रभागेची आरती झाली. त्यावेळी ते बोलत होते. याप्रसंगी उपा कराड, गोदावरी मुंडे, प्रा. स्वाती कराड चाटे, संजीवनी कराड आणि प्रा.डॉ. विश्वनाथ कराड यांच्या परिवारातील सर्व सदस्य उपस्थित होते. पानेगावकर म्हणाले, या आरती मुळे भक्तांमध्ये सेवा भाव अधिक निर्माण होतो. प्रत्येकांची सेवा करने ही आम्हाला संतांनी दिलेली शिकवण आहे. त्यामुळे त्यांच्या पाऊलांवर चालणे हे सर्व वारकऱ्यांचे कर्तव्य आहे. हभप शालिग्राम खंदारे यांनी सूत्रसंचालन केले.

# खत पुरवठा, काळाबाजार आणि लिंकिंगच्या प्रश्नावर केंद्र सरकारची महत्त्वपूर्ण भूमिका

### राज्यसभेत प्रा. डॉ. ज्योती वाघमारे यांनी मांडल्या समस्या

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. ३० जुलै-**

शेतकऱ्यांच्या हिताचे प्रश्न संसदेत प्रभावीपणे मांडत महाराष्ट्राच्या शेतकऱ्यांचा आवाज पोहचवणाऱ्या राज्यसभा खासदार प्रा. डॉ. ज्योती वाघमारे यांनी पुन्हा एकदा शेतकरी हिताला सर्वोच्च प्राधान्य दिल्याचे सिद्ध केले. राज्यसभेत तारांकित प्रश्न उपस्थित करून त्यांनी महाराष्ट्रासह देशभरातील शेतकऱ्यांसाठी खरीप व रब्बी हंगामात खतांचा अखंड आणि पुरेसा पुरवठा, खतांच्या काळाबाजारावर होणारी कारवाई, जबरदस्तीची खत लिंकिंग तसेच 'वन नेशन, वन फर्टिलायझर' योजनेच्या अंमलबजावणीबाबत केंद्र सरकारकडे सविस्तर माहिती मागितली.

शेतकऱ्यांना वेळेवर खते मिळावीत, कृत्रिम टंचाई निर्माण होऊ नये आणि कोणत्याही प्रकारच्या गैरव्यवहाराला आळा बसावा, या उद्देशाने त्यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नामुळे केंद्र सरकारलाही याबाबत स्पष्ट भूमिका मांडावी लागली. सरकारने दिलेल्या उत्तरानुसार, महाराष्ट्रासाठी खरीप आणि रब्बी हंगामात युरिया व डीएपी खतांचा पुरेसा पुरवठा सुनिश्चित करण्यात आला असून, आवश्यकतेनुसार अतिरिक्त उपलब्धताही करून दिली जात आहे. याशिवाय खतांची साठेबाजी, काळाबाजार आणि शेतकऱ्यांवर लादली जाणारी जबरदस्तीची लिंकिंग रोखण्यासाठी देशभरात व्यापक तपासणी आणि कठोर कारवाई करण्यात आली असल्याचे सरकारने स्पष्ट केले.



खत वितरण प्रक्रियेत पारदर्शकता आणण्यासाठी डीबीटी प्रणाली प्रभावीपणे राबविण्यात येत असून, त्यामुळे प्रत्येक खत विक्रीची नोंद होत असल्याने गैरप्रकारांना मोठ्या प्रमाणात आळा बसत असल्याची माहितीही सरकारने दिली.

सरकारने 'वन नेशन, वन फर्टिलायझर' योजनेअंतर्गत भारत ब्रँड खतांचा पुरवठा वाढविण्यासोबतच नॅनो युरियाच्या वापरासाठी व्यापक जनजागृती मोहीम राबविण्यात येत असल्याचेही स्पष्ट केले. यामुळे शेतकऱ्यांना दर्जेदार आणि परवडणाऱ्या दरात खते उपलब्ध करून देण्याच्या दिशेने सकारात्मक पावले उचलली जात असल्याचे समोर आले.

यावेळी प्रा. डॉ. ज्योती वाघमारे यांनी शेतकऱ्यांना वेळेवर, पुरेशा प्रमाणात आणि योग्य दरात खते उपलब्ध होणे हा त्यांचा मूलभूत हक्क असल्याचे ठामपणे मांडले.





# राष्ट्र निर्मितीमध्ये अभियंत्यांची भूमिका महत्त्वाची

### प्रा. गजानन धरणे यांचे प्रतिपादन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३० जुलै-**

डिप्लोमा शिक्षण हा विद्यार्थिनींच्या उज्वल भवितव्याचा भक्कम पाया असून, याच काळात शिस्त, नियमितपणा, अभ्यासाची सवय आणि व्यक्तिमत्व विकास घडत असते. राष्ट्र निर्मितीमध्ये अभियंत्यांची भूमिका महत्वाची असल्याचे प्रतिपादन प्राचार्य गजानन धरणे यांनी केले.

श्री सिद्धेश्वर वुमेन्स पॉलिटेक्निक येथे गुरु पौर्णिमेचे औचित्य साधून प्रथम वर्ष डिप्लोमा विद्यार्थिनी व त्यांच्या पालकांसाठी आयोजित प्राचार्य अभिभाषण कार्यक्रम पार पडला. यावेळी कॉलेजचे प्राचार्य गजानन धरणे यांनी विद्यार्थिनी व पालकांना महाविद्यालयाची शैक्षणिक परंपरा, गुणवत्तापूर्ण शिक्षण आणि करिअरच्या विविध संधींबाबत मार्गदर्शन केले.

प्राचार्यांनी आपल्या मनोगतात प्रथम वर्षाचे महत्त्व अधोरेखित करताना महाविद्यालयाची समृद्ध परंपरा, अनुभवी प्राध्यापकवर्ग, चार वेळा प्राप्त झालेले NBA मानांकन तसेच अत्याधुनिक प्रयोगशाळा, समृद्ध ग्रंथालय, वसतिगृह, बस सुविधा आणि विविध शिष्यवृत्ती योजनांची माहिती पालकांना देण्यात आली. महाविद्यालयात Outcome Based Education (OBE) पद्धतीनुसार अध्यापन केले जात असून नियमित उपस्थिती, अंतर्गत मूल्यमापन, प्रात्यक्षिके आणि कौशल्याधारित शिक्षणावर विशेष भर दिला जात असल्याचे प्राचार्यांनी नमूद केले. महाविद्यालयात राबविण्यात येणाऱ्या Tuition Free Education या अभिनव उपक्रमाची माहिती देताना दररोज एक तास पुनरावृत्ती वर्ग घेतले जात असल्याचे सांगितले. या उपक्रमामुळे गणित विषयात १८ विद्यार्थिनींनी, तर FEE आणि EGM विषयात प्रत्येकी २ विद्यार्थिनींनी १०० पैकी १०० गुण मिळविले असून, तब्बल १६१ विद्यार्थिनींनी ९० टक्क्यांपेक्षा अधिक गुण प्राप्त केल्याची उल्लेखनीय कामगिरी त्यांनी अधोरेखित केली. औद्योगिक भेटी, इंटर्नशिप, औद्योगिक प्रशिक्षण, उच्च शिक्षण, स्पर्धा परीक्षा, उद्योजकता आणि रोजगाराच्या संधींबाबतही विद्यार्थिनींना मार्गदर्शन करण्यात आले. यावेळी महाविद्यालयाच्या माजी विद्यार्थिनींच्या यशोगाथा, विविध शिष्यवृत्ती योजना, महाविद्यालयीन नियमांचे पालन याविषयीही मार्गदर्शन करण्यात आले. विद्यार्थिनींच्या सर्वांगीण प्रगतीसाठी पालकांनी नियमित तपणे शिक्षकांच्या संपर्कात राहून आपल्या पाल्याच्या शैक्षणिक प्रगतीवर लक्ष ठेवावे, असे आवाहन प्राचार्यांनी शेवटी केले. प्रास्ताविक प्रथम वर्ष विभाग प्रमुख डॉ. श्रीशैल मळेवाडी यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. सुचेता चौधरी तर आभार प्रा. प्राजक्ता सप्तश्वा यांनी मानले.

## लायन्स इंटरनॅशनलचा प्रांतीय पदग्रहण सोहळा २ ऑगस्टला

**सोलापूर, दि. ३० जुलै-**

लायन्स इंटरनॅशनल डिस्ट्रिक्ट ३२३४ डी-१ चा (वर्ष २०२६-२७) प्रांतीय अधिकाऱ्यांचा भव्य पदग्रहण सोहळा रविवार, २ ऑगस्ट २०२६ रोजी सकाळी १० वाजता रेजेंटा सेंट्रल शिवानी, चिंचोळी एमआयडीसी, पुणे-सोलापूर रोड, सोलापूर येथे आयोजित केला आहे.कार्यक्रमाचे मुख्य आकर्षण सुप्रसिद्ध प्लास्टिक सर्जन डॉ. विठ्ठल लहाने हे मुख्य वक्ते म्हणून उपस्थित राहतील. कोलकाता येथील आंतरराष्ट्रीय संचालक लायन सूरज बागला यांच्या हस्ते हा सोहळा संपन्न होईल. लायन अशोक मेहता हे अधिवेशनाचे संयोजक आहेत.

## 'शिवस्मारक'तर्फे देशभक्तीपर समूहगान स्पर्धेचे आयोजन

### शाळांनी सहभागी होण्याचे आवाहन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३० जुलै-**

श्री छत्रपती शिवाजी महाराज स्मारक मंडळ शिवस्मारकतर्फे ११ आणि १२ ऑगस्ट रोजी नवी पेठ येथील शिवस्मारक सभागृहात शालेय देशभक्तीपर समूहगान स्पर्धेचे आयोजन करण्यात आल्याची माहिती शिवस्मारकचे अध्यक्ष रंगनाथ बंकापूर यांनी गुरुवारी पत्रकार परिषदेत दिली.

देशभक्तीपर समूहगान स्पर्धा १ ली ते ४ थी, ५ वी ते ७ वी, ८ वी ते १० वी अशा तीन गटात होणार आहे. प्रत्येक संघात वादकाशिवाय कमीत कमी ६ व जास्तीत जास्त १० सदस्य असणे आवश्यक आहे. वाद्याची आणि साथीदारांची व्यवस्था संघांनी करावयाची आहे. स्पर्धकांना मराठी, हिंदी किंवा संस्कृत भाषेत ८ मिनिटांमध्ये देशभक्तीपर समूहगान सादर करता येईल.या स्पर्धेतील प्रत्येक गटात स्वतंत्र पारितोषिके दिली जाणार आहेत. प्रथम विजेत्या संघास ५ हजार रुपये, द्वितीय विजेत्या संघास ३ हजार रुपये तर तृतीय विजेत्या संघास २ हजार रुपये आणि सर्व विजेत्यांना सन्मानचिन्ह आणि प्रमाणपत्र देण्यात येणार आहेत. स्पर्धेचे पारितोषिक वितरण स्पर्धेनंतर त्याच ठिकाणी होणार आहे. सर्व सहभागी स्पर्धकाला सहभाग प्रमाणपत्र आणि पुस्तक देण्यात येणार असून सर्व सहभागी शाळांना शिवस्मारकतर्फे सन्मानचिन्ह देण्यात येणार आहे. शाळांनी शाळेच्या अधिकृत पत्रावर संघाची नोंदणी दिनांक ८ ऑगस्ट रोजी दुपारी ३ वाजेपर्यंत करावी. व अधिक माहितीसाठी शिवस्मारकचे व्यवस्थापक मल्लिनाथ व्हटकर यांच्याशी ९८२२४९८३७३ या भ्रमणध्वनी क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन सचिव गंगाधर गवसने यांनी केले. या पत्रकार परिषदेस शिवस्मारकचे अध्यक्ष रंगनाथ बंकापूर, सचिव गंगाधर गवसने, संचालक धनंजय कुलकर्णी, पुरुषोत्तम कारकल, शिवस्मारकचे व्यवस्थापक मल्लिनाथ व्हटकर उपस्थित होते.



## एमआयटी विश्वशांती गुरुकुलमध्ये गुरुपौर्णिमा साजरी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३० जुलै-**

माईर्स एमआयटी विश्वशांती गुरुकुल स्कूलमध्ये (व्हिजीएस) गुरुपौर्णिमा साजरी करण्यात आली. भारतीय संस्कृतीतील गुरु-शिष्य परंपरेचे महत्त्व तसेच शिक्षक आणि पालकांविषयी आदर व कृतज्ञतेची भावना विद्यार्थ्यांमध्ये दृढ करणे हा या उपक्रमाचा प्रमुख उद्देश होता. कार्यक्रमाची सुरुवात देवी सरस्वतीच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आली. यानंतर विद्यार्थ्यांनी गुरुपौर्णिमा आणि गुरु-शिष्य नात्याचे महत्त्व अधोरेखित करणारी प्रभावी एकांकिका, भावस्पर्शी नृत्याविष्कार आणि विविध सांस्कृतिक कार्यक्रम सादर केले. या प्रसंगी व्हिजीएस सोलापूरच्या प्राचार्या रूपाली हजारे, एमआयटी विश्वशांती गुरुकुल स्कूल, बार्शीच्या प्राचार्या रेखा पाटील तसेच एमआयटी ज्युनियर कॉलेजचे प्राचार्य राजकुमार गायकवाड उपस्थित होते.



## लायन्स परिवाराचा संयुक्त पदग्रहण सोहळा उत्साहात

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. ३० जुलै-**

लायन्स क्लब बार्शी टाऊन, तेजस्विनी आणि लिओ-लायन्स क्लब ऑफ बार्शी टाऊन युथ यांचा संयुक्त पदग्रहण, शपथविधी व चार्टर प्रदान सोहळा येथे उत्साहात संपन्न झाला.

डिस्ट्रिक्ट ३२३४-डी २चे एमजेएफ सुनिताताई मालपाणी यांनी इंडक्शन ऑफिसर म्हणून, तर मल्टिपल डिस्ट्रिक्ट ३२३४चे माजी मल्टिपल कौन्सिल चेअरमन पीएमजेएफ गिरीश मालपाणी यांनी इन्स्टॉलिंग ऑफिसर म्हणून नूतन पदाधिकाऱ्यांना शपथ देऊन मार्गदर्शन केले. कार्यक्रमास डिस्ट्रिक्ट ३२३४-डी १चे द्वितीय उपप्रांतपाल पीएमजेएफ मंगेश दोशी, रिजन-१चे रिजन चेअरमन एमजेएफ डॉ. महेश नळे तसेच झोन-३च्या झोन चेअरमन अर्चना आवटे यांची उपस्थिती होती. यावेळी लायन्स क्लब बार्शी टाऊनच्या स्पॉन्सरशिपमधून स्थापन झालेल्या लिओ-लायन्स क्लब ऑफ बार्शी टाऊन युथ या नव्या क्लबचे चार्टर प्रमाणपत्र आमदार दिलीप सोपल, आमदार राजेंद्र राऊत तसेच माजी मल्टिपल कौन्सिल चेअरमन पीएमसीसी गिरीश मालपाणी यांच्या हस्ते क्लबचे चार्टर अध्यक्ष लिओ शुभम श्रीश्रीमाळ यांच्याकडे सुपूर्द करण्यात आले. शपथविधी सोहळ्यात लायन्स क्लब बार्शी टाऊनचे अध्यक्ष आदित्य कोठारी, सचिव द्वारकेश डोईफोडे, खजिनदार शिशिर मते व सहसचिव प्रेमजी भानुशाली यांनी पदाची शपथ घेतली. लायन्स क्लब बार्शी टाऊन तेजस्विनीच्या अध्यक्षा स्मिता देशमुख, सचिव मालती पवार व खजिनदार अंजली भानुशाली यांनी पदभार स्वीकारला. तर लिओ-लायन्स क्लब ऑफ बार्शी टाऊन युथचे चार्टर अध्यक्ष शुभम श्रीश्रीमाळ (पवन), सचिव उदयन सावंत, खजिनदार गौरव सुराणा तसेच नूतन संचालक मंडळाने शपथ घेऊन पदभार स्वीकारला.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ला. प्रकाश फुरडे व ला. शर्वरी फुरडे यांनी तर आभार प्रदर्शन ला. द्वारकेश डोईफोडे यांनी केले.

## 'स्वेरी'च्या १५ विद्यार्थ्यांची भारत फोर्ज लिमिटेड कंपनीत निवड

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. ३० जुलै-**

'भारत फोर्ज लिमिटेड' या भारतीय बहुराष्ट्रीय दर्जाच्या कंपनीने घेतलेल्या मुलाखतीत श्री विठ्ठल एज्युकेशन अँड रिसर्च इन्स्टिट्यूट संचलित कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगच्या मेकॅनिकल इंजिनिअरिंगचे १० विद्यार्थी, इलेक्ट्रिकल इंजिनिअरिंगचे ३ विद्यार्थी आणि इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलिकॉम्युनिकेशन इंजिनिअरिंगचे २ अशा १५ विद्यार्थ्यांची कॅम्पस इंटरव्ह्यूद्वारे निवड करण्यात आली आहे.




विद्यार्थ्यांच्या मुलाखतीतून त्यांनी या निवड प्रक्रियेच्या अंतिम फेरीत अजय साळुंखे, अक्षय नारायणकर, दिनेश कांबळे, गणेश सुरवसे, लक्ष्मण पांढे, माऊली गोरे, पार्थ यादव, प्रताप लवळे, प्रतिक दौंड, रमेश कोळी, संग्राम काटकर, संस्कार बारटक्के, सत्यम मुळे, सुयश इंगोले व सुयोग मेंदरकर या १५ विद्यार्थ्यांची निवड केली.

सर्व विद्यार्थ्यांचे संस्थेचे संस्थापक व कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगचे प्राचार्य डॉ. बी. पी. रोंगे, संस्थेचे अध्यक्ष अशोक भोसले, उपाध्यक्ष सुरेश राऊत, सचिव डॉ.सुरज रोंगे, प्राचार्य, उपप्राचार्या डॉ. मिनाक्षी पवार यांनी सर्व विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

# अक्कलकोटमधील बंधाऱ्यांच्या बॅरेज रुपांतरण सर्वेक्षणास ९५ लाखांची मंजुरी

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. ३० जुलै-**

अक्कलकोट तालुक्यातील जलसिंचन आणि भूजल संवर्धनाच्या दृष्टीने महत्त्वाचे पाऊल मानल्या जाणाऱ्या कोल्हापूर पद्धतीच्या सात बंधाऱ्यांचे बॅरेजमध्ये रूपांतरण करण्यासाठी आवश्यक सर्वेक्षण व अन्वेषणाच्या कामास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या शिफारशीने जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिलेल्या मंजुरीनुसार महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळाने ९५.४९ लाख रुपयांची प्रशासकीय मंजुरी दिली आहे भीमा नदीवरील खानापूर, हिळ्ळी तसेच सीना नदीवरील कोर्सेगाव येथील कोल्हापूर पद्धतीच्या बंधाऱ्यांचे बॅरेजमध्ये रूपांतरण करण्यासाठी सर्वेक्षण व अन्वेषणाच्या कामासाठी ४०.४९ लाख रुपये मंजूर करण्यात आले आहेत. तसेच बोरी नदीवरील अक्कलकोट, मिरजगी, संगोगी (बु.) आणि बबलाद येथील कोल्हापूर पद्धतीच्या बंधाऱ्यांच्या बॅरेज रूपांतरणासाठी आवश्यक सर्वेक्षण व अन्वेषणाच्या कामासाठी ५५ लाख रुपयांची मंजुरी देण्यात आली आहे. या सर्वेक्षणामध्ये नदीपात्राची भौगोलिक व तांत्रिक पाहणी, पाणी साठवण क्षमता, भूगर्भीय अन्वेषण, आवश्यक संरचनात्मक आराखडा तसेच प्रकल्पाच्या व्यवहार्यतेचा अभ्यास करण्यात येणार आहे. या अहवालाच्या आधारे पुढील टप्प्यात बॅरेज उभारणीसाठी सविस्तर प्रकल्प अहवाल (डीपीआर) तयार करण्याचा मार्ग मोकळा होणार आहे. बॅरेज उभारणीमुळे पावसाळ्यातील अतिरिक्त पाणी अधिक काळ नदीपात्रात साठवून ठेवणे शक्य होणार असून, परिसरातील भूजल पातळीत वाढ, विहिरी व बोअरवेलचे पुनर्भरण, सिंचनासाठी पाण्याची उपलब्धता वाढ, पिण्याच्या पाण्याचा अधिक शाश्वत स्रोत आणि शेती उत्पादनक्षमतेत वाढ होण्यास मदत होईल. यामुळे अक्कलकोट तालुक्यातील अनेक गावांना दीर्घकालीन जलसुरक्षेचा लाभ मिळण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.



अक्कलकोट विधानसभा क्षेत्रातील सिंचन व्यवस्था आणखी बळकट बनवून शेतकरी बांधवाना आणि नागरिकांचा आर्थिक स्तर आणखी उंचावण्यासाठी कोल्हापूर पद्धतीच्या बंधाऱ्यांचे बॅरेजेस सर्वेक्षण कामास पाठपुरावा करून मंजुरी मिळाली आहे.येत्या काळात पुढील कामास सुद्धा पाठपुरावा करून सिंचन व्यवस्था सुधारण्यास प्राधान्य देण्यात येईल. याकामी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार, पालकमंत्री जयकुमार गोरे यांचेही सहकार्य लाभले

**- सचिन कल्याणशेट्टी,** आमदार अक्कलकोट

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## महत्त्वाचे

### तीन वरिष्ठ आयएएस अधिकाऱ्यांच्या बदल्या

**मुंबई :** राज्य शासनाने प्रशासकीय पातळीवर काही महत्त्वाचे बदल केले असून, मंगळवारी भारतीय प्रशासकीय सेवेतील (आयएएस) तीन सनदी अधिकाऱ्यांच्या बदल्यांचे सुधारित आदेश काढले आहेत. शासनाने जारी केलेल्या नव्या आदेशानुसार, वित्त व नियोजन विभागाच्या सचिव ए. शैला यांच्याकडे आता मंत्रालयातील वस्त्रोद्योग विभागाच्या सचिवपदाची धुरा सोपवण्यात आली आहे. यासोबतच, मत्स्यव्यवसाय विभागाच्या आयुक्त पदावर कार्यरत असणाऱ्या प्रेरणा देशभ्रतार यांची आता महाराष्ट्र राज्य लघुउद्योग विकास महामंडळाच्या व्यवस्थापकीय संचालकपदी नियुक्ती करण्यात आली आहे. तर, लघुउद्योग विकास महामंडळाचे विद्यमान व्यवस्थापकीय संचालक विकास पानसरे यांच्यावर आता पर्यटन विभागाच्या संचालकपदाची नवी जबाबदारी देण्यात आली आहे.

### पूर्व नेपाळमध्ये हिंसाचार; ३ जिल्ह्यांत संचारबंदी

**जनकपूर :** नेपाळमध्ये पुन्हा हिंसाचार उफाळला आहे. आग्नेय नेपाळमधील सिराहा जिल्ह्यात तिघांचा मृत्यू झाला. या हिंसाचाराच्या पृष्ठभूमीवर प्रशासनाने भारताला लागून असलेल्या तिन्ही जिल्ह्यांमध्ये संचारबंदी लागू केली आहे. पूर्व नेपाळमध्ये दोन गटांमध्ये झालेल्या संघर्षानंतर तणाव वाढला आहे.

जनकपूर, सिराहा आणि सप्तरी जिल्ह्यांमध्ये संचारबंदी लागू करण्यात आली आहे. मृताची ओळख सिराहा जिल्ह्यातील गणेश यादव अशी पटली आहे. पोलिसांच्या गोळीबारात इतर अनेक जण गंभीर जखमी झाले आहेत. या अशांततेदरम्यान काही आंदोलक रस्त्यावर जखमी अवस्थेत दिसले. नेपाळमधील सुनसरी जिल्ह्यातील देवानगंज ग्रामीण नगरपालिकेच्या कप्तानगंज येथे रविवारी रात्री सुरू झालेला तणाव मधेश प्रदेशात पसरल्याने हा हिंसाचार घडला.

# हजेरीसाठी व्हॉट्सअॅप व्हिडीओचा वापर

## महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेची फसवणूक; ८२ संस्थांना बजावली नोटीस

**अनिल फेकरीकर**

**नागपूर, ३० जुलै**

टंकलेखन, लघुलेखन आणि संगणक टंकलेखनात प्रावीण्य मिळवायचे झाल्यास प्रचंड मेहनत करावी लागते. तीच मेहनत विद्यार्थ्यांनी करून करीअर घडवावे, असा हेतू महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेचा आहे. त्यानुसार पारदर्शकतेसाठी परिषदेने दैनंदिन हजेरीकरिता मोबाईल अॅप विकसित केले आहे. त्यात प्रशिक्षणासह परीक्षेदरम्यान दररोज न चुकता मुलांची हजेरी घेणे बंधनकारक केले आहे. मात्र महाराष्ट्रातील काही संस्था चालकांनी यात बोगसगिरी करीत चक्क मुले घरीच असताना त्या ३२७९ विद्यार्थ्यांचे व्हॉट्सअॅप व्हिडीओ मिळवून तेच अपलोड करून राज्य परीक्षा परिषदेची फसवणूक केली. हा महाघोटाळा लक्षात आल्याने एकूण २३ संगणक टंकलेखनाचे प्रशिक्षण देणाऱ्या संस्थांना नोटीस बजावण्यात आली आहे. आता त्या सर्व फसवणूक करणाऱ्या संस्थाचालकांना २ ऑगस्ट २०२६ पर्यंत महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेसमोर आपली बाजू मांडायची आहे. समजा त्यांनी बाजू न मांडल्यास त्यांची मान्यताच धोक्यात येण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे.




### परीक्षेला बसवितात डमी विद्यार्थी

**टंकलेखन, लघुलेखन आणि संगणक टंकलेखनाची परीक्षा ही प्रत्यक्ष अधिकृतपणे प्रशिक्षण घेणाऱ्यांनीच द्यायला हवी. मात्र अनेक संस्था चालक विद्यार्थ्यांना पैसे घेऊन उत्तीर्ण करून देण्याची हमी देतात. याकरिता ते परीक्षेसाठी डमी विद्यार्थ्यांचा वापर करतात. ते डमी विद्यार्थीच खरे परीक्षार्थी असल्याचे भासवून संबंधित अॅपवर काहीच अपलोड करीत नाही. दरम्यान, दुसऱ्या प्रकारात व्हॉट्सअॅप व्हिडीओ अपलोड करून घोटाळा करतात. हाच प्रकार महाराष्ट्रात ८२ संस्था चालकांनी केला आहे. ही बाब उजेडात आल्यानेच त्यांना नोटीस बजावण्यात आली आहे. एकंदरीत पाहता ८२ संस्था चालकांनी केलेल्या कृतीमुळे ११३५९ विद्यार्थ्यांचे भवितव्य धोक्यात आले आहे.**

दरम्यान, २३ संस्थांनी त्यांच्याकडे प्रशिक्षण घेणाऱ्या ३२७९ विद्यार्थ्यांचे व्हॉट्सअॅप व्हिडीओ अपलोड करून फसवणूक केली, तर राज्यातील ५९ संस्थांनी परीक्षा परिषदेने दिलेल्या आदेशाचे उल्लंघन करीत ८०८० विद्यार्थ्यांची हजेरी मोबाईल अॅपवर नोंदविलीच नाही.

त्याही ५९ संस्थांना नोटीस बजावून उत्तर सादर करण्याचे आदेश महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेचे अध्यक्ष डॉ. नंदकुमार बेडसे यांनी दिले आहेत.

# मुंबईतील वकिलांच्या संघटनेने बंद केले कँटिन

### एफडीएने केली होती पाहणी

**मुंबई, ३० जुलै**

अन्नसुरक्षेच्या संदर्भात रेस्टॉरंट्स आणि हॉटेल्सची निवडक तपासणी करण्याबाबत मुंबई उच्च न्यायालयाने महाराष्ट्र अन्न व औषध प्रशासनाकडे विचारणा केल्यानंतर दुसऱ्याच दिवशी उच्च न्यायालयाच्या आवारातील वकिलांच्या संघटनेद्वारे चालवल्या जाणाऱ्या कँटिनने आपली सेवा स्वेच्छेने आणि तात्पुरत्या स्वरूपात बंद केली. गुरुवारी एफडीएच्या अधिकाऱ्यांनी कँटिनच्या परिसराची पाहणी केली. मात्र, कँटिनची सेवा तात्पुरती बंद करण्याचा निर्णय स्वेच्छेने घेतला होता आणि तो राज्य सरकारच्या नियामक प्राधिकरणाच्या कोणत्याही प्रतिकूल आदेशामुळे घेण्यात आलेला नव्हता, असे बॉम्बे बार असोसिशएनने (बीबीए) स्पष्ट केले आहे.

हे पाऊल असोसिएशनने उचलले आहे. ३० जुलै रोजी एफडीएने दिलेल्या भेटीनंतर, त्यांच्याकडून असोसिएशनला कोणताही प्रतिकूल संदेश, आदेश किंवा नोटीस प्राप्त झालेली नाही, असे स्पष्टीकरण बीबीएचे सचिव नौशाद इंजिनीअर यांनी एका निवेदनात दिले. दक्षिण मुंबईतील कँटिनमधील सेवा लवकरच पुन्हा सुरू होतील, अशी माहिती निवेदनात देण्यात आली.

उच्च न्यायालयाने बुधवारी प्रश्न उपस्थित केला की, अन्नसुरक्षेच्या नियमांची अंमलबजावणी सर्वत्र समानरीत्या केली जात आहे का? तसेच न्यायालयाने एफडीएला मंत्रालय आणि उच्च न्यायालयातील कँटिन्ससह सर्व सरकारी व निम-सरकारी खानावळींची तपासणी करण्याचे आणि त्या तपासणीचा अहवाल व व्हिडीओ रेकॉर्डिंग सादर करण्याचा निर्देश दिला. (वृत्तसंस्था)

# श्रीरंग पाथ्रडकर यांचा सेवानिवृत्तीनिमित्त सत्कार

**नागपूर, ३० जुलै**

तरुण भारतमध्ये सहायक कार्मिक व्यवस्थापक म्हणून कार्यरत असलेले श्रीरंग पाथ्रडकर यांचा सेवानिवृत्तीनिमित्त गुरुवारी श्री नरकेसरी प्रकाशन लि.चे प्रबंध संचालक धनंजय बापट यांच्या हस्ते सन्मानचिन्ह तसेच मुख्य संपादक शैलेश पांडे यांच्या हस्ते शाल, श्रीफळ आणि पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. तसेच उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा देण्यात आल्या.



आपल्या सेवाकाळात विविध विभागांमध्ये पाथ्रडकर यांनी यशस्वीरीत्या काम बघितले. तरुण भारतच्या जिल्हा कार्यालयांमध्ये देखील त्यांनी संस्थेचे काम जबाबदारीने पार पाडले. याप्रसंगी पाथ्रडकर यांनी मनोगत व्यक्त करीत व्यवस्थापनाचे आभार मानले. कार्यक्रमाला महाव्यवस्थापक देवेंद्र टोणपे, प्रकल्प संयोजक विवेक तरासे, उपमहाव्यवस्थापक प्रगती किडे, व्यवस्थापक प्रशांत मुनीश्वर आणि विविध विभागांचे प्रमुख आणि तरुण भारतमधील सहकारी उपस्थित होते. (तभा वृत्तसेवा)

### काश्मीर-उत्तराखंडमध्ये पावसाचा धुमाकूळ

**श्रीनगर/डेहराडून, ३० जुलै**

उत्तराखंड, जम्मू-काश्मिरात पावसाचा धुमाकूळ सुरूच असून, भूस्खलन आणि पूरस्थितीमुळे जनजीवन विस्कळीत झाले आहे. उत्तराखंडमधील रुद्रप्रयाग, चमोली आणि उत्तरकाशी या तीन जिल्ह्यांमध्ये गुरुवारी सकाळी भूस्खलन झाले. गौरीकुंडजवळ भूस्खलनामुळे केदारनाथ मार्ग बंद करण्यात आला असून, यात्रेकरूंना प्रवास करण्यापासून थांबवण्यात आले आहे. दुसरीकडे जम्मू-काश्मिरात पाच मार्गांवर भूस्खलन झाल्याने वाहतूक विस्कळीत झाली आहे.

हरिद्वारमध्ये गंगेच्या जोरदार प्रवाहात गंगाजल भरताना एक तरुण वाहून गेला, तर रुद्रप्रयागमध्ये सिल्लीजवळ ढिगारा कोसळल्याने महामार्ग काही काळ बाधित झाला, तर पेट्रोल पंपाजवळ डोंगरावरून दगड कोसळल्याने एक कार दबली गेली. उत्तराखंडमधील हरिद्वारमध्ये जवळपास दोन तास झालेल्या मुसळधार पावसामुळे अनेक सखल भागांत पाणी साचले. खर्खरी परिसराजवळील 'सुखी नदी'त पाण्याची पातळी अचानक वाढल्याने दोन वाहने अडकली. याची माहिती मिळताच पोलिस, प्रशासकीय अधिकारी आणि बचाव पथके घटनास्थळी दाखल झालीत व त्यांनी बचावकार्य सुरू केले. पिथौरागढमधील धारचुला येथील तीनटोला-गास्कू रस्त्यावर टेकडीवरून दरड कोसळल्याने एक प्रवासी जीप चेंदामेंदा झाली.

# पुण्यासह १४ जिल्ह्यांमध्ये 'ऑरेंज अलर्ट' जारी

## जळगाव, कोल्हापूर, सातारा, संभाजीनगरात मुसळधारेचा अंदाज

**पुणे, ३० जुलै**

गत काही दिवसांपासून राज्यात अनेक भागांमध्ये जोरदार पाऊस कोसळत आहे. दरम्यान, हवामान विभागाने गुरुवारी राज्यातील १४ जिल्ह्यांमध्ये 'ऑरेंज अलर्ट' तर उर्वरित जिल्ह्यांसाठी 'यलो अलर्ट' जारी केला आहे. जळगाव, पुणे, कोल्हापूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, जालना, रायगड, अमरावती, भंडारा, चंद्रपूर, गडचिरोली, गोंदिया, नागपूर व वर्धा जिल्ह्यात 'ऑरेंज अलर्ट' तर पालघर, ठाणे, मुंबई, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, धुळे, नंदुरबार, नाशिक, अहिल्यानगर, परभणी, बीड, हिंगोली, नांदेड, लातूर, अकोला, बुलडाणा, वाशिम व यवतमाळ जिल्ह्यासाठी 'यलो अलर्ट' जारी केला आहे.

**धाराशिवमध्ये जुलैची सरासरी ओलांडणार**

धाराशिवमध्ये जून महिन्यात अपेक्षित पाऊस झाला नाही. जुलै महिन्यातही पावसाने पाठ फिरवली. २९ जुलैपर्यंत केवळ ९८ मीमी पाऊस झाला आहे. दरम्यान, हवामान विभागाने पुढील दोन दिवस या भागात जोरदार पावसाचा अंदाज वर्तविला आहे. यामुळे जुलै महिन्याची पावसाची सरासरी ओलांडण्याची शक्यता आहे.

**मराठवाडा, विदर्भात 'फ्लॅश फ्लड'चा इशारा**

भारतीय हवामान विभागाच्या नवी दिल्ली येथील 'फ्लॅश फ्लड गायडन्स सेल'ने गुरुवारी एक राष्ट्रीय बुलेटिन जारी केले आहे. त्यानुसार, मराठवाडा, मध्य महाराष्ट्र, विदर्भ आणि लगतच्या मध्य प्रदेश व गुजरातच्या सीमेवरील काही भागांत पुढील २४ तासांत 'फ्लॅश फ्लड' म्हणजेच अचानक पूर येण्याचा मोठा धोका वर्तवण्यात आला आहे.


कोयना धरणाचे सहा दरवाजे उघडण्यात आले

**कोयना धरणाचे सहा दरवाजे प्रथमच उघडले**


सह्याद्रीच्या डोंगररांगांमध्ये सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे कोयना धरणातील पाणीसाठ्यात सातत्याने वाढ होत आहे. या पार्श्वभूमीवर धरणाची पाणीपातळी नियंत्रित ठेवण्यासाठी गुरुवारी सायंकाळी प्रथमच धरणाचे सहा वक्र दरवाजे उघडण्यात आले. यामुळे कोयना नदीत पाण्याचा विसर्ग सुरू झाला असून नदीकाठच्या गावांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे. (तभा वृत्तसेवा)

# श्रीराम मंदिर सचिव पदासाठी पुण्याचे जगदीश आफळे यांच्या नावाचा प्रस्ताव

## २ सप्टेंबरच्या बैठकीत अधिकृत घोषणा होण्याची शक्यता

**अयोध्या, ३० जुलै**

अयोध्येतील श्रीराम जन्मभूमी तीर्थक्षेत्र मंडळाच्या सचिवपदी पुण्यातील आयआयटी मुंबईचे पदवीधर जगदीश आफळे यांच्या नियुक्तीचा प्रस्ताव ठेवण्यात आला. २ सप्टेंबरच्या बैठकीत त्यांच्या नावाची अधिकृत घोषणा होण्याची शक्यता आहे. त्यांची या पदावर वर्णी लागल्यास मंदिराचा आर्थिक व्यवहार एका मराठमोळ्या अधिकाऱ्याच्या हाती असेल.



सचिव पदासाठी जगदीश आफळे यांच्या नावाचा प्रस्ताव ठेवण्यात आला आहे. तथापि, अंतिम निर्णय २ सप्टेंबर रोजी ट्रस्टची कार्यकारी समिती घेईल, अशी माहिती ट्रस्टचे कार्यवाहक सरचिटणीस कृष्ण मोहन यांनी माध्यमांशी बोलताना दिली. त्यांनी आयआयटी मुंबईमधून इलेक्ट्रिकल इंजिनिअरिंगमध्ये एम.टेक केले आणि भारत व परदेशातील अनेक कंपन्यांमध्ये काम केले आहे. नोकरीतून निवृत्त झाल्यानंतर, आफळे राम मंदिर बांधकाम प्रकल्पात प्रकल्प व्यवस्थापक म्हणून रुजू झाले. सध्या ते राम मंदिराच्या बांधकाम कामावर देखरेख करत आहेत. मंदिराच्या दैनंदिन प्रशासनाचे प्रभावी व्यवस्थापन करण्यासाठी विश्वस्त मंडळाने हे नवीन पद तयार केले आहे.

**दैनंदिन कार्य सुरळीत पार पाडण्याची जबाबदारी**

श्रीराम जन्मभूमी तीर्थक्षेत्र मंडळाचे कार्यवाहक सरचिटणीस कृष्ण मोहन यांनी सांगितले की, ६ जुलै रोजी झालेल्या ट्रस्टच्या बैठकीत सचिवपदी जगदीश आफळे यांच्या नावाचा प्रथम प्रस्ताव ठेवण्यात आला होता. सचिव पदावरील व्यक्तीकडे मंदिरातील नियमित व्यवस्थापन, प्रशासकीय समन्वय आणि दैनंदिन कार्य सुरळीत पार पाडण्याची जबाबदारी असेल. तथापि बँक व्यवहारांसाठी मी आणि आफळे हे संयुक्त स्वाक्षरीकर्ते राहणार असून विश्वस्त मंडळाने यास मंजुरी दिली. (वृत्तसंस्था)

### जगदीश आफळे पुण्याचे रहिवासी

**जगदीश आफळे हे मूळ महाराष्ट्रातील पुणे शहरातील रहिवासी आहेत. आपल्या अभियांत्रिकी कारकिर्दीत त्यांनी अनेक बहुराष्ट्रीय कंपन्यांमध्ये महत्वाच्या पदांवर काम केले. अभियांत्रिकी क्षेत्रातील निवृत्तीनंतर ते भारतात परतले होते. अयोध्येतील श्रीराम मंदिर मंदिराच्या बांधकामासाठी तांत्रिक मार्गदर्शन करणाऱ्या चार वरिष्ठ अभियंत्यांच्या पथकात त्यांचा समावेश होता. मंदिराच्या पायाभरणीपासून ते इतर महत्त्वाच्या संरचनांच्या उभारणीपर्यंत त्यांनी महत्त्वाची भूमिका आहे.**

### समीर वानखेडेंना दिलासा

**मुंबई :** मुंबई उच्च न्यायालयाने दोन ड्रग्ज प्रकरणांच्या तपासासंदर्भात आयआरएस अधिकारी समीर वानखेडे यांना अंतरिम दिलासा दिला आहे. यापैकी एक प्रकरण अभिनेता सुशांत सिंह राजपूतच्या मृत्यूशी संबंधित आहे.

# बोगस पदवी प्रकरणी कर्मचाऱ्याला अटक

## ४ ऑगस्टपर्यंत पोलिस कोठडी, गुगल-पेवरून ७० हजार स्वीकारले

**पुणे, ३० जुलै**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील विद्यार्थ्याची बनावट बी. कॉम. पदवी, गुणपत्रिका आणि पदवी प्रमाणपत्र तयार करून ती खरी असल्याचे भासवत ७० हजार रुपये स्वीकारल्याप्रकरणी विद्यापीठातील कर्मचारी रमेश दामोदर मुखेकर याला चतु:शृंगी पोलिसांनी अटक केली. न्यायालयाने त्याला ४ ऑगस्टपर्यंत पोलिस कोठडी सुनावली आहे.

मुखेकर हा विद्यापीठाच्या वित्त व लेखा विभागातील कर्मचारी असून परीक्षा विभागात कार्यरत आहे. या प्रकरणी डॉ. राजेंद्र शंकर तलवारे यांनी चतु:शृंगी पोलिस ठाण्यात तक्रार दिली आहे. राजेंद्र तलवारे हे सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ या पदावर आहेत.

मुखेकरने एका विद्यार्थ्याच्या वडिलांना त्यांचा मुलगा बी.कॉम. पदवीधर झाल्याचे भासवून बनावट गुणपत्रिका व पदवी प्रमाणपत्र तयार करून दिले. ही कागदपत्रे विद्यापीठाची अधिकृत असल्याचे भासवून त्याने संबंधितांकडून गुगल-पेच्या माध्यमातून ७० हजार रुपये स्वीकारल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे.

बनावट कागदपत्रे तयार करण्यासाठी आरोपीने कोणती साधने वापरली आणि ती कोठे तयार केली, याचा तपास पोलिसांकडून सुरू आहे. कागदपत्रे तयार करण्यासाठी वापरलेली साधने जप्त करणे, तसेच आरोपीच्या मोबाईलमधील माहिती तपासणे आवश्यक असल्याने पोलिसांनी न्यायालयाकडे त्याच्या पोलिस कोठडीची मागणी केली.

**आणखी विद्यार्थ्यांची फसवणूक?**

मुखेकरने अशाच पद्धतीने आणखी किती विद्यार्थ्यांची बनावट कागदपत्रे तयार केली आहेत, याचाही तपास सुरू आहे. त्याने कोणाकोणाशी संपर्क साधला, गुगल-पेवरून स्वीकारलेल्या रकमेचा पुढील व्यवहार काय, याची माहिती पोलिस घेत आहेत. आरोपीचे पूर्वीचे गुन्हेगारी रेकॉर्ड आहे का, याचीही पडताळणी करण्यात येत आहे. तपासादरम्यान आरोपीकडून साक्षीदारांवर दबाव आणण्याची किंवा त्यांना धमकावण्याची शक्यता असल्याचे पोलिसांनी न्यायालयात नमूद केले. त्यामुळे गुन्ह्याच्या सखोल तपासासाठी आरोपीची पोलिस कोठडी आवश्यक असल्याचे पोलिसांनी सांगितले. (तभा वृत्तसेवा)

# १५ दिवसांच्या बाळाच्या पोटावर चटके

**चुरणी, ३० जुलै**

मेळघाटातील चिखलदरा ठाण्याच्या हद्दीतील रेहट्याखेडा येथे १५ दिवसांच्या बालिकेवर अघोरी उपचार केल्याची घटना समोर आली आहे. पोट फुगल्याच्या त्रासावर उपचार करण्याच्या नावाखाली गावातील ६५ वर्षीय भुलई जामुनकर या महिलेने तिच्या पोटावर तप्त विळ्याचे ११ ते १२ चटके दिले. मेळघाटात या अघोरी व अनिष्ट उपचारपद्धतीला डम्मा, असे म्हटले जाते.

पोटफुगीमुळे तिच्यावर डॉक्टरांकडून उपचार सुरू होते. आरोपी महिलेने चुलीवर विळा तापवून बालिकेला चटके दिले या अमानुष प्रकारामुळे चिमुकलीला तीव्र वेदना झाल्याने तिला तातडीने सेमाडोह प्राथमिक आरोग्य केंद्रात दाखल करण्यात आले. चिखलदराचे ठाणेदार प्रवीणकुमार पाटील यांनी पथकासह घटनास्थळी धाव घेतली. याबाबत मुलीच्या आईने तक्रार दिली. मेळघाटातील काही भागांत लहान मुलांचे पोट फुगणे किंवा पोटाशी संबंधित आजारांवर डम्मा देण्याची अघोरी उपचारपद्धती आजही प्रचलित आहे. प्रत्यक्षात या प्रकारामुळे नवजात आणि लहान मुलांना असह्य वेदना सहन कराव्या लागतात तसेच त्यांच्या आरोग्यावर गंभीर परिणाम होऊ शकतो. गेल्या दोन वर्षांत मेळघाटात अशा प्रकारची समोर आलेली ही तिसरी घटना असल्याने मेळघाटात जनजागृतीची गरज पुन्हा अधोरेखित झाली आहे. (तभा वृत्तसेवा)



# जेव्हा व्हायचे असेल तेव्हा होईलच

## दोन्ही राष्ट्रवादीच्या विलीनीकरणाच्या चर्चेवर भुजबळांचे भाष्य

**पुणे, ३० जुलै**

राष्ट्रवादी काँग्रेसच्या दोन गटांचे विलीनीकरण जेव्हा व्हायचे असेल तेव्हाच होईल. त्याबाबतचा निर्णय पक्षाच्या प्रमुख सुनेत्रा पवार यांच्या मार्गदर्शनाखाली घेतला जाईल, असे भाष्य अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ यांनी गुरुवारी केले. संभाव्य विलीनीकरणाबाबतच्या चर्चा शरद पवार यांनी फेटाळून लावल्यानंतर दोन दिवसांनी भुजबळ यांचे हे विधान आले आहे.

विलीनीकरणाच्या चर्चेबाबत पत्रकारांनी विचारलेल्या प्रश्नाला उत्तर देताना मंगळवारी राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार)चे अध्यक्ष शरद पवार म्हणाले होते की, या चर्चेला काहीही अर्थ नाही. त्यांच्या या प्रतिक्रियेनंतर मंत्री व अजित पवार गटाचे ज्येष्ठ नेते छगन भुजबळ गुरुवारी पुण्यात एका कार्यक्रमात आले असता त्यांना पत्रकारांनी राष्ट्रवादीच्या दोन गटांच्या विलीनीकरणाबाबत विचारणा केली. ते म्हणाले, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार या राष्ट्रवादीच्या (अजित पवार) अध्यक्षा आहेत. त्यांच्या मार्गदर्शनाखालीच निर्णय घेतला जाईल. प्रसारमाध्यमेच अशा चर्चांना हवा देतात. त्यामुळे त्यावर चर्चा करण्यात काहीच अर्थ नाही. जेव्हा व्हायचे असेल तेव्हा ते होईलच. राजकीय नेते विविध मुद्द्यांवर एकमेकांना भेटतच असतात. लोकशाहीत संवाद नेहमीच व्हायला हवा. (तभा वृत्तसेवा)



### फुले वाड्याच्या विस्ताराचे काम समाधानकारक नाही

पत्रकारांशी बोलताना भुजबळ पुढे म्हणाले, फुले वाडा हे महात्मा फुले आणि सावित्रीबाई फुले यांचे वैयक्तिक निवासस्थान होते. आता हे एक संरक्षित राज्य वारसास्थळ आणि संग्रहालय आहे. आम्हाला विद्यार्थ्यांना फुले वाड्याचा इतिहास दाखवायचा आहे. फुले वाड्याच्या विस्तारासाठी २०० कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. मुख्यमंत्र्यांनी या मुद्द्यावर बैठका घेतल्या आहेत. परंतु काम समाधानकारकपणे पूर्ण झालेले नाही. आम्ही जमीन उपलब्ध करून देण्यास तयार आहोत.आम्ही आवश्यक ती सर्व कामे पूर्ण केली आहेत, असेही त्यांनी सांगितले.

# रेल्वे अपघातांत ९० टक्क्यांनी घट

## रेल्वेमंत्र्यांची संसदेत माहिती, दहा वर्षांत सुरक्षा उपाययोजनांना प्राधान्य

**नवी दिल्ली, ३० जुलै**

रेल्वेमधील सुरक्षा अधिक मजबूत करण्यासाठी गुंतवणुकीत सातत्याने वाढ करण्यात आली आहे. २०१३-१४ मध्ये सुरक्षा कार्यावर ३९,२०० कोटी रुपये खर्च करण्यात आले, तर २०२६-२७ च्या अर्थसंकल्पात ही रक्कम वाढवून १,२०,३८९ कोटी रुपये करण्यात आली आहे. सुरक्षा उपाययोजनांना प्राधान्य दिल्याने गेल्या १० वर्षांत रेल्वे अपघातांमध्ये जवळपास ९० टक्क्यांनी घट झाल्याची माहिती रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांनी प्रश्नोत्तराच्या तासात लोकसभेत दिली.

सुरक्षेतील वाढीव गुंतवणूक आणि नवीन तंत्रज्ञानाच्या वापरामुळे अपघाताच्या संख्येत विक्रमी घसरण झाली आहे. वैष्णव यांनी सांगितले की, २०१४-१५ मध्ये १३५ रेल्वे अपघातांची नोंद झाली होती, तर २०२५-२६ मध्ये हा आकडा १६ पर्यंत खाली आला. चालू आर्थिक वर्ष २०२६-२७ मध्ये जूनपर्यंत केवळ दोन रेल्वे अपघातांची नोंद झाली. रेल्वे सुरक्षा वाढवण्यासाठी गेल्या काही वर्षांत लक्षणीय गुंतवणूक करण्यात आली. यात सुधारित ट्रॅक, आधुनिक सिग्नलिंग प्रणाली आणि स्वदेशी आर्मर तंत्रज्ञान यांसारख्या अनेक सुरक्षा उपाययोजनांचा समावेश आहे.



प्रति १० लाख ट्रेन किलोमीटरमागे होणाऱ्या अपघातांचे मोजमाप करणारा रेल्वेचा 'परिणामी अपघात निर्देशांक' देखील सातत्याने सुधारला आहे. प्रति १० लाख ट्रेन किलोमीटरमागे होणारे अपघात दर्शवणारा हा निर्देशांक २०१४-१५ मध्ये ०.११ होता आणि २०२५-२६ मध्ये तो ०.०१ पर्यंत कमी झाला.

**सुरक्षा प्रकल्पांवर लाख कोटींपेक्षा अधिक खर्च**

रेल्वे सुरक्षा मजबूत करण्यासाठी गुंतवणुकीत सातत्याने वाढ करण्यात आली आहे. २०१३-१४ मध्ये सुरक्षा उपाययोजनांवर ३९,२०० कोटी रुपये खर्च करण्यात आले होते, तर २०२६-२७ च्या अर्थसंकल्पात ही रक्कम वाढवून १,२०,३८९ कोटी रुपये करण्यात आली आहे.

**६,६७१ रेल्वे स्थानकांवर इंटरलॉकिंग प्रणाली**

देशभरातील ६,६७१ रेल्वे स्थानकांवर इलेक्ट्रिकल आणि इलेक्ट्रॉनिक इंटरलॉकिंग प्रणाली बसवण्यात आली आहे. या सर्व स्थानकांवर ट्रॅक सर्किटिंगचीही सोय करण्यात आली आहे. त्यामुळे रेल्वेचे संचालन अधिक सुरक्षित होते. (तभा वृत्तसेवा)

CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## अग्रलेख

# परिवर्तनाचे पुढचे पाऊल

संसदेचे पावित्र्य, सभागृहाची प्रतिष्ठा असे शब्ददेखील 'बापुडे' ठरावेत असा अभूतपूर्व अनुभव बुधवारी संसदेत लोकसभेमध्ये सार्वजनिक परीक्षा गैरव्यवहार प्रतिबंधक दुरुस्ती विधेयकावरील चर्चेदरम्यान विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांच्या सुमारे एक तासाच्या बेबंद भाषणसमयी अवघ्या देशाने घेतला. सभागृहात मांडल्या गेलेल्या कोणत्याही विधेयकावरच नव्हे, तर कामकाजातील कोणत्याही बाबीवरील चर्चा ही गांभीर्यानेच व्हावयास हवी अशी सामान्य अपेक्षा असते. जेव्हा कोणाही उमेदवारास सार्वजनिक जीवनातील सभ्यतेच्या अनुभवाने समृद्ध झाल्याच्या जाणिवांमुळे मतदारांकडून संसदेत किंवा विधिमंडळात प्रतिनिधित्व करण्यासाठी जनतेकडून पाठविले जाते, तेव्हा त्या सभागृहाच्या सभ्यतेचा, मर्यादांचा आणि लोकशाहीच्या प्रतिष्ठेचा आदर राखणे ही त्याची जबाबदारी आणि मतदारांच्या विश्वासासोबतची बांधिलकीदेखील असते. जनतेच्या हिताआड येणाऱ्या कोणत्याही समस्येवर तोडगा काढायचा असेल, तर सत्ताधारी किंवा विरोधक अशा कोणत्याही एका भूमिकेतून या समस्येकडे न पाहता, संवेदनशीलतेने पाहणे आणि प्रामाणिकपणे समस्या सोडविण्याच्या कामी सहभागी होणे अपेक्षित असताना, अशा समस्यांचेदेखील राजकारण करण्याचा एक विचित्र पायंडा अलिकडे संसदेपासून सर्वच लोकशाहीच्या सदनांत पडू पाहात असल्याची खंत सामान्य जनतेच्या मनात घर करून राहिलेली आहे. संसदेच्या सभागृहात विरोधी पक्षनेत्याने ज्या जबाबदारीने आपल्या कर्तव्याचे आणि बांधिलकीचे भान ठेवावयास हवे होते, त्याचा किंचितसा अंश बुधवारी या विधेयकावरील चर्चेदरम्यानच्या त्यांच्या वक्तव्यात शोधावाच लागेल. तसे करूनही त्यामध्ये यश येईलच असे नाहीच, उलट, संसदेच्या कामकाजाच्या नोंदीतून काढून टाकावे लागतील अशा असभ्य आणि असंसदीय शब्दांची खैरात करून सभागृहाच्या प्रतिष्ठेलाच आव्हान देण्याचा हा प्रयत्न पाहून लोकशाहीने लाजेने मान खाली घातली असेल असेच कोणासही वाटू शकते. संसदेचे कामकाज नियमानुसारच चालविले जावे ही या सभागृहाची परंपरा आहे. त्यास बाधा येईल असे कोणतेही वर्तन किंवा वक्तव्य सभागृहाच्या कामकाजाचा भाग ठरू शकत नाही. वस्तुतः, गेल्या काही महिन्यांपासून ज्या गंभीर समस्येमुळे उभा देश अस्वस्थ आहे, विद्यार्थ्यांचा संताप खदखदत आहे, त्या समस्येवर प्रभावी तोडगा काढण्याकरिता सभागृहासमोर सादर झालेल्या दुरुस्ती विधेयकावरील चर्चेदरम्यान तरी या संकेताचे भान राखले जाणे अपेक्षित होते. पण प्रत्यक्षात, विद्यार्थ्यांच्या रस्त्यावरील आंदोलनास पाठिंबा देण्यावरून विरोधकांचे जे काही राजकारण या दरम्यान देशाने पाहिले, त्याचाच पुढचा अंक लोकसभेच्या सदनात या विधेयकावरील चर्चेदरम्यान, विशेषतः विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांच्या भाषणादरम्यान देशाने पाहिला.

सार्वजनिक परीक्षांमधील गैरव्यवहार व पेपरफुटीसारख्या अत्यंत गंभीर अशा आणि शिक्षणव्यवस्थेला वेठीला धरणाऱ्या समस्येला कायमचा लगाम घालण्याच्या दृष्टीने या विधेयकातील नव्या दुरुस्त्या भविष्याला नवी दिशा देतील अशी अपेक्षा आता बळावली आहे. राहुल गांधी यांनी जनतेच्या याच अपेक्षांचे भान ठेवून विधेयकावरील चर्चेला विधायक मानसिकतेची साथ दिली असती, तर जनतेच्या हिताची खरी कळकळ दिसून आली असती. त्याऐवजी राजकारण करत, चर्चा भरकटविण्यासाठी कोणा विद्यार्थिनीसोबत झालेल्या संवादाचा दाखला देत त्या संवादाआडून असंसदीय शब्दांची प्रच्छन्न उधळण करत त्यांनी सभागृहाच्या कामकाजाचा महत्त्वाचा वेळ वाया घालविला आणि जनतेच्या अपेक्षांनाही पाने पुसली आहेत. राहुल गांधींनी विधेयकाशी सुसंगत मुद्द्यांवर चर्चा करावी अशी अपेक्षा वारंवार सभागृहात सभापतींकडून व्यक्त केली जात होती, मात्र त्याऐवजी गृहमंत्री आणि पंतप्रधानांना लक्ष्य करण्याची संधी साधण्यावरच त्यांनी आपल्या भाषणासाठी मिळालेला वेळ वापरला आणि एका महत्त्वाच्या गंभीर समस्येबाबत विरोधी पक्षनेते खरोखरीच किती गंभीर आहेत, हे संपूर्ण देशाला पाहावयास मिळाले.

संसदेच्या सभागृहातील या राजकीय नाट्यानंतरही आता परीक्षा पद्धतीतील गैरव्यवहारास आळा घालण्यासाठी अधिक कडक कारवाईची तरतूद असलेले विधेयक लोकसभेत मंजूर झाले आहे. आता अधिक कठोर कायदा अस्तित्वात येईल आणि सार्वजनिक परीक्षांमधील पेपरफुटीसारख्या, वर्षानुवर्षे सुरू असलेल्या गैरप्रकारांवर कायद्याचा वचक बसेल अशी अपेक्षा करावयास हरकत नाही. कारण, कायद्याचे राज्य ही कोणत्याही लोकशाहीची खरी ओळख असते. अर्थात, केवळ कायदे अस्तित्वात असल्याने कायद्याचे राज्य प्रस्थापित होत नाही; तर प्रत्येक व्यक्ती, संस्था आणि सत्ताधारी हे कायद्यापुढे समान आहेत, ही भावना आणि कायद्याची बंधने मानण्याची मानसिकताही समाजात रुजणे गरजेचे असते. आजही देशात कायद्यांची कमतरता नाही. गुन्हेगारी स्वरूपाच्या कोणत्याही कारवायांना आळा घालण्यास समर्थ असलेले अनेक कायदे देशात अस्तित्वात आहेत. तरीही, त्यांची प्रभावी, निष्पक्ष आणि सातत्यपूर्ण अंमलबजावणी हे आव्हानही त्यासोबत कायम आहे. एखादा कायदा किंवा एखादे संविधान कितीही चांगले असले, तरी कायदा किंवा संविधानाचे पालन करणारे लोक चांगले नसतील तर कायदे वा संविधानही निष्प्रभ ठरते असे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी संविधान सभेत बजावले होते. आजच्या परिस्थितीत त्यांचा हा इशारा अधिक समर्पक ठरू पाहत आहे. संसदेमध्ये कामकाजादरम्यान जे काही पाहावयास मिळते, त्यामध्ये संसदेच्या परंपरा आणि पावित्र्याचे पालन करण्याबाबतची आणि समाजात कायद्याचे व संविधानाचे पालन करण्याची मानसिकता रुजविण्याचे आव्हान बाबासाहेबांच्या इशाऱ्यानंतरची दशके उलटून गेल्यावर आजही कायम आहे, असा याचा स्पष्ट अर्थ आहे. संसदेतील कामकाजाच्या नियमाहून कोणीही मोठे नाही आणि कोणासही कायद्यापेक्षा वरचे स्थान नाही, ही कायद्याचे राज्य या संकल्पनेचा गाभा आहे. आज या संकल्पनेची खरी कसोटी सुरू असल्याचे दिसते. या संकल्पनेचा आदर व्यक्त व्हावा अशी अपेक्षा असलेल्यांच्या वर्तनातच त्याचा अभाव असेल, तर कायद्यावरील आणि व्यवस्थेवरील लोकांचा विश्वासही कमी होण्याचा धोका निर्माण होतो. कोणत्याही कायद्याचे पालन करणे ही सक्ती नव्हे, तर स्वयंशिस्त असली पाहिजे आणि ती शिस्त सामाजिक संस्कारातून रुजली पाहिजे, ही बाबही आता अधिक ठळकपणे अधोरेखित होऊ लागली आहे. कारण, कायदा आणि नागरिक यांच्यातील विश्वासाचे नाते जितके दृढ होईल, तितकी लोकशाही अधिक सुदृढ होईल. अन्यथा कायद्यांची रुंदी वाढत जाईल, पण न्यायाची उंची मात्र कमी होत जाईल. लोकशाहीची खरी ताकद लोकांच्या विश्वासात असते. कायद्याची भीती काही काळ शिस्त निर्माण करू शकते; परंतु कायद्यावरील विश्वासच कायमस्वरूपी सुसंस्कृत समाज घडवू शकतो. विरोधी पक्षांकडून विधेयकाचे राजकारण केले जात असल्याचा आरोप सभागृहात केंद्रीय मंत्री जितेंद्र सिंह यांनी केला. राहुल गांधी यांनी सभागृहात वापरलेली भाषा असंसदीय आहे, असा आक्षेप सत्ताधाऱ्यांकडून वारंवार घेतला गेल्यानंतरही त्याच शब्दांचा खेळ करण्याचे प्रयत्न होत असल्याचे दिसूनही आले. राहुल गांधी यांचे असंसदीय शब्दांचे खेळ आणि चर्चेस राजकीय रंग देण्याचा प्रयत्न यामुळे कामकाजाचा नूर पालटून गेल्याचे देशाने पाहिले आणि विरोधी पक्षनेत्याने गंभीर्याने बोलले पाहिजे ही किमान अपेक्षादेखील केविलवाणी ठरली. तरीही हे परीक्षा पद्धतीतील गैरव्यवहारांना लगाम घालण्यासाठीचे महत्त्वाचे विधेयक सभागृहाने संमत केले, म्हणून त्याचे स्वागत करावयास हवेच! २० जुलै रोजी सुरू झालेल्या संसदेच्या अधिवेशनाने आठवडाभर केवळ गदारोळच अनुभवला. सरकारने टाकलेल्या एका निर्णायक पावलामुळे ती कोंडी आता फुटली आहे. ■

## अर्थविशेष

# वेळेत कर पालन म्हणजे आर्थिक सुरक्षिततेची गुरुकिल्ली

**ॲड. हितेश पारसे**

आर्थिक वर्ष संपल्यानंतर प्रत्येक करदात्यापुढे एक महत्त्वाचे काम असते, ते म्हणजे आयकर विवरणपत्र (आयकर विवरणपत्र – आयटीआर) दाखल करणे. अनेक नागरिकांना वाटते की, 'माझा कर कापला गेला आहे', 'माझे उत्पन्न कमी आहे' किंवा 'नंतरही रिटर्न भरता येईल'. परंतु हा गैरसमज अनेक वेळा आर्थिक नुकसान, दंड, व्याज आणि भविष्यातील अडचणींचे कारण ठरतो. आर्थिक वर्ष २०२५-२६ (निर्धारण वर्ष २०२६-२७) साठी ज्या करदात्यांची खाती लेखापरीक्षण (लेखापरीक्षण) करण्याची आवश्यकता नाही, अशा करदात्यांनी आपले आयकर विवरणपत्र ३१ जुलै २०२६ पर्यंत दाखल करणे आवश्यक आहे. खालील करदात्यांनी ३१ जुलै २०२६ पर्यंत आयकर विवरणपत्र दाखल करणे अपेक्षित आहे (ज्यांना कर लेखापरीक्षण लागू नाही) : पगारदार कर्मचारी, निवृत्ती वेतनधारक, घरभाडे उत्पन्न असलेले करदाता, बँक व्याज, मुदत ठेवी, लाभांश किंवा इतर स्रोतांमधून उत्पन्न मिळणारे व्यक्ती, शेअर्स, म्युच्युअल फंड किंवा मालमत्ता विक्रीमधून भांडवली नफा मिळविणारे व्यक्ती, हिंदू अविभक्त कुटुंब ज्यांना लेखापरीक्षणाची आवश्यकता नाही. ज्या करदात्यांच्या खात्यांचे लेखापरीक्षण आवश्यक आहे, त्यांच्यासाठी आयकर कायद्यानुसार वेगळी अंतिम मुदत निश्चित करण्यात आलेली आहे.

**वेळेत आयकर विवरणपत्र दाखल करण्याचे प्रमुख फायदे**

१. उशिरा रिटर्न भरल्यामुळे होणारा दंड टाळता येतो. नियत मुदतीनंतर रिटर्न भरल्यास आयकर कायद्याच्या कलम २३४ एफ अंतर्गत विलंब शुल्क भरावे लागू शकते. याशिवाय कर थकबाकी असल्यास त्यावर व्याजही लागू शकते. २. व्याजाची बचत होते : जर कराची काही रक्कम बाकी असेल तर विलंबामुळे कलम २३४ए, २३४बी आणि २३४सी अंतर्गत व्याज लागू शकते. वेळेत रिटर्न भरल्याने हा अतिरिक्त खर्च टाळता येतो. ३. व्यवसायातील किंवा भांडवली तोटा पुढे नेण्याचा अधिकार मिळतो : हा वेळेत रिटर्न भरण्याचा सर्वांत मोठा फायदा आहे. जर एखाद्या करदात्याला व्यवसायात तोटा झाला असेल, शेअर्समध्ये तोटा झाला असेल, म्युच्युअल फंड विक्रीत नुकसान झाले असेल, मालमत्ता विक्रीत भांडवली तोटा झाला असेल, तर हा तोटा पुढील वर्षांतील नफ्याविरुद्ध समायोजित करण्याचा लाभ बहुतांश प्रकरणांमध्ये वेळेत रिटर्न भरल्यासच उपलब्ध होतो. ४. आयकर परतावा लवकर मिळतो : अनेक कर्मचाऱ्यांच्या पगारातून आवश्यकतेपेक्षा जास्त टीडीएस कापला जातो. त्याचप्रमाणे अग्रिम कर भरलेल्या अनेक करदात्यांनाही परतावा मिळण्याचा अधिकार असतो. रिटर्न जितक्या लवकर दाखल कराल, तितक्या लवकर त्यावर प्रक्रिया होऊन परतावा आपल्या बँक खात्यात जमा होऊ शकतो. ५. बँक कर्ज मिळण्यास मदत होते : आज जवळपास प्रत्येक बँक खालील कर्जांसाठी मागील काही वर्षांची आयकर विवरणपत्रे मागते. नियमित आयकर विवरणपत्र भरल्यामुळे आर्थिक विश्वासार्हता वाढते. ६. उत्पन्नाचा अधिकृत पुरावा म्हणून उपयोग : आयकर विवरणपत्र हे सर्वाधिक विश्वासार्ह उत्पन्न प्रमाणपत्र मानले जाते. याचा उपयोग खालील बाबींमध्ये होतो : व्हिसा अर्ज, परदेशी शिक्षण, शासकीय निविदा, उच्च मूल्याचे आर्थिक व्यवहार, मालमत्ता खरेदी इ. ७. मालमत्ता व्यवहारात मदत : आज मोठ्या मालमत्ता व्यवहारांमध्ये निधीचा स्रोत सिद्ध करणे अत्यंत महत्त्वाचे झाले आहे. आयकर विवरणपत्रामुळे मालमत्ता खरेदीसाठी आर्थिक क्षमता सिद्ध होते. गृहकर्ज मंजूर होण्यास मदत होते. आयकर विभागाकडून विचारणा झाल्यास गुंतवणुकीचा स्रोत स्पष्ट करता येतो. ८. आयकर विभागाच्या नोटिसा टाळण्यास मदत : आज आयकर विभागाकडे विविध स्रोतांमधून माहिती उपलब्ध होते. रिटर्न भरण्यापूर्वी ही माहिती तपासून योग्य प्रकारे रिटर्न दाखल केल्यास भविष्यातील नोटिसा टाळता येतात. ९. आर्थिक विश्वासार्हता वाढते : नियमित आयकर विवरणपत्र दाखल करणारी व्यक्ती आर्थिकदृष्ट्या शिस्तबद्ध मानली जाते. व्यवसाय, गुंतवणूक, भागीदारी, बँक व्यवहार आणि आर्थिक नियोजनामध्ये याचा सकारात्मक परिणाम होतो. १०. आर्थिक नियोजन करण्याची संधी : दरवर्षी रिटर्न भरताना आपण एकूण उत्पन्न, गुंतवणूक, करबचतीचे पर्याय, भांडवली नफा खर्चांचे नियोजन यांचा आढावा घेतो. यामुळे पुढील वर्षाचे आर्थिक नियोजन अधिक प्रभावीपणे करता येते.



**रिटर्न भरण्यापूर्वी कोणती कागदपत्रे तपासावीत?**

फॉर्म १६, फॉर्म २६एएस, एआयएस, टीआयएस, बँकेचे व्याज प्रमाणपत्र, शेअर्स व म्युच्युअल फंड भांडवली नफा विवरणपत्र, घरभाडे उत्पन्नाची माहिती, योग्य बँक खाते तपशील, इतर सर्व उत्पन्नाची माहिती.

**करदाते कोणत्या चुका वारंवार करतात?**

बचत खात्यावरील व्याज दाखवत नाहीत, मुदत ठेवींवरील व्याज विसरतात, शेअर्स किंवा म्युच्युअल फंड विक्रीतील नफा किंवा तोटा दाखवत नाहीत, चुकीचा आयटीआर फॉर्म निवडतात, एआयएसमधील माहिती पडताळत नाहीत, चुकीचा बँक खाते क्रमांक देतात आणि छोट्या चुका पुढे मोठ्या अडचणी निर्माण करू शकतात. प्रत्येक वर्षी अंतिम तारखेच्या काही दिवस आधी आयकर पोर्टलवर गर्दी होते. तांत्रिक अडचणी निर्माण होतात. आवश्यक कागदपत्रे मिळत नाहीत. चुकीची माहिती भरली जाते. शक्य तितक्या लवकर आयकर विवरणपत्र दाखल करणे हेच योग्य.

**निष्कर्ष** : ३१ जुलै २०२६ ही केवळ एक अंतिम तारीख नाही, तर प्रत्येक करदात्याने आपली आर्थिक जबाबदारी पार पाडण्याची संधी आहे. वेळेत आयकर विवरणपत्र दाखल केल्यास दंड व व्याज टाळता येते, परतावा लवकर मिळतो, भविष्यातील करसवलतींचे लाभ मिळतात, कर्ज मिळणे सोपे होते, मालमत्ता व्यवहार सुलभ होतात आणि आयकर विभागाच्या अनावश्यक नोटिसांपासूनही संरक्षण मिळते. आजच्या डिजिटल युगात आयकर विभागाकडे प्रत्येक आर्थिक व्यवहाराची माहिती उपलब्ध असते. त्यामुळे फॉर्म १६, फॉर्म २६एएस, एआयएस आणि टीआयएस यांची योग्य पडताळणी करूनच आयकर विवरणपत्र दाखल करणे आवश्यक आहे. 'वेळेत भरलेले आयकर विवरणपत्र ही कायदेशीर पूर्तता नसून, आपल्या आर्थिक विश्वासार्हतेची व सुरक्षित भविष्याची मजबूत पायाभरणी आहे.' ■

९०९६३३२५३

(लेखक कर व मालमत्ता हस्तांतरण सल्लागार आहेत.)

## वेध

**प्रफुल्ल व्यास**

# ही तर प्रामाणिक शेतकऱ्यांना शिक्षाच!

जगाच्या पाठीवर शेतकऱ्यांएवढा 'सहिष्णू' आणि तेवढाच 'जिद्दी' कोणीच नाही. त्याला कोण 'नागवत' नाही हे शोधून सापडणार नाही. तरीही तो राबल्याशिवाय राहत नाही. राबराब राबणे हा त्याचा जणू 'छंद' झाला आहे. तो कोणत्याच संकटांना भीत नाही. शेतकरी संघटित नाहीत म्हणून सर्वांची ठाकूरकी आहे. ते ज्या दिवशी संघटित होतील त्या दिवशी आवळा देऊन भोपळा काढणाऱ्यांना पळता भुई थोडी होईल. निसर्गाच्या कचाट्यात सापडलेला शेतकरी पिचला जात आहे. उत्पादित मालाला भाव न मिळणे हे त्यामागचे मूळ कारण आहे. शेतकरी नेते विजय जावंधिया कायम उत्पादित मालाला रास्त भाव मागणीसाठी घसा कोरडा करत आहेत. उत्पादित मालाला भाव दिल्यानंतर शेतकरी कर्जमाफीचा प्रश्नच उद्‌भवणार नाही, असे ते ठासून सांगतात. परंतु, त्यांच्या मागणीला अजून तरी सरकारने गंभीरपणे घेतले नाही. शेतकऱ्यांना 'कर्जमाफी'चे गाजर देत हलवत ठेवण्यात आमच्या सरकारी यंत्रणेला मोठा आनंद वाटतो. शेतकरी कर्जमाफी हा महाराष्ट्राच्या राजकारणाचा जणू स्थायीभाव झाला आहे. प्रत्येक सरकार येते, शेतकऱ्यांची बाजू घेत असल्याचा दावा करते, कर्जमाफीचा गाजावाजा करते. पण या साऱ्या गोंधळात एक प्रश्न प्रत्येक वेळी अनुत्तरित राहतो तो म्हणजे नियमित कर्ज फेडणाऱ्या शेतकऱ्यांचा गुन्हा काय? हा प्रश्न सरकारला कधीच पडत नसेल काय? मतांच्या राजकारणात कर्जमाफी ही आकर्षक घोषणा ठरते. मग, प्रामाणिकपणे कर्ज फेडणाऱ्या शेतकऱ्यांचे काय? महाराष्ट्रात पुन्हा एकदा यावर्षी कर्जमाफी झाली. (त्यासाठी बच्चू कडूंनी आंदोलन केले. रस्ते अडवले आणि कर्जमाफी आधीच ते मंत्रीही झाले, हा भाग अलहिदा!) कर्जमाफीतून हजारो कोटी रुपयांचा बोजा सरकार उचलणार आहे. अर्थात, शेतकऱ्यांना मदत दिलीच गेली पाहिजे. पण, आज परिस्थिती अशी आहे की, ज्याने लाखो रुपयांचे कर्ज वेळेवर फेडले, त्याला केवळ ५० हजार रुपयांचे प्रोत्साहन आणि ज्याने कर्ज फेडलेच नाही, त्याचे लाखो रुपयांचे कर्ज एका झटक्यात माफ. हा न्याय आहे की प्रामाणिकपणाची शिक्षा?

कर्जमाफीची घोषणा होताच गावागावात एकच चर्चा सुरू झाली की वेळेवर कर्ज भरून मूर्खपणा केला. ही भावना समाजात वाढत असेल, तर त्यासाठी जबाबदार कोण? कर्ज फेडू नका, एक दिवस सरकार माफ करेल. ही मानसिकता भविष्यात धोकादायक आहे. महाराष्ट्रात गेल्या दशकात वारंवार कर्जमाफी झाली. तत्कालीन पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंग, २०१४ मध्ये वर्धा जिल्ह्यातील डोर्ली हे 'गाव विकणे आहे' या एका फलकावरून तेथे भेट देण्यासाठी आले होते. जावंधिया यांनी शेतकऱ्यांची परिस्थिती त्यांच्या डोळ्यापुढे उभी केली आणि नागपुरात पत्रकार परिषद घेऊन पंतप्रधान डॉ. सिंग यांनी देशातील पहिली शेतकरी कर्जमाफी जाहीर केली होती. (देशातील पहिली शेतकरी आत्महत्याही वर्धेतच झाली होती.) त्यानंतर २०१७, २०१९ आणि आता २०२६ मध्ये राज्य सरकारने कर्जमाफी केली. सरकारे बदलली, घोषणा बदलल्या, निकष बदलले. पण, शेतकऱ्यांचे प्रश्न कायम राहिले. जर प्रत्येक काही वर्षांनी कर्जमाफी करावी लागत असेल तर याचा अर्थ एकच सरकार प्रश्न सोडवत नाही, फक्त दिवस ढकलत आहे. कर्जमाफी हा उपाय नाही. उत्पादनाला योग्य भाव मिळाला असता तर कर्जमाफीची गरजच निर्माण झाली नसती. आजही शेतकऱ्यांना त्यांनी उत्पादित केलेल्या मालाला उत्पादन खर्चानुसार योग्य भाव दिला तर कर्जमाफीची गरजच नाही, हे खुद्द शेतकरीच सांगतात. परंतु, बऱ्याचदा निसर्ग शेतीला पोषक नसतो. त्यावर शेतकरी कसाबसा मात करतो. शेतातील पीक काढतो. बाजारात ते विकण्यासाठी गेला की भावबाजीत फसतो. यावर्षी शेतकऱ्यांच्या घरातील कापूस विकला गेला. व्यापाऱ्यांच्या गोदामात जमा झाला आणि कापसाचे भाव वधारले होते. अशीच परिस्थिती दरवर्षी आम्ही अनुभवतो आहोत. या संपूर्ण व्यवस्थेत सर्वाधिक पिचला जातो तो नियमित कर्जफेड करणारा शेतकरी. त्याला फक्त ५० हजार रुपयांचे प्रोत्साहन! ज्याने ३ लाख रुपये भरले, त्याला ५० हजार! ज्याने भरलेच नाहीत, त्याचे २ लाख माफ हा कोणता न्याय म्हणावा? चुकीला बक्षीस आणि योग्य वर्तनाला शिक्षा असेच म्हणावे लागेल. यातून नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांचा विश्वास तुटतो आहे. या कर्जमाफीमुळे भरणारे आणि न भरणारे असा दुजाभाव होता कामा नये! ■

९८८१९०३७६५

## डिजिटल जागृती

**सीए अभय सगदेव**

# वैयक्तिक माहिती वापरली जाऊ शकते?

कल्पना करा... तुम्ही नियमित रक्ततपासणीसाठी निदान केंद्रात जाता. तुमचा रक्तनमुना घेण्यापूर्वी स्वागत कक्षावरील व्यक्ती तुमचे नाव, वय, मोबाईल क्रमांक, पत्ता, ई-मेल आणि आधार क्रमांक विचारते. आपल्यापैकी बहुतेक जण एकही प्रश्न न विचारता ही माहिती देतात. पण आपण प्रश्न विचारला पाहिजे का?

या परिस्थितीत दोन महत्त्वाच्या भूमिका समजून घेणे आवश्यक आहे. ज्या व्यक्तीची माहिती विचारली जाते ती व्यक्ती म्हणजे डाटा प्रिंसिपल (ज्या व्यक्तीशी वैयक्तिक माहिती संबंधित आहे ती व्यक्ती). निदान केंद्र, रुग्णालय, बँक, शाळा, खरेदीचे संकेतस्थळ किंवा इतर अशी संस्था, जी माहिती का आणि कशी वापरायची हे ठरवते, ती सामान्यतः डाटा फिड्युशिअरी (वैयक्तिक माहिती कोणत्या उद्देशासाठी आणि कशा प्रकारे प्रक्रिया करायची हे ठरवणारी व्यक्ती किंवा संस्था) असते.

डिजिटल वैयक्तिक माहिती संरक्षण कायदा, २०२३ अर्थात डीपीडीपी ॲक्टचा केंद्रबिंदू म्हणजे डाटा प्रिंसिपलची वैयक्तिक माहिती आणि गोपनीयतेचे संरक्षण. या उद्दिष्टाला घटनात्मक आधार आहे. निवृत्त न्या. के. एस. पुट्टास्वामी विरुद्ध युनियन ऑफ इंडिया या प्रकरणात, सर्वोच्च न्यायालयाच्या नऊ न्यायमूर्तींच्या खंडपीठाने २०१७ मध्ये गोपनीयतेचा अधिकार हा भारताच्या संविधानाखालील मूलभूत अधिकार असल्याचे मान्य केले. डीपीडीपी ॲक्ट डिजिटल जगात वैयक्तिक माहितीची जबाबदारीने प्रक्रिया व्हावी यासाठी नियम घालून या घटनात्मक मूल्याला व्यवहारात आणतो. हा कायदा डाटा फिड्युशिअरीला वैयक्तिक माहिती गोळा करण्यास प्रतिबंध करत नाही. आजच्या जीवनात सेवा देण्यासाठी संस्थांना अनेकदा वैयक्तिक माहितीची गरज असते. डॉक्टरांना उपचारासाठी रुग्णाची माहिती आवश्यक असते. बँकेला खाते उघडण्यासाठी आणि चालवण्यासाठी माहिती हवी असते. याच ठिकाणी नोटीस महत्त्वाची ठरते. नोटीस डाटा फिड्युशिअरीकडून दिली जाणारी सूचना, ज्यामध्ये वैयक्तिक माहिती का गोळा केली जात आहे आणि तिची प्रक्रिया कशी होईल हे स्पष्ट केले जाते) ही डाटा प्रिंसिपलला कोणती वैयक्तिक माहिती मागितली जात आहे, ती कोणत्या उद्देशासाठी मागितली जात आहे, तिच्यावर कोणती प्रक्रिया होणार आहे, कायद्यातील हक्क कसे वापरायचे आणि डाटा प्रोटेक्शन बोर्ड ऑफ इंडियाकडे तक्रार कशी करायची, हे समजण्यास मदत करणारी असावी. कायद्यातील क्रम महत्त्वाचा आहे. डीपीडीपी ॲक्टच्या कलम ५ नुसार डाटा फिड्युशिअरीने डाटा प्रिंसिपलकडून कन्सेंट मागण्याच्या वेळी किंवा त्यापूर्वी नोटीस देणे आवश्यक आहे. साध्या भाषेत, एखाद्या व्यक्तीला माहिती का हवी आहे आणि तिचा वापर कसा होणार आहे हे आधी सांगितले पाहिजे; त्यानंतरच त्या व्यक्तीकडून संमती मागितली पाहिजे. अर्थपूर्ण नोटीसशिवाय घेतलेली कन्सेंट माहितीपूर्ण निर्णय घेण्याच्या उद्देशाला पूर्ण करू शकत नाही. डीपीडीपी रुल्स, २०२५ या तत्त्वाला अधिक बळ देतात. नोटीस इतर कोणत्याही माहितीपासून स्वतंत्रपणे समजण्यासारखी असावी. ती स्पष्ट आणि सोप्या भाषेत असावी. किमान, कोणती वैयक्तिक माहिती प्रक्रिया होणार आहे, प्रक्रिया करण्याचा नेमका उद्देश काय आहे आणि त्या प्रक्रियेमुळे कोणत्या विशिष्ट वस्तू, सेवा किंवा उपयोग शक्य होतात, हे तिने स्पष्टपणे सांगितले पाहिजे. नोटीस ही दीर्घ आणि सर्वसाधारण सेवेच्या अटीमध्ये लपवलेली नसावी किंवा असंबद्ध कायदेशीर अटी व गोंधळात टाकणाऱ्या संदर्भांमध्ये दडवलेली नसावी. नोटीसने डाटा प्रिंसिपलला कृती करण्याचा व्यावहारिक मार्गही दिला पाहिजे. त्यामध्ये डाटा फिड्युशिअरीच्या संकेतस्थळाचा किंवा ॲपचा संपर्क-दुवा असावा आणि कन्सेंट मागे घेण्यासाठी, कायद्यातील हक्क वापरण्यासाठी व बोर्डकडे तक्रार करण्यासाठी उपलब्ध मार्ग स्पष्ट केलेले असावेत.

नोटीस मिळाल्यानंतर, आवश्यक त्या परिस्थितीत डाटा प्रिंसिपल कन्सेंट देऊ शकतो. उदा. एखाद्या दवाखान्याला एसएमएसद्वारे अपॉईंटमेंटची आठवण करून द्यायची असेल, तर तो उद्देश स्पष्ट असला पाहिजे. ऑनलाईन खरेदीच्या प्लॅटफॉर्मला ग्राहकांची माहिती विपणन संदेशांसाठी वापरायची असेल, तर ग्राहकाला नेमके कशासाठी संमती देत आहे हे समजले पाहिजे. कन्सेंट ठरावीक उद्देशाशी जोडलेली असावी; ती भविष्यातील प्रत्येक वापरासाठी सर्वसाधारण परवानगी बनू नये.

कन्सेंट कायमस्वरूपी नसते. ज्या ठिकाणी माहिती प्रक्रिया करण्याचा आधार कन्सेंट असतो, त्या ठिकाणी डाटा प्रिंसिपलला ती कोणत्याही वेळी मागे घेण्याचा अधिकार असतो. कायदा सांगतो की कन्सेंट मागे घेणे हे कन्सेंट देण्याइतकेच सोपे असले पाहिजे. कायद्यात सर्टन लेजिटिमेट यूजस (कायद्यात स्पष्टपणे नमूद केलेल्या काही परिस्थिती, ज्यामध्ये कन्सेंट न घेता वैयक्तिक माहितीची प्रक्रिया करता येते) यांनाही मान्यता आहे. प्रत्येक अत्यावश्यक कामासाठी दरवेळी नव्याने कन्सेंट घ्यावी लागली, तर समाजातील अनेक आवश्यक प्रक्रिया चालू शकणार नाहीत. म्हणून नोटीस आणि कन्सेंट एकमेकांशी संबंधित असल्या तरी त्या वेगळ्या संकल्पना आहेत. नोटीस डाटा प्रिंसिपलला माहिती देते. कन्सेंट, ज्या ठिकाणी आवश्यक आहे त्या ठिकाणी, डाटा फिड्युशिअरीला माहिती प्रक्रिया करण्याची परवानगी देते. नागरिक, रुग्ण, पालक, ग्राहक आणि डिजिटल सेवा वापरणारे म्हणून आपण एक साधी सवय लावली पाहिजे : 'का?' हा प्रश्न विचारण्याची. ही माहिती का आवश्यक आहे? सांगितलेल्या उद्देशासाठी प्रत्येक तपशील खरंच आवश्यक आहे का? या माहितीपर्यंत कोणाला प्रवेश असेल? माझ्यासमोर सांगितलेल्या उद्देशापुरतीच ती वापरली जाईल का? डीपीडीपी ॲक्ट पारदर्शकता आणि विश्वासाची संस्कृती निर्माण करण्याचा प्रयत्न करतो. डाटा फिड्युशिअरी प्रामाणिकपणे माहिती देतात आणि डाटा प्रिंसिपल माहितीपूर्ण निर्णय घेतात, तेव्हा व्यक्ती आणि संस्था दोघांचाही लाभ होतो.

**दैनंदिन जीवनातील डीपीडीपी** : एखादे खरेदीचे संकेतस्थळ तुम्हाला खरेदी पूर्ण करण्यापूर्वी जन्मतारीख विचारते. लहान पण स्पष्ट प्रायव्हसी नोटीसने ही माहिती का आवश्यक आहे आणि तिचा वापर कसा होणार आहे हे सांगितले पाहिजे. खरेदीसाठी ती माहिती आवश्यक नसेल, तर ती का मागितली जात आहे हे विचारण्याचा तुम्हाला पूर्ण हक्क आहे.

**लक्षात ठेवण्यासारखे मुद्दे** : एखादी संस्था तुमची वैयक्तिक माहिती मागते किंवा वापरते तेव्हा तुम्ही डाटा प्रिंसिपल असता; ती माहिती का आणि कशी वापरायची हे ठरवणारी संस्था सामान्यतः डाटा फिड्युशिअरी असते; डीपीडीपी ॲक्ट वैयक्तिक माहिती आणि गोपनीयतेचे संरक्षण करतो; पुट्टास्वामी निर्णयाने गोपनीयतेला मूलभूत अधिकाराचा दर्जा दिला आहे; कन्सेंट मागण्याच्या वेळी किंवा त्यापूर्वी नोटीस दिली जाणे आवश्यक आहे.

पुढच्या वेळी कोणी तुमची वैयक्तिक माहिती विचारेल, तेव्हा तुम्ही नम्रपणे विचाराल का : 'ही माहिती का आवश्यक आहे, तिचा वापर कसा होणार आहे आणि मी माझी कन्सेंट नंतर कशी मागे घेऊ शकतो?' ■

sagdeo1@gmail.com

## मोर्चाचे गांभीर्य नष्ट झाले

शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्यासाठी पुण्यात निघालेल्या मोर्चाचा मी एक प्रत्यक्षदर्शी साक्षीदार आहे. विद्यार्थ्यांनी त्यांच्या मागण्यांसाठी मोर्चा काढणे यामध्ये काही गैर नाही, पण या मोर्चामध्ये अनेक बाह्य घटक घुसलेले दिसले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याबद्दल अत्यंत अश्लील भाषेमध्ये घोषणा दिल्या जात होत्या, ज्या ऐकून या आंदोलनाचे पाठीराखे होते, त्यांची मान शरमेने खाली गेली असेल.

नरेंद्र मोदी यांच्याबद्दलचे अतिशय हीन दर्जाचे पोस्टर्स तेथे फडकवले जात होते. अनेक विद्यार्थी म्हणणारे युवक फक्त सेल्फी काढणे आणि आरडाओरडा करणे, हुल्लडबाजी करणे यात मश्गूल दिसले. चक्क काही पाचवी, सहावीतली मुले सुद्धा यामध्ये इकडे तिकडे पळत होती. या सर्व गोष्टींमुळे मोर्चाचे गांभीर्य नाहीसे झाले आणि आंदोलन करणाऱ्यांबद्दलचा आदरही नाहीसा झाला.

**शैलेश परांजपे**/बिबवेवाडी, पुणे

## वाचक पत्रे

## यापूर्वी आलेल्या पावसाचा अनुभव



मंगळवारी नागपूर शहरात अतिवृष्टी झाली. अवघ्या ३ तासांत सुमारे १८० मिमी (म्हणजेच जवळपास ७ इंच) पाऊस पडला; म्हणजेच ताशी ६० मिमी (किंवा २ इंच) इतका पाऊस झाला. माझे वय ७२ वर्षे आहे आणि मी दरवर्षीच इतक्या तीव्रतेचा पाऊस नागपुरात अनुभवला आहे.

सुमारे दहा वर्षांपूर्वीचा पाऊस आणि आताचा पाऊस यातला फरक असा आहे की, पूर्वी इतक्या तीव्रतेचा पाऊस एका तासापेक्षा कमी किंवा जास्तीत जास्त दीड तास पडायचा. मला अशा दोन घटना स्पष्टपणे आठवतात; त्यापैकी एक ७० च्या दशकाच्या सुरुवातीची होती आणि दुसरी १९९४ मधली. तेव्हाही नागपुरात पूर आला होता.

आता अशा प्रकारची अतिवृष्टी दर २-३ वर्षांतून एकदा होत आहे. २३ सप्टेंबर २०२३ रोजी झालेला अतिवृष्टीचा पाऊस देखील असाच होता. मी १९७५ पासून, म्हणजेच सुमारे ५१ वर्षांपासून स्थापत्य अभियंता म्हणून आणि गेल्या २६ वर्षांपासून सल्लागार म्हणून कार्यरत आहे. शहरातील पावसाचे पाणी वाहून नेणाऱ्या बहुतांश वाहिन्यांची मूळ रचना ताशी २५ मिमी (१ इंच) इतक्या तीव्रतेच्या पावसाचा विचार करून करण्यात आली आहे. त्यामुळे, जमिनीवरील अतिरिक्त पाणी वेगाने वाहून जात नाही आणि पूरसदृश परिस्थिती निर्माण होते.

माझा अनुभव असा आहे की, जेव्हा डिझायनर्स पावसाच्या पाण्याचा निचरा करणाऱ्या वाहिन्यांची रचना ताशी ६० मिमी (किंवा २ इंच) इतक्या तीव्रतेचा पाऊस गृहीत धरून करण्याची शिफारस करतात, तेव्हा सरकारी किंवा खाजगी अशा कोणत्याही प्रकारच्या संबंधित संस्था (एम्प्लॉयर्स) त्यापेक्षा अधिक क्षमतेची रचना करण्यास परवानगी देत नाहीत.

कालच्यासारखाच पाऊस जर सलग ३ तास पडला, तर मला वाटते की आपण सुरक्षिततेच्या दृष्टीने शहरातील ड्रेनेज यंत्रणेची रचना किमान ताशी ७५ मिमी (किंवा ३ इंच) पावसाची तीव्रता लक्षात घेऊन नव्याने केली पाहिजे. वारंवार कालच्यासारख्या परिस्थितीचा सामना करणे शहराला परवडणारे नाही.

**सतीश साल्पेकर**/९७६३७०२६१६

## सदाचरण व सत्कर्माने माणूस सुखी-समाधानी

व्यक्तीच्या जीवनात सदा सर्वदा आपले आचरण, वर्तन, नीतिमत्ता, नैतिकता, कर्म, कर्तव्ये सकारात्मक व प्राणी मात्रांच्या कल्याणाची असतील तर अशी व्यक्ती आपल्या जीवनात सुखी, समाधानी व आनंदी असते.

सदगुण व मनाच्या निर्मळतेने व पावित्र्याने मनुष्य सुखी होत असतो. शील म्हणजे सदाचार व शील म्हणजेच सद्वर्तन. व्यक्तीच्या जीवनात शारीरिक व मानसिक निर्मळता हवी. माणसाने सतत विधायक व सकारात्मक कर्मे करावीत. कुणाचेही अहित चिंतू नये. माणसाने आपल्या जीवनात सतत चांगल्या व शुभ भावनेने समाजात वावरावे. स्वामी विवेकानंदानी म्हटलेले आहे, आपल्या आत्म्याशी एकरूप होणे म्हणजे खरा धर्म आहे.

आत्मा हा ब्रह्मस्वरूप आहे. या भूतलावरील सर्व मानवजात प्रभूची लेकरे व प्रभूचे दास आहेत. मनुष्यस्वरूपातच ईश्वर आहे. यास्तव या भूतलावरील प्रत्येकाने आपला ईश्वरी धर्म जो शुद्ध, निर्मळ व निकोप आहे तो पाळावा. आपल्या भावभावना निर्मळ व स्वच्छ ठेवून समाजात सामाजिक नाती जपावी. यातच खरे सुख व समाधान सामावलेले आहे. ■

**धोंडीरामसिह राजपूत**/९४२१३१२२४४

# स्वच्छ पंढरी, सुंदर पंढरी व हरित पंढरी अभियान उत्साहात

## भारत स्काऊटस् आणि गाईडस्‌चा उपक्रम




**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर दि ३० जुलै-**

सोलापूर भारत स्काऊटस् आणि गाईडस् जिल्हा कार्यालयाच्या वतीने पंढरपुरात आषाढी एकादशीच्या पवित्र पर्वानिमित्त स्वच्छ पंढरी, सुंदर पंढरी व हरित पंढरी अभियान उत्साहात राबविण्यात आले.

स्काऊट गाईड कार्यालय, गटशिक्षणाधिकारी कार्यालय पंढरपूर व नगरपरिषद पंढरपूर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित अभियानात विठ्ठल मंदिर व चंद्रभागा परिसरामध्ये स्वच्छता सेवा प्रकल्प राबविण्यात आला. पंढरपूर नगरपालिकेचे मुख्याधिकारी महेश रोकडे, पंढरपूरचे गटशिक्षणाधिकारी रणदिवे, जिल्हा प्रशिक्षण आयुक्त स्काऊट शंकर यादव, जिल्हा प्रशिक्षण आयुक्त गाईड सुलक्षणा लोखंडे, जिल्हा आयुक्त प्रौढ संसाधन रशिद पठाण, जिल्हा संघटक स्काऊट श्रीधर मोरे, जिल्हा संघटक गाईड अनुसया सिरसाठ आदी मान्यवरांच्या हस्ते अभियानाचे उदघाटन करण्यात आले.

या अभियानात स्काऊट गाईड विद्यार्थ्यांनी वारकरी मार्गावर आठ हजार सीडबॉल तयार करुन त्यांचे योग्य ठिकाणी वितरण व रोपण करण्यात आले. श्री रामभाऊ जोशी हायस्कूलच्या बँण्ड पथकासह शहर जिल्ह्यातील स्काऊट गाईडच्या विद्यार्थ्यांनी शिवाजी पुतळा, मंदिर परिसर, दगडी पुल, चंद्रभागा नदी परिसर आदी परिसरातून स्वच्छता रॅली काढून जनजागृती केले. रॅलीतून स्काऊटर-गाईडरने स्वच्छतेचे फलक, पर्यावरण, वृक्षसंवर्धन तसेच बेटी बचाव बेटी पढाव, स्वच्छता, पर्यावरण संरक्षण, प्लास्टिकमुक्त परिसर आणि सामाजिक सेवेबाबत रॅलीद्वारे जनजागृती केले. यानंतर स्वच्छता अभियान राबविण्यात आले. यावेळी मोठया प्रमाणात कचरा गोळा करण्यात आला. स्वच्छ पंढरी, सुंदर पंढरी व हरित पंढरी हा संदेश समाजात प्रभावीपणे पोहोचविण्याचा प्रयत्न करण्यात आले. तसेच गाईड कॅप्टन तृप्ती खोबरे गाईडर यांनी हॅन्ड वॉशबाबतची प्रात्यक्षिक दाखविली. अभियान यशस्वी होण्यासाठी महेश भोसले, परमेश्वर चांदोडे, सोमेश्वर यंपे, बाळासाहेब शिंगाडे, सम धान बेद्रे, योगेश उपळकर, अशपाक मुजावर, महादेव पुजारी, महेश कोरे, प्रमोद जाधव, कुलश घागरे, समर्थ कुंभार, वैभव जाधवर, माने, रेशमा नामदे, रोकडे, तृप्ती खोबरे, चंदनशिवे, नागनाथ घाटुळे, जाधव, खपाले, अमोल चंदनशिवे, दगडे, सोमनाथ देवकते, प्रशांत रायचुरे, हौदे, मधुरा गुळवे, वैष्णवी सगट व कार्यालयीन कर्मचारी आदींनी परिश्रम घेतले.

### या शाळांनी घेतला सहभाग

या अभियानात श्री मल्लिकार्जुन हायस्कूल सोलापूर, श्री. दिगंबर जैन गुरुकूल प्रशाला सोलापूर, माध्यमिक प्रशाला वडवळ, जि.प.प्रा.शाळा, बार्डी, राष्ट्रमाता इंदिरा कन्या प्रशाला मोहोळ, विवेक वर्धिनी विदयालय पंढरपूर, श्रीम. माताजी निर्मलादेवी विदयालय पंढरपूर, श्री.स्वामी समर्थ प्रशाला अरळी, रामभाऊ जोशी हायस्कूल करकंब, न्युं इंग्लिश स्कूल करकंब, श्री. दुर्गा शिशु विहार प्राथ शाळा इसबावी, कर्मवीर विदयालय चारे, महाराष्ट्र विदयालय बार्शी, आर्या पब्लिक स्कूल पिपंळनेर, श्री. गगनगिरी विदयालय सांगवी, श्री. दत्त विदया मंदिर सुस्ते, लोटस इंग्लिश स्कूल, कासेगाव, सांगोला विदयामंदिर सांगोला, न्यु इंग्लिश स्कूल, गादेगाव, जि.प.प्रा.शाळा शेटे वस्ती क्र.१ व रोव्हर रेंजर ट्रुप आदी शाळेतील ८५२ स्काऊट गाईड व ९२ स्काऊटर गाईडर या अभियानात सहभाग घेतले.

## महत्वाचे...



## फिरती विज्ञान प्रयोगशाळा उपक्रमास विद्यार्थ्यांचा प्रतिसाद

**सोलापूर, दि. ३० जुलै-**

कै. विलासचंद्र मोतीचंद मेहता माध्यमिक प्रशालेत सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ आणि एलजी इलेक्ट्रॉनिक्स यांच्या संयुक्त विद्यमाने फिरती विज्ञान प्रयोगशाळा हा उपक्रम संपन्न झाला. या फिरत्या विज्ञान प्रयोगशाळेमध्ये विद्यार्थ्यांना विविध वैज्ञानिक उपकरणे प्रत्यक्ष हाताळण्याची व प्रयोग करून पाहण्याची संधी मिळाली. लिक्विड नायट्रोजन (द्रवरूप नायट्रोजन) वापरून सादर करण्यात आलेल्या रंजक प्रयोगांनी विद्यार्थ्यांना आश्चर्याचा सुखद धक्का दिला. तसेच इलेक्ट्रिक मोटर, मॅग्नेट सिस्टीम, इलेक्ट्रिक करंट आदी विषयांवरील प्रात्यक्षिकांमुळे विद्यार्थ्यांना विज्ञानातील संकल्पना प्रत्यक्ष अनुभवातून समजून घेता आल्या. कार्यक्रमासाठी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे राहुल जगताप, निशान जगताप व त्यांच्या संपूर्ण टीमने उपस्थित राहून विद्यार्थ्यांना सोप्या, प्रभावी आणि रंजक पद्धतीने मार्गदर्शन केले. कार्यक्रमास मुख्याध्यापिका श्रुती बागेवाडी, पर्यवेक्षिका मीनाक्षी भाटवडेकर तसेच नियामक मंडळ सदस्य सुरेश मंकणी यांची प्रमुख उपस्थिती लाभली. सूत्रसंचालन विज्ञान विभाग प्रमुख आनंद केसकर यांनी केले.



## नूमवि शाळेत गुरुपौर्णिमा साजरी

**सोलापूर, दि. ३० जुलै-**

नू.म.वि. मराठी शाळेत गुरुपौर्णिमा साजरी करण्यात आली. या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून भरत कासले व मुख्याध्यापिका स्मिता माळवदकर उपस्थित होत्या. कार्यक्रमाची सुरुवात क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले व वाल्मिकी ऋषी यांच्या प्रतिमा पूजनाने झाली. मुख्याध्यापिका स्मिता माळवदकर यांनी प्रास्ताविक केले. इयत्ता पहिलीचे जिजामाता व छत्रपती शिवाजी महाराजांचा प्रसंग सृष्टी लोखंडे, अबीर कुलकर्णी दुसरीतून ज्ञानेश्वर व निवृत्तीनाथ यांचा प्रसंग आरव शेळ्ळे, आयुब शेळ्ळे इयत्ता तिसरीतून स्वामी विवेकानंद व परमहंश यांचा संवाद हर्ष गणेशकर, वरद उंबरे. चौथीतून कृष्ण व अर्जुन यांचा गुरु शिष्याचा जोड्यातून प्रसंगाचे सादरीकरण गंधर्व कांबळे, प्रणव माळी यांनी केले. संगीता बिराजदार यांनी सूत्रसंचालन केले तर रेणुका हिरेमठ यांनी आभार मानले.

## लग्न न लावल्याच्या कारणावरुन विनयभंग, एकावर गुन्हा

**मंगळवेढा, दि.३० जुलै -**

तुझे आई वडीलांनी तुझयाशी माझे लग्न लावून दिले नाही, तु तुझया नवऱ्यासोबत कसा संसार करते ते बघतोच अशी धमकी देवून एका २० वर्षीय विवाहित महिलेच्या घरात घुसून तिला लज्जा वाटेल असे कृत्य केल्याप्रकरणी अमर सिध्देश्वर पाराध्ये याच्याविरूध्द मंगळवेढा पोलिसात गुन्हा दाखल झाला आहे.

विवाहित महिला दि.२२ जुलै रोजी घरी एकटी होती. दुपारी १.३० वा. आरोपी अमर सिध्देश्वर पाराध्ये हा पिडीतेच्या घरी आला व त्याने तु मला फार आवडतेस असे म्हणत तिच्या मनाला लज्जा वाटेल असे आरोपीने कृत्य केले. घटनेचा अधिक तपास पोलिस निरिक्षक दत्तात्रय बोरिगिड्डे यांच्या मार्गदर्शनाखाली महिला पोलिस हवालदार वंदना अहिरे (घोडके) या करीत आहेत.

**मध्य रेल्वे**
**सोलापुर मंडळ**
**विद्युत टीआरडीचे कार्य**

वरिष्ठ मंडळ विद्युत अभियंता (टीआरडी), मध्य रेल्वे, सोलापूर हे भारताच्या राष्ट्रपतींच्या वतीने, नामांकित, अनुभवी आणि परवानाधारक इलेक्ट्रिकल कंत्राटदारांकडून खालील कामासाठी रेल्वेच्या ई-प्रोक्योरमेंट संकेतस्थळावर www.ireps.gov.in ऑनलाईन ई-निविदा मागवत आहेत. निविदा क्रमांक SUR/TD/T/2026/22R2 कामाचे नाव : सोलापूर मंडळातील सोलापूर-वाडी सेक्शनमधील अक्कलकोट रोड स्टेशनवर दोन्ही दिशांना प्रत्येकी एक लाँग-हॉल लूप लाईन तयार करण्याच्या संदर्भातील इलेक्ट्रिकल चे काम. अंदाजपत्रकीय रक्कम : १,२३,६१,२१५.७०/-, बयाणा रक्कम : २,४७,२००/-, काम पूर्ण करण्याचा कालावधी : १२ महिने, ऑफरची वैधता : ६० दिवस वेबसाईटवर निविदा बंद होण्याची तारीख व वेळ: २७/०८/२०२६ रोजी दुपारी १५:०० वाजता (३:०० वाजता)

**व. मं. वि. अ.**

तुमची जनावरे रेल्वे रुळांपासून दूर ठेवा 37

**अक्कलकोट नगरपरिषद अक्कलकोट**

**जाहीर प्रसिद्धीकरण**

जा.क्र.२०२६/न.प.अ.कोट/बांध-११/संकलन-१ कावि- १३७५ आर. आर.   दिनांक. ३०/०७/२०२६

याद्वारे तमाम मक्तेदारांना/सेवा पुरविणारे व्यक्ती/संस्था यांना कळविण्यात येते की, अक्कलकोट नगरपरिषदे मार्फत अक्कलकोट नगरपरिषदेकडे शासनाकडील येणाऱ्या कार्यालयीन माहिती सादर करणे व कार्यालयीन बांधकाम विभागाकडे संगणकीय काम करणे करीता मक्ता पद्धतीने योग्य त्या वर्गात नोंदणीकृत व अनुभवी मक्तेदाराकडून सिलबंद दरपत्रक मागविण्यात येत आहेत. कामा बाबतचा संपूर्ण तपशील शर्ती व अटी कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी कार्यालयीन वेळेत (सुट्टीच्या दिवसा व्यतिरिक्त) नगरपरिषद कार्यालयात पहावयास मिळू शकेल. तरी ज्यांना दरपत्रक द्यावयाचे असतील त्यांनी आपली दरपत्रक दिनांक ११/०८/२०२६ रोजी सायं. ४.०० वाजेपर्यंत नगरपरिषद कार्यालयात बांधकाम विभागाकडे आणून द्यावीत किंवा पाठवावेत. मुदती नंतर आलेल्या दरपत्रकचा विचार केला जाणार नाही. कोणतेही दरपत्रक स्विकारणे अथवा नाकारणे याचा हक्क राखुन ठेवणेत आलेला आहे. त्याची कारणे देणे नगरपरिषदेवर बंधनकारक नाही. यासंबंधी लागु असलेले सर्व सरकारी नियम मक्तेदारावर बंधनकारक राहतील दाखल दरपत्रक शक्यतो दिनांक ११/०८/२०२६ रोजी सायं.५.०० वा.उपस्थित मक्तेदार अगर त्यांचे अधिकृत प्रतिनिधी यांचेसमोर उघडणेत येतील.

**सही/-**
**(रमाकांत डाके)**
**मुख्याधिकारी**
**नगरपरिषद अक्कलकोट**

## कवितांनी रंगला वसुंधरा महाविद्यालयात साहित्यिक सोहळा

### ‘पत्रकारितेची गुरुकिल्ली’ व्याख्यानासह गुरुपौर्णिमा उत्साहात




**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३० जुलै-**

शाहू शिक्षण संस्था, पंढरपूर संचलित वसुंधरा कला महाविद्यालयात गुरुपौर्णिमेनिमित्त ‘पत्रकारितेची गुरुकिल्ली’ या विषयावरील व्याख्यान आणि काव्य संमेलन उत्साहात पार पडले. पत्रकार, कवी आणि गुरुजनांचा सत्कार करून गुरुपौर्णिमा साजरी करण्यात आली. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. दिगंबर झोंबाडे होते.

यावेळी प्रमुख वक्ते महापालिका पत्रकार संघाचे अध्यक्ष किरण बनसोडे यांनी ‘पत्रकारितेची गुरुकिल्ली’ या विषयावर मार्गदर्शन केले. पत्रकारितेत सत्यता, अचूकता, नैतिकता आणि संविधाननिष्ठा ही मूल्ये जपणे आवश्यक असून, पत्रकारिता हा केवळ व्यवसाय नसून समाजसेवेचा वसा आहे, असे त्यांनी सांगितले. यानंतर झालेल्या काव्य संमेलनात मुबारक शेख, रेणुका बुधाराम, मारुती कटकधोंड, पत्रकार विजय गायकवाड, रामप्रभू माने , आशुतोष नाटकर आणि शाहीर रमेश खाडे यांनी काव्य रचना सादर करून रसिकांची दाद मिळिवली. रेणुका बुधाराम यांच्या ‘कृपासिंधू’ कवितेतील ‘कधी नाही केली पंढरीची वारी, काम तेच हरी मानूनिया’ या ओळींमधून कर्मयोगाचा संदेश देण्यात आला. मुबारक शेख यांच्या ‘मेहंदी’ गझलेने रसिकांना मंत्रमुग्ध केले तर मारुती कटकधोंड यांच्या प्रेमकवितेला विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. विजय गायकवाड यांच्या ‘स्माईल’ कवितेतून आनंदाचा संदेश देण्यात आला. रामप्रभू माने यांनी ‘बाप’ कवितेतून वडिलांचे त्यागमय व्यक्तिमत्त्व उभे केले. शाहीर रमेश खाडे यांनी दमदार आवाजात सादर केलेल्या ‘ज्वारीची लावणी’ने महाराष्ट्राच्या सुगीचे वैभव उलगडले. प्रारंभी मराठी विभागप्रमुख डॉ. तानाजी देशमुख यांनी प्रास्ताविक केले. प्रा. डॉ. सुहास उघडे यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. रेश्मा सुर्वे यांनी आभार मानले.

**महाळुंग-श्रीपूर नगरपंचायत**
**ता. माळशिरस जि. सोलापूर**
E-mail: comcmahalung@gmail.com

**सार्वजनिक सूचना**

**घनकचरा व्यवस्थापन नियम, २०१६ ची अंमलबजावणी बाबत**

केंद्र शासनाच्या पर्यावरण, वने व वातावरणीय बदल विभागाच्या दिनांक २७ जानेवारी २०१६ च्या अधिसूचनेनुसार घनकचरा व्यवस्थापन नियम, २०१६ निर्गमित करण्यात आले असून सदर नियम दिनांक ०१ एप्रिल २०१६ पासून अंमलात आले आहेत. शहराच्या हद्दीतील सर्व नागरिक, व्यापारी, संस्था, गृहनिर्माण संस्था, आस्थापना, लोकप्रतिनिधी तसेच मोठ्या प्रमाणात कचरा निर्माण करणारे घट (Bulk Waste Generators) यांना सूचित करण्यात येते की सदर नियमानुसार व मा. सर्वोच्च न्यायालयाच्या नागरी अपील क्र. ६१७४/२०२३ मधील आदेशानुसार प्रत्येक नागरिक व संस्थेवर कचरा वर्गीकरण व वैज्ञानिक व्यवस्थापनाची जबाबदारी निश्चित करण्यात आलेली आहे.

**नियमानुसार प्रत्येक घर, दुकान, आस्थापना, कार्यालय, हॉटेल, बाजारपेठ, संस्था व इतर कचरा निर्मात्यांनी खालीलप्रमाणे कचऱ्याचे स्रोतावरच वर्गीकरण करणे बंधनकारक राहील-**

१) ओला कचरा- उरलेले अन्न (खरकटे), शिळे अन्न, भाजीपाला आणि फळांचे तुकडे, सुका पालापाचोळा, फुले, झाडांच्या छाटलेल्या फांद्या आणि गवत.
२) सुका कचरा- प्लॅस्टिक, कागद, वर्तमानपत्र, वह्यांची पाने, खोकी, टिशू पेपर आणि पेपर टॉवेल.
३) सॅनिटरी कचरा- डायपर्स, सॅनिटरी नॅपकिन्स इ.
४) विशेष/घातक कचरा- बॅटरी, बल्ब, औषधे, इलेक्ट्रॉनिक कचरा इ.

**नागरिकांची जबाबदारी-**
१) घरगुती कचऱ्याचे चार प्रकारात वर्गीकरण करूनच कर्मचाऱ्यांकडे/घंटागाडीत सुपूर्द करणे.
२) सार्वजनिक ठिकाणी कचरा टाकू नये.
३) प्लॅस्टिक, बांधकाम कचरा स्वतंत्रपणे देणे.
४) ओला व सुका कचरा वेगळा देणे.
५) सॅनिटरी कचरा सुरक्षिततरीत्या गुंडाळून देणे. कचरा जाळणे, नाले, रस्त्यावर टाकणे टाळावे.

**लोकप्रतिनिधींची जबाबदारी -**
१) आपल्या प्रभागात/वॉर्डात स्वच्छताविषयक जनजागृती करणे.
२) नागरिकांना कचरा वर्गीकरणासाठी मार्गदर्शन करणे.
३) स्वच्छता, कचरा प्रक्रिया व पर्यावरण संवर्धन सक्रिय सहभाग घेणे.
४) स्थानिक स्वराज्य संस्थेस सहकार्य करून घनकचरा व्यवस्थापन नियम, २०१६ बाबत प्रभावी अंमलबजावणी करणे.

(**Bulk Waste Generators(BWG**) **मोठ्या प्रमाणात कचरा निर्माण करणारे यांची जबाबदारी-**

ज्या संस्था/इमारती/संकुले यांचे क्षेत्रफळ २०,००० चौ. मी. पेक्षा जास्त आहे किंवा दररोज १०० किलोपेक्षा अधिक कचरा निर्माण होतो अथवा ४०,००० लिटर पेक्षा जास्त पाण्याचा वापर होतो, अशा आस्थापनांना Bulk Waste Generators म्हणून घोषित करण्यात आले आहे. अशा संस्थांची जबाबदारी -
१) ओल्या कचऱ्याची जागेवरच कंपोस्ट/बायोगॅस प्रक्रिया करणे.
२) कचऱ्याची स्वतंत्र साठवणूक व वर्गीकरण करणे.
३) प्रक्रिया न झालेला कचरा उघड्यावर टाकू नये.
४) स्थानिक स्वराज्य संस्थेच्या नियमांचे पालन करावे.
५) अधिकृत कचरा प्रक्रिया यंत्रणेशी समन्वय ठेवणे बंधनकारक राहील.

नियमांचे उल्लंघन करणाऱ्या व्यक्ती, संस्था किंवा आस्थापनांवर ‘‘Polluter Pays Principle’’ नुसार दंडात्मक कारवाई व पर्यावरण भरपाई आकारण्यात येईल. तरी सर्व नागरिकांनी शहर स्वच्छ, सुंदर व पर्यावरणपूरक शहर निर्मितीसाठी घनकचरा व्यवस्थापन नियम, २०१६ चे काटेकोर पालन करावे, ही विनंती.

(शिक्का)

**सही/-**
**मुख्याधिकारी**
**महाळुंग श्रीपूर नगरपंचायत**



## हरिभाई देवकरण प्रशालेत गुरुभक्ती, मातृ-पितृवंदन सोहळा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३० जुलै-**

हरिभाई देवकरण प्रशाला येथे गुरुपौर्णिमेनिमित्त संस्कार, श्रद्धा आणि कृतज्ञतेचा अनुपम संगम अनुभवायला मिळाला. इयत्ता पाचवीच्या सर्व विद्यार्थी-विद्यार्थिनींनी आपल्या आई-वडिलांचे तसेच आजी-आजोबांचे विधिवत पाद्यपूजन व औक्षण करून मातृदेवो भव, पितृदेवो भव, आचार्यदेवो भव’ या भारतीय संस्कृतीच्या दिव्य परंपरेला साक्षात वंदन केले.

संगीत शिक्षिका सावनी कुलकर्णी व विद्यार्थ्यांनी गुरु परमात्मा परेशु, गुरु मातृ पिता गीते सादर केले. साक्षी भट व ऋतुजा जहागीरदार यांनी मनोगत व्यक्त केले. पालक-शिक्षक संघाच्या उपाध्यक्षा वैशाली देशमुख, मुख्याध्यापिका स्मिता कांगुणे यांनी आई-वडील आणि गुरु यांच्या संस्कारातून घडणाऱ्या जीवनमूल्यांचा प्रेरणादायी संदेश दिला.

प्रास्ताविक मंजिरी हरहरे यांनी केले. मल्लिकार्जून घवाळे यांनी सूत्रसंचालन केले. अलका जगताप यांनी आभार मानले. उपमुख्याध्यापक रविंद्र पानसरे, पर्यवेक्षक औदुंबर सर्वगोड, महेंद्र रणधीर, गणेश नेवरे, मारुती शहाणे उपस्थित होते.

**बार्शी नगरपरिषद, बार्शी**
**(जि. सोलापूर)**

दूरध्वनी : ०२१८४-२२२२०५, २२२२१८ | e-mail: bnpbarshi@gmail.com
Web:- www.barshinagarparishad.org | e-mail : bnpbarshielection@gmail.com

जा.क्र.सा.प्र./ ४२९४ नगरपरिषद कार्यालय, बार्शी   दिनांक - ३० जुलै २०२६

**मतदार याद्याचा विशेष सखोल पुनरीक्षण कार्यक्रम २०२६**
**विशेष प्रभाग सभेचे आयोजन करणेबाबत**

बार्शी शहरातील सर्व नागरिकांना कळविण्यात येते की, मा. भारत निवडणूक आयोग यांचेकडील दि. १४ मे, २०२६ रोजीच्या पत्रान्वये महाराष्ट्रामध्ये मतदार याद्याचा विशेष सखोल पुनरीक्षण (SIR) कार्यक्रम घोषित केला असून दिनांक २०/०६/२०२६ पासून सदरचा कार्यक्रम शहरामध्ये राबविण्यात येत असून त्यानुषंगाने मतदार संघ निहाय मतदान केंद्रस्तरीय अधिकारी यांचेमार्फत मतदारांचे गणना पत्रक भरून घेवून Digitization करण्याचे काम सुरु आहे. यामध्ये स्थलांतरित, मयत, आढळ न झालेले, दुबार व वाटप न झालेले गणना पत्रकातील मतदार यांची पडताळणी करुन त्यांची नावे मतदार यादीतून वगळण्याचे काम सुरु आहे.

या प्रक्रियेविषयीच्या सद्यस्थितीची तसेच मतदार केंद्रस्तरीय अधिकारी यांनी चिन्हांकित केलेल्या स्थलांतरित, मयत, आढळ न झालेले, दुबार व वाटप न झालेले गणना पत्रकातील मतदारांची माहिती देणेकरिता खालील प्रमाणे **प्रभागनिहाय विशेष सभेचे आयोजन रविवार दिनांक ०२/०८/२०२६, सकाळी १० वाजता** करण्यात आलेले आहे. तरी सर्व नागरिक व राजकीय पक्षाचे प्रतिनिधी यांना सदर सभेस उपस्थित राहण्याचे आवाहन करण्यात येत आहे.

| अ. क्र. | सभेचे ठिकाण | समाविष्ट प्रभाग क्रमांक |
|---|---|---|
| १ | पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर नगरपरिषद शाळा क्र. १० बार्शी. | १ |
| २ | भैरवनाथ शिक्षण संस्था, आगळगाव रोड, बार्शी. | २ |
| ३ | अध्यापिका विद्यालय (डी.एड कॉलेज) बार्शी. | ३ |
| ४ | पंडित जवाहरलाल नेहरू नगरपरिषद शाळा नं. १४ बार्शी. | ४ |
| ५ | श्रीमान भाऊसाहेब झाडबुके महाविद्यालय, बार्शी | ५ |
| ६ | शेठ अगरचंद कुंकुलोळ प्रशाला, बार्शी | ६ |
| ७ | सिल्व्हर ज्युबिली हायस्कूल, बार्शी. | ७ |
| ८ | जनसेवा हायस्कूल, सोलापूर रोड, बार्शी | ८ |
| ९ | सरदार वल्लभभाई पटेल नगरपरिषद शाळा क्र. १३ (गुजराथी) बार्शी | ९ |
| १० | लोकमान्य टिळक नगरपरिषद शाळा क्र. ५ बार्शी | १० |
| ११ | लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नगरपरिषद शाळा क्र. १७ बार्शी | ११ |
| १२ | यशवंतराव चव्हाण नगरपरिषद शाळा क्र. १५ बार्शी | १२ |
| १३ | कुर्बान हुसेन सभागृह परांडा रोड, बार्शी | १३ |
| १४ | सोजर इंग्लिश स्कूल नागणे प्लॉट, बार्शी | १४ |
| १५ | अभिनव माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, बार्शी (४२२ गाडेगाव रोड) | १५ |
| १६ | संत ज्ञानेश्वर प्राथमिक विद्यामंदिर, अलिपूर रोड,बार्शी | १६ |
| १७ | जिजामाता विद्यामंदिर, पंचायत समिती जवळ, बार्शी | १७ |
| १८ | श्री. शिवाजी महाविद्यालय, बार्शी | १८ |
| १९ | सुलाखे हायस्कूल, बाळेश्वर नाका, बार्शी | १९ |
| २० | सौ. हिराबाई नेणसी शाह कन्या प्रशाला, भगवंत मैदान जवळ, बार्शी. | २० |
| २१ | महाराष्ट्र विद्यालय, बार्शी | २१ |

**सही/-**
**(तैमूर मुलाणी)**
**मुख्याधिकारी**
**बार्शी नगरपरिषद**

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



# दिलीप गावितने जिंकले ऐतिहासिक सुवर्ण

commonwealth games GLASGOW 2026

**ग्लासगो, ३० जुलै**

येथे सुरू असलेल्या २०२६ च्या राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेत भारतासाठी आणखी एक अविस्मरणीय दिवस ठरला. यात पॅरा-अॅथ्लेटिक्समध्ये भारताच्या दिलीप महादू गावित व मोहम्मद बासिल मोर्सिंगनाकाथने अनुक्रमे ऐतिहासिक सुवर्ण आणि रौप्यपदकांची कमाई केली.

पॅरा-अॅथ्लेटिक्समध्ये दिलीप गावितने पुरुषांच्या टी-४७ शंभर मीटर शर्यतीत सुवर्णपदक जिंकून आघाडी घेतली, तर मोर्सिंगनाकाथने रौप्यपदक पटकावले; अशा प्रकारे भारताने ऐतिहासिकरीत्या पहिल्या दोन क्रमांकावर स्थान मिळविले. यात दिलीप गावितने १०.७१ सेकंदांची वेळ नोंदवत 'स्पर्धा विक्रम' आणि या हंगामातील सर्वोत्तम कामगिरीसह सुवर्णपदक जिंकले. मोर्सिंगनाकथने १०.८३ सेकंदांची वेळ नोंदवून रौप्यपदक मिळविले आणि भारताला एकाच शर्यतीत दोन पदके मिळवून दिली.

**दिलीपने केली अपंगत्वावर मात**

महाराष्ट्रातील नाशिकजवळील 'तोरण डोंगरी' या छोट्याशा गावात जन्मलेला दिलीप गावित एका सामान्य शेतकरी कुटुंबात लहानाचा मोठा झाला आणि लहानपणापासूनच शेतीच्या कामात आपल्या पालकांना मदत करत असत. वयाच्या अवघ्या पाच-सहाव्या वर्षी, झाडावरून पडून झालेल्या अपघातात त्यांच्या उजव्या हाताला गंभीर दुखापत झाली. वेळेवर वैद्यकीय उपचार न मिळाल्यामुळे त्या जखमेत 'गँगरीन' (ऊतींचा ऱ्हास होणारा संसर्ग) पसरला व परिणामी त्याला कोपराच्या खालून आपला हात गमवावा लागला.

अशा कठीण परिस्थितीतही, दिलीपने आपल्या अपंगत्वाला आपल्या भविष्यावर वर्चस्व गाजवू दिले नाही. धावणे ही त्याची ताकद आणि आवड बनली. गावातील धुळीच्या रस्त्यांवर सराव करत असताना त्याचे कौशल्य प्रशिक्षक वैजनाथ काळे यांच्या लक्षात आले आणि त्यांनी दिलीपला व्यावसायिक पॅरा-अॅथ्लेटिक्सच्या दिशेने मार्गदर्शन केले. दिलीप गावितने २०२२ च्या आशियाई पॅरा गेम्समध्ये पुरुषांच्या ४०० मीटर 'टी४७' प्रकारात सुवर्णपदक जिंकले आणि या स्पर्धेत भारतासाठी ऐतिहासिक १०० वे पदक मिळवून दिले. तसेच, दिलीपने पॅरिस २०२४ पॅरालिम्पिक्समध्येही पुरुषांच्या ४०० मीटर 'टी४७' प्रकाराची अंतिम फेरी गाठली.



**जन जाती कल्याण आश्रमातर्फे होणार दिलीप गावितचा सत्कार**

स्पर्धा विक्रमासह सुवर्णपदक पटकावून देशाचे नाव उंचावणारा दिलीप महादू गावित याच्या या यशाबद्दल जनजाती कल्याण आश्रमातर्फे त्याचे अभिनंदन करण्यात आले आहे. लवकरच त्याचा गुही, ता. सुरगणा येथील जनजाती कल्याण आश्रमाच्या प्रकल्पात विशेष सत्कार करण्यात येणार आहे. ऑलिम्पिकपटू तथा जनजाती कल्याण आश्रमाच्या प्रांत उपाध्यक्ष कविता राऊत यांनी दिलीप गावित याच्या या ऐतिहासिक यशाबद्दल विशेष अभिनंदन केले. यावेळी जनजाती कल्याण आश्रमाचे प्रांत अध्यक्ष डॉ. भरत केळकर, प्रांत सचिव शरद शेळके, प्रांत कार्यकारिणी सदस्य परशुराम गावित, तसेच धनंजय जामदार यांनी दिली गावितच्या ऐतिहासिक कामगिरीचे कौतुक करून त्याचे अभिनंदन केले. (वृत्तसंस्था)



# मुरली श्रीशंकरला पुन्हा रौप्य

**ग्लासगो, ३० जुलै**

२०२२ बर्मिंगम राष्ट्रकुल स्पर्धेनंतर लांब उडीपटू मुरली श्रीशंकरने ग्लासगो राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेत ८.०९ मीटरची कामगिरी नोंदविली आणि पुन्हा एकदा रौप्यपदक जिंकले. पुरुषांच्या लांब उडी स्पर्धेत जमैकाच्या ताजे गेल (८.१५ मीटर) याच्यानंतर तो दुसऱ्या स्थानावर राहिला.

चार वर्षांपूर्वी याच स्पर्धेत रौप्यपदक जिंकल्यानंतर, यावेळी पालक्काड येथील २७ वर्षीय श्रीशंकर सुवर्णपदक जिंकण्याच्या उंबरठ्यावर होता, असे झाले असते तर राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेत सुवर्णपदक जिंकणारा तो पहिला भारतीय लांब उडीपटू ठरला असता. मात्र, त्याला ८.०९ मीटरच्या कामगिरीसह रौप्यपदकावरच समाधान मानावे लागले. त्याचे वडील आणि प्रशिक्षक एस. मुरली यांनी त्याला मिठी मारली. नंतर त्याने०० तिरंगा आपल्या अंगाभोवती गुंडाळून घेतला. जमैकाचा २०१९ चा विश्वविजेता ताजे गेल याने ८.१५ मीटरची कामगिरी करत सुवर्णपदक पटकावले.

२०२४ मध्ये शस्त्रक्रियेला सामोरे जावे लागल्यानंतर श्रीशंकर पुन्हा एकदा आपल्या सर्वोत्तम लयीत परतला आहे.

मला सातत्याने चांगले निकाल मिळत आहेत कारण माझी शारीरिक स्थिती खूप चांगली आहे. माझी उडी मारण्याची क्षमता पूर्वीपेक्षा सुधारली आहे. हवेत बराच वेळ स्वत:ला चांगल्या प्रकारे पुढे नेण्याची क्षमता माझ्यात आली आहे, असे मुरली श्रीशंकर म्हणाला. (वृत्तसंस्था)

**आणखी पदकाची आशा**

**अनिमेश कुजूर पुरुषांच्या २०० मीटर शर्यतीच्या अंतिम फेरीत पोहोचला. दरम्यान, तजिंदरपाल सिंग तूर आणि समरप्रीत सिंग हे दोघेही पुरुषांच्या गोळाफेक स्पर्धेच्या अंतिम फेरीत पोहोचले, तर संतोष कुमार तामिलरासन आणि यशस पलक्षाने पुरुषांच्या ४०० मीटर अडथळ्यांच्या शर्यतीच्या अंतिम फेरीसाठी पात्रता मिळवली. मुष्टियोद्ध्यांनी उपांत्य फेरीत धडक मारल्यामुळे बॉक्सिंगमध्ये भारताची १० पदके निश्चित झाली.**

# राष्ट्रपती, पंतप्रधानांकडून राष्ट्रकुल स्पर्धेतील पदक विजेत्यांचे अभिनंदन

**नवी दिल्ली, ३० जुलै**

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेत पदके जिंकणाऱ्या पॅरा-अॅथ्लिट दिलीप गावित, मोहम्मद बासिल मोर्सिंगनाकाथी यांचे, तसेच लांब उडीत रौप्य पदक जिंकणाऱ्या मुरली श्रीशंकरचे अभिनंदन केले.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी गुरुवारी राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेत पदक जिंकणाऱ्या कामगिरीबद्दल पॅरा-अॅथ्लिट दिलीप महादू गावित आणि मोहम्मद बासिल मोर्सिंगनाकाथ, तसेच लांब उडीपटू एम. श्रीशंकर यांचे अभिनंदन केले.

दिलीप महादू गावित यांची जबरदस्त कामगिरी! पुरुषांच्या १०० मीटर टी-४७ प्रकारात उल्लेखनीय वेळेसह सुवर्णपदक जिंकल्याबद्दल, तसेच नवीन स्पर्धा-विक्रम आणि हंगामातील सर्वोत्तम कामगिरी नोंदवल्याबद्दल त्यांचे अभिनंदन. दिलीपचा वेग, जिद्द आणि समर्पण यामुळे देशाला अभिमान वाटतो, असे पंतप्रधानांनी 'एक्स'वरील एका पोस्टमध्ये म्हटले आहे.

पंतप्रधानांनी रौप्यपदक जिंकणाऱ्या मोहम्मद बासिल मोर्सिंगनाकथ यांचेही कौतुक केले आणि त्यांच्या कामगिरीचे वर्णन कठोर परिश्रम व जिद्दीचे प्रतीक असे केले.

एका वेगळ्या पोस्टमध्ये, पंतप्रधान मोदींनी लांब उडीपटू एम. श्रीशंकर याचे त्याच्या सर्वोत्तम उडीसह रौप्यपदक जिंकल्याबद्दल अभिनंदन केले. श्रीशंकरला उत्कृष्ट रौप्यपदक! काय ती असाधारण कामगिरी! पदक जिंकल्याबद्दल आणि तेही स्वतःच्या सर्वोत्तम उडीसह यश मिळवल्याबद्दल त्यांचे अभिनंदन. त्यांचे यश अनेक तरुणांना अॅथ्लेटिक्समध्ये उत्कृष्ट कामगिरी करण्यासाठी प्रेरित करेल. त्यांच्या पुढील वाटचालीस माझ्या शुभेच्छा, असे पंतप्रधान म्हणाले.

**भारताची पदक संख्या १५ वर**

राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धा २०२६ मध्ये भारताची एकूण पदकसंख्या सध्या १५ वर पोहोचली आहे; यात तीन सुवर्ण, नऊ रौप्य आणि तीन कांस्य पदकांचा समावेश आहे. (वृत्तसंस्था)

# नीरज चोप्रासह रोहित, यशचा 'भाला' अंतिम फेरीत

**ग्लासगो, ३० जुलै**

स्कॉट्सटाउन स्टेडियमवर गुरुवारी येथे झालेल्या पात्रता फेरीत जोराचे आणि दिशा बदलणारे वारे वाहत असल्याने खेळाडूंना थेट पात्रतेसाठी आवश्यक असलेली कामगिरी गाठता आली नाही. तरीही, ऑलिम्पिकवीर नीरज चोप्रा आणि इतर दोन भारतीय- रोहित यादव व यशवीर सिंग या खेळाडूंनी अव्वल १२ जणांमध्ये स्थान मिळवित राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेच्या पुरुष भालाफेक अंतिम फेरीत धडक मारली.



यशवीर सिंग, रोहित यादव व नीरज चोप्रा

७९.६१ मीटरच्या सर्वोत्तम कामगिरीसह पाचवे स्थान मिळवून नीरज चोप्राने राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेतील पुरुषांच्या भालाफेक स्पर्धेच्या अंतिम फेरीसाठी पात्रता सिद्ध केली. त्याच वेळी, रोहित यादव (७८.३७ मीटर) आणि यशवीर सिंगने (७८.३६ मीटर) अनुक्रमे नववे आणि दहावे स्थान पटकावून पदक फेरीसाठी भारतीय संघाचे पूर्ण प्रतिनिधित्व सुनिश्चित केले.

नीरज चोप्रा राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेतील विजेतेपद पुन्हा मिळविण्याच्या प्रयत्नात आहे. त्याने २०१८ मध्ये गोल्ड कोस्ट येथे झालेल्या राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेत सुवर्णपदक जिंकले होते, परंतु दुखापतीमुळे तो बर्मिंगम २०२२ च्या स्पर्धेत सहभागी होऊ शकला नव्हता. राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धा २०२६ मधील पुरुषांची भालाफेक स्पर्धा दोन टप्प्यांत होत आहे; यात आज पात्रता फेरी पार पडली असून, पदकाचा निर्णय करणारी अंतिम फेरी शनिवार १ ऑगस्ट रोजी पहाटे होणार आहे.

प्रत्येक फेरीत सर्वांत शेवटी भाला फेकणाऱ्या २८ वर्षीय चोप्राने आपला तिसरा आणि अंतिम प्रयत्न केला नाही, कारण त्याने आधीच अंतिम फेरीतील आपले स्थान निश्चित केले होते. सतत वाहणारे जोरदार वारे व १८ अंश सेल्सिअस तापमान यामुळे संपूर्ण स्पर्धेदरम्यान परिस्थिती आव्हानात्मक होती; परिणामी, कोणत्याही स्पर्धकाला ८४ मीटरचा थेट पात्रतेचा टप्पा गाठता आला नाही. त्यामुळे, अव्वल १२ खेळाडू अंतिम फेरीसाठी पात्र ठरले. भालाफेकपटूंसाठी परिस्थिती फारशी अनुकूल नव्हती.

केवळ थंडीच नव्हती तर वारेही वाहत होते. आणि वारे सर्व दिशांनी येत होते... ते नक्की कोणत्या बाजूने येईल याचा अंदाज घेणे खूप कठीण होते. आज अनेक खेळाडूंना अडचणींचा सामना करावा लागला आणि कोणालाही थेट पात्रता मिळविता आली नाही, असे चोप्राने स्पर्धेनंतर पत्रकारांशी बोलताना सांगितले. (वृत्तसंस्था)

**सुवर्णपदकासाठी प्रयत्न करेन : रुमेश पाथिरागे**

**या हंगामात दोहा आणि रोम डायमंड लीग स्पर्धा जिंकणाऱ्या श्रीलंकेच्या फॉर्ममध्ये असलेल्या रुमेश थरंगा पाथिरागे याने पहिल्या फेरीत ८२.८४ मीटरची फेक करीत पात्रता फेरीत अव्वल स्थान पटकावले. मागील स्पर्धेतील रौप्यपदक विजेत्या ग्रेनाडाच्या अँडरसन पीटर्सने ८१.२९ मीटरच्या सर्वोत्तम थ्रोसह दुसरे स्थान मिळवले. मी पात्र ठरलो याचा मला खूप आनंद आहे व मी सुवर्णपदकासाठी प्रयत्न करेन, असे पाथिरागे म्हणाला.**

# प्रवीण, सेल्वा तिहेरी उडीच्या अंतिम फेरीत

**ग्लासगो, ३० जुलै**

२३ व्या ग्लासगो राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेत गुरुवारी येथे झालेल्या पात्रता फेरीत अनुक्रमे दुसरे आणि तिसरे स्थान पटकावत, राष्ट्रीय विक्रमवीर प्रवीण चित्रवेल व सेल्वा प्रभूने पुरुषांच्या तिहेरी उडीच्या अंतिम फेरीत धडक मारली.

चित्रवेलने आपल्या पहिल्या आणि एकमेव प्रयत्नात १६.४१ मीटरची उडी मारून दुसरे स्थान मिळवले. थंड हवामान आणि वाऱ्याचा वेग यांसारख्या आव्हानात्मक परिस्थितीत १४ पैकी एकाही स्पर्धकाला अंतिम फेरीसाठी आवश्यक असलेली १६.६० मीटरची 'ऑटोमॅटिक पात्रता' मर्यादा गाठता आली नाही; त्यामुळे चित्रवेलने आपले दुसरे आणि तिसरे प्रयत्न केले नाहीत. त्याचा राष्ट्रीय विक्रम १७.३७ मीटरचा आहे, तर या हंगामातील त्याची सर्वोत्तम कामगिरी १७.०८ मीटर इतकी आहे.

दुसरीकडे, सेल्व्हा प्रभूला काही काळ तणावाचा सामना करावा लागला, कारण त्याचे पहिले दोन प्रयत्न 'फाऊल' ठरले होते; मात्र अखेरच्या प्रयत्नात त्याने १६.२६ मीटरची उडी मारत तिसरे स्थान निश्चित केले. जमैकाच्या जॉर्डन स्कॉटने दुसऱ्या फेरीतील १६.५६ मीटरच्या उडीसह पात्रता फेरीत अव्वल स्थान पटकावले.

**बोल्स : नयनमोनी सैकियाची २-० अशा विजयासह दमदार पुनरागमन**


पहिला सामना गमावल्यानंतर, नयनमोनी सैकियाने महिलांच्या एकेरी गटातील साखळी सामन्यात 'आयल ऑफ मॅन'च्या कॅरोलिन व्हाईटहेडचा ११-२, ७-४ असा पराभव करत शानदार पुनरागमन केले.



प्रवीण चित्रावेल

**३००० मीटर स्टीपलचेसमध्ये पारुल चौधरी पाचव्या स्थानी**

ऑलिम्पिकपटू पारुल चौधरीला महिलांच्या ३००० मीटर स्टीपलचेसच्या अंतिम फेरीत पाचव्या स्थानावर समाधान मानावे लागले; तिने ही शर्यत ९:२६.७५ मिनिटांत पूर्ण केली. पारुल ग्लासगो येथे होणाऱ्या ५००० मीटर शर्यतीतही सहभागी होणार आहे.



**जलतरण: आर्यन नेहरा सातव्या स्थानावर; भारताच्या मोहिमेची सांगता**

आर्यन नेहराने पुरुषांच्या १५०० मीटर फ्रीस्टाईलच्या अंतिम फेरीत १५:३६.२५ मिनिटांची वेळ नोंदवत सातवे स्थान मिळवले. यासह ग्लासगो राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेमधील भारताच्या जलतरण मोहिमेची सांगता झाली.


**विशाल टी. के. अंतिम फेरी गाठण्यास अपयशी**

पुरुषांच्या ४०० मीटर शर्यतीत राष्ट्रीय विक्रमवीर विशाल टी. के. अंतिम फेरी गाठण्यात अपयशी ठरला. आपल्या उपांत्य फेरीच्या शर्यतीत त्याने ४६.३३ सेकंदांची वेळ नोंदविली आणि तो सहाव्या स्थानावर राहिला.

एफ ४२-४४/एफ६१-६४ थाळीफेक स्पर्धेत भारताच्या सागर थायत आणि देवेंद्र कुमारने अंतिम फेरीत अनुक्रमे सहावे आणि सातवे स्थान पटकावले. सागरने ५१.७९ मीटरची, तर देवेंद्रने ४८.२० मीटरची कामगिरी नोंदविली. (वृत्तसंस्था)

# मनप्रीत कौरला पदकाची हुलकावणी

**ग्लासगो :** राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेत भारताच्या मनप्रीत कौरला महिलांच्या गोळाफेक प्रकारात पदकापासून अगदी थोडक्यात हुलकावणी मिळाली. महिलांच्या गोळाफेकच्या अंतिम फेरीत कांस्यपदकाच्या शर्यतीत असताना स्थान घसरल्यामुळे मनप्रीतला अत्यंत निराशाजनक निकालाचा सामना करावा लागला. कॅनडाच्या सारा मिटनने सुरुवातीच्या १८.५० मीटरच्या फेकीसह आघाडी घेतली आणि अखेरीस १९.८८ मीटरच्या सर्वोत्तम कामगिरीसह सुवर्णपदक पटकावले.



मनप्रीतने १५.९२ मीटरच्या फेकीने सुरुवात केली आणि पाचव्या फेरीत कामगिरी सुधारत १७.४९ मीटरची फेक केली, ज्यामुळे ती तिसऱ्या स्थानावर पोहोचली. मात्र, जमैकाच्या लॉयड्रिशिया कॅमेरॉनने अंतिम फेरीत १७.८७ मीटरची फेक करून भारतीय खेळाडूला मागे टाकले. कॅमेरॉनने नायजेरियाच्या जेसिका ओजीच्या १७.८७ मीटरच्या सर्वोत्तम कामगिरीशी बरोबरी केली, परंतु 'काउंटबॅक' नियमानुसार तिला रौप्यपदकावर समाधान मानावे लागले; कारण ओजीने तिची सर्वोत्तम फेक स्पर्धेच्या सुरुवातीच्या टप्प्यात नोंदविली होती.

# अजिंक्य रहाणे क्रिकेटमधून निवृत्त

**मुंबई, ३० जुलै**

भारतासाठी शेवटचा सामना खेळल्यानंतर तीन वर्षांनी, ३८ वर्षीय अजिंक्य रहाणेने सर्व फॉरमॅटमधून निवृत्ती जाहीर केली. त्याने २०११ ते २०२३ या काळात एकूण ८५ कसोटी, ९० एकदिवसीय आणि २० टी-२० आंतरराष्ट्रीय क्रिकेट सामने खेळले आहेत.

आता 'कॅप क्रमांक २७८' भारतीय संघाचे प्रतिनिधित्व करणारी आपली ओळख बाजूला ठेवण्याची वेळ आली आहे, असे अजिंक्य रहाणेने गुरुवारी आपल्या निरोपाच्या संदेशात म्हटले आहे.

भारताची 'कॅप' परिधान करण्याच्या स्वप्नाचा पाठपुरावा करताना रहाणेने लहानपणी ठाणे जिल्ह्यातील डोंबिवली या उपनगरातून प्रवासाला सुरुवात केली आणि स्वप्नपूर्तीनंतर आता त्याने कारकिर्दीला पूर्णविराम दिला. रहाणेला मित्र व सहकारी 'जिंक्स' या नावाने ओळखतात. कोणत्याही प्रकारच्या गाजावाजाशिवाय रहाणेने निवृत्ती पत्करली.

कठोर मेहनतीच्या जोरावर त्याने कसोटी क्रिकेटमध्ये ३८.४६ ची सरासरी, १२ शतके आणि २६ अर्धशतके अशी कामगिरी साकारली.

**अभिमान वाटावा अशी कारकीर्द : पुजारा**

ज्येष्ठ फलंदाज अजिंक्य रहाणेची कारकीर्द 'अत्यंत अभिमानास्पद' आहे, तुझ्या अभिमानास्पद कारकिर्दीबद्दल अभिनंदन, असे भारताचा माजी फलंदाज चेतेश्वर पुजाराने म्हटले.

रहाणेने क्रिकेटमधून निवृत्ती घेतल्याने एका शानदार कारकिर्दीचा अंत झाला आहे. भारतीय क्रिकेटमधील तुमच्या अफाट योगदानाबद्दल आणि कायम स्मरणात राहणाऱ्या सर्व आठवणींसाठी धन्यवाद. पुढील वाटचालीस खूप शुभेच्छा, असे भारतीय क्रिकेट नियामक मंडळाने म्हटले आहे.

भारताचा माजी सलामीवीर वीरेंद्र सेहवागने रहाणेच्या मैदानातील कणखर वृत्तीचे कौतुक केले.

सेहवागने २०२०-२०२१ मध्ये ऑस्ट्रेलियात भारताने जिंकलेल्या बॉर्डर-गावस्कर ट्रॉफीचा संदर्भ देत लिहिले की, रहाणेने विराट कोहलीच्या जागी खेळताना अत्यंत कमकुवत संघासह भारताला २-१ असा ऐतिहासिक मालिका विजय मिळवून दिला होता. रहाणे शांत, खंबीर. कधीही आरडाओरडा न करता, आपला सर्वोत्तम खेळ करत राहिला, असेही त्याने म्हटले.



भारताची दोन ऑलिम्पिक पदके जिंकणारी बॅडमिंटनपटू पी. व्ही. सिंधूने २०१४च्या दौऱ्यात लॉर्ड्सवर रहाणेने केलेल्या १०३ धावांच्या खेळीची आठवण काढली. तुझी कारकिर्द ही धैर्य, शांतता आणि अत्यंत कठीण परिस्थितीत खेळलेल्या अविश्वसनीय चिवट खेळींची साक्ष आहे, असे सिंधूने म्हटले आहे. माजी अष्टपैलू खेळाडू इरफान पठाण व माजी सलामीवीर शिखर धवनने एक खेळाडू व कर्णधार म्हणून रहाणेच्या संयमाचे कौतुक केले. रहाणे हा मुंबई क्रिकेटच्या सर्वोत्तम सदिच्छादूतांपैकी एक होता, असे मुंबई क्रिकेट संघटनेचे अध्यक्ष अजिंक्य नाईक म्हणाले. (वृत्तसंस्था)

## 'रूट'कडे पुन्हा धुरा, फ्लेमिंग प्रशिक्षकपदी

**लंडन :** बेन स्टोक्स आणि ब्रेंडन मॅक्युलम यांच्या जाण्यानंतर, इंग्लंडने गुरुवारी जो रूटची कसोटी कर्णधार म्हणून आणि न्यूझीलंडचे माजी फलंदाज स्टीफन फ्लेमिंग यांची मुख्य प्रशिक्षक म्हणून नियुक्ती केली.

३५ वर्षीय रूट, जो कसोटी क्रिकेटमध्ये इंग्लंडसाठी सर्वाधिक धावा करणारा फलंदाज आहे. त्याने २०१७ ते २०२२ दरम्यान विक्रमी ६४ सामन्यांत संघाचे नेतृत्व केले आणि त्यापैकी २७ सामने जिंकले.

जूनमध्ये स्टोक्सने आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधून निवृत्ती घेतल्यानंतर रूट पुन्हा या भूमिकेत परतला आहे. १९ ऑगस्टपासून पाकिस्तानविरुद्ध सुरू होणाऱ्या तीन कसोटी सामन्यांच्या मायदेशातील मालिकेत तो इंग्लंडचे नेतृत्व करेल.

इंग्लंडच्या पुरुष कसोटी संघाचे कर्णधारपद पुन्हा भूषवण्याची संधी मिळणे हा मोठा सन्मान आणि विशेषाधिकार आहे, असे रूटने म्हटले आहे. कसोटी कर्णधारपद हे आव्हानात्मक पण अत्यंत समाधानकारक काम आहे.

# हॉकी विश्वचषकासाठी संघांची जर्सी निळ्याऐवजी केशरी

## 'केशरी' जर्सीचा निर्णय तांत्रिक गरजेपोटी : हॉकी इंडिया

**नवी दिल्ली, ३० जुलै**

नेदरलँड्स व बेल्जियममध्ये पुढील महिन्यात होणाऱ्या एफआयएच हॉकी विश्वचषकासाठी भारतीय पुरुष व महिला हॉकी संघ आपल्या पारंपरिक निळ्या गणवेशाऐवजी 'केशरी' रंगाच्या जर्सीमध्ये दिसणार आहेत. या बदलावर माजी खेळाडूंना प्रश्नचिन्ह उपस्थित केले असले, तरी 'हॉकी इंडिया'ने तांत्रिक गरजेपोटी हा निर्णय घेतल्याचे सांगत त्याचे समर्थन केले आहे.

हॉकी विश्वचषक स्पर्धा १५ ते ३० ऑगस्ट या कालावधीत खेळविला जाईल. माजी भारतीय हॉकीपटू विरेन रास्किन्हा यांनी सर्वप्रथम या निर्णयावर टीका केली आणि अनावरण करण्यात आलेला गणवेश 'अपमानजनक' वाटत असल्याचे म्हटले. रास्किन्हा हे 'ऑलिम्पिक गोल्ड क्वेस्ट' या क्रीडा संस्थेचे सीईओ देखील आहेत.

या जर्सीचा रंग व डिझाइनमागे एक 'कथा' सांगण्याचा व 'भारताचा अभिमान' दर्शविण्याचा उद्देश आहे; तसेच खेळाडू व सपोर्ट स्टाफशी चर्चा केल्यानंतरच हे अंतिम करण्यात आले.




भारतीय हॉकी संघासाठी नवीन केशरी रंगाची जर्सी

केशरी रंग हा धैर्य, त्याग आणि विजयाचे प्रतीक आहे आणि हा निर्णय घेताना कोणत्याही बाह्य दबावाचा वापर झाला नाही, असेही 'हॉकी इंडिया'ने स्पष्ट केले.

निळ्या रंगाचा गणवेश हा निळ्या रंगाच्या सिंथेटिक मैदानाशी एकरूप होत होता किंवा त्यात मिसळून जात होता.

निळा सिंथेटिक ट्रॅक आता आंतरराष्ट्रीय हॉकीसाठी प्रमाणित रंग आहे. या दृश्य साम्यामुळे मैदानावर खेळाडूंना स्पष्टता आणि दृश्यमानतेबाबत अडचणी येत होत्या, असे 'हॉकी इंडिया'ने एका निवेदनात म्हटले. विरेन रास्किन्हासारख्या माजी कर्णधारांनी या निर्णयामागील तर्कावर प्रश्न उपस्थित केल्यानंतर त्यांनी हे स्पष्टीकरण दिले.

प्रशिक्षक व खेळाडूंनी पिवळा किंवा केशरी यांसारख्या पर्यायी रंगांची सूचना केली होती. सखोल विचारविनिमयानंतर केशरी रंगाची निवड करण्यात आली.

तांत्रिक गरज पूर्ण करण्यासोबतच, केशरी रंगाला विशेष महत्त्व आहे कारण तो आपल्या राष्ट्रध्वजातील एक रंग आहे आणि तो धैर्य, त्याग व राष्ट्रीय अभिमानाचे प्रतीक आहे, असेही हॉकी इंडियाने म्हटले आहे.

मला हे सांगावे लागेल की हॉकी इंडियाने अनेक चांगल्या गोष्टी केल्या आहेत. पण हा निर्णय मात्र लज्जास्पद आहे. भारतीय संघाचा वारसा आणि ओळख नेहमीच 'निळा' रंग राहिली आहे. मी अनेक वर्षे अभिमानाने निळी जर्सी परिधान केली आहे, असे रास्किन्हा यांनी म्हटले. (वृत्तसंस्था)

# श्री स्वामी समर्थ मंदिर कॉरीडॉर निर्मितीला वेग

## पहिल्या टप्प्यात ५०० कोटींचा आराखडा सादर करण्याचे मुख्यमंत्र्यांचे आदेश

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. ३० जुलै-**

श्री स्वामी समर्थांच्या पवित्र नगरीच्या विकासासाठी महत्त्वपूर्ण घडामोड घडली असून, दि. २९ जुलै रोजीच्या शासन निर्णयानंतर अवघ्या २४ तासांत विकास प्रक्रियेला प्रत्यक्ष गती मिळाली आहे. अक्कलकोटचे आमदार सचिन कल्याणशेट्टी यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला यश येत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी गुरुवारी (ता. ३०) म्हाडाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांची तातडीची बैठक घेऊन पहिल्या टप्प्यातील ५०० कोटी रुपयांच्या विकास आराखड्याची तयारी करून तो शासनाकडे तातडीने सादर करण्याचे आदेश दिले.या बैठकीला गृहनिर्माण राज्यमंत्री पंकज भोयर, मुख्य सचिव राजेश अग्रवाल, गृहनिर्माण विभागाचे अतिरिक्त सचिव असिमकुमार गुप्ता आणि म्हाडाचे उपाध्यक्ष संजीव जैस्वाल, मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव श्रीकर परदेशी



आणि लोकेश चंद्रा, उपमुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव नवीन सोना तसेच म्हाडाचे इतर अधिकारी सह्याद्री राज्य अतिथी गृह येथे झालेल्या बैठकीस उपस्थित होते.

आमदार कल्याणशेट्टी यांनी अक्कलकोटचा विकास आराखडा विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून म्हाडाकडे सोपविण्याची मागणी केली होती. त्यानुसार अक्कलकोट नगरपरिषद, सोलापूर जिल्हाधिकारी कार्यालय आणि म्हाडा यांनी शासनाकडे प्रस्ताव सादर केला होता. या प्रस्तावास उपमुख्यमंत्री तथा नगरविकास मंत्री एकनाथ शिंदे यांनी मान्यता दिली असून, त्यासंदर्भातील शासन निर्णय दि. २९ जुलै, गुरुपौर्णिमेच्या दिवशी प्रसिद्ध करण्यात आला.

या निर्णयानंतर अवघ्या एकाच दिवसात मुख्यमंत्री फडणवीस यांनी संबंधित अधिकाऱ्यांची बैठक बोलावून विकास आराखड्याबाबत सविस्तर चर्चा केली.

> 'महायुती सरकारने अक्कलकोटच्या सर्वांगीण विकासाला सर्वोच्च प्राधान्य दिले आहे. विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून म्हाडाची नियुक्ती झाल्यानंतर अवघ्या एका दिवसात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी बैठक घेऊन ५०० कोटी रुपयांचा विकास आराखडा तयार करण्याचे आदेश दिले, ही अक्कलकोटसाठी ऐतिहासिक बाब आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्राताई पवार आणि पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्या सकारात्मक भूमिकेमुळे श्री स्वामी समर्थ नगरीचा विकास नव्या उंचीवर पोहोचेल. त्याबद्दल मी सर्वांचे मनःपूर्वक आभार व्यक्त करतो.'
>
> **- सचिन कल्याणशेट्टी, आमदार, अक्कलकोट**

बैठकीत श्री स्वामी समर्थ मंदिर परिसर, श्री स्वामी समर्थ समाधी मठ परिसर आणि भाविकांसाठी आवश्यक आधुनिक सुविधा उभारण्याचा सविस्तर आराखडा तयार करून पहिल्या टप्प्यातील ५०० कोटी रुपयांच्या विकासकामांचा प्रस्ताव शासनाकडे सादर करण्याचे निर्देश देण्यात आले. तसेच, दुसऱ्या टप्प्यात श्री स्वामी समर्थ मंदिर ते श्री स्वामी समर्थ समाधी मठ या पालखी मार्गाचे सुशोभीकरण, विस्तारीकरण आणि भाविकांसाठी जागतिक दर्जाच्या सुविधा उपलब्ध करून देण्याचा विकास आराखडाही राबविण्यात येणार असल्याची माहिती बैठकीत देण्यात आली. अक्कलकोटमध्ये दरवर्षी लाखो भाविक दर्शनासाठी येत असल्याने वाढत्या भाविकसंख्येच्या पार्श्वभूमीवर वाहतूक व्यवस्था, पार्किंग, स्वच्छता, पायाभूत सुविधा, धार्मिक पर्यटन आणि परिसराच्या सुशोभीकरणावर विशेष भर देण्यात येणार आहे. विकास आराखडा शासनाकडे मंजुरीसाठी सादर झाल्यानंतर पुढील प्रशासकीय प्रक्रिया वेगाने पूर्ण करून प्रत्यक्ष कामांना प्रारंभ करण्याचे नियोजन करण्यात येणार आहे.

## महत्वाचे...



### मंत्री गोगावले यांची मोडनिंबला सदिच्छा भेट

**मोडनिंब, दि. ३० जुलै-**

मोडनिंब (ता. माढा) येथे फलोत्पादन, रोजगार हमी व खार जमीन विकास मंत्री भरत गोगावले यांनी दौऱ्यादरम्यान उदय कीर्ती एंटरप्राइजेसला सदिच्छा भेट दिली. यावेळी स्थानिक पदाधिकारी, कार्यकर्ते व पदाधिकाऱ्यांशी त्यांनी संवाद साधत विविध विषयांवर चर्चा केली. याप्रसंगी माढा लोकसभा संपर्कप्रमुख संजय कोकाटे, जिल्हा परिषद सदस्य चरणराज चवरे, उद्योजक उदय माने, आकाश माने, उज्ज्वल माने, साईप्रसाद काळे, प्रवीण माने, भाजपचे राहुल गांधी, राहुल केदार, धनाजी लादे, उद्योजक निलेश गिड्डे, दिपक सुर्वे यांच्यासह शिवसेना पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. मंत्री गोगावले यांच्या भेटीमुळे स्थानिक शिवसेना कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण आहे.




### सुळेवाडी शाळा व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षपदी सुळे

**पिलीव दि. ३० जुलै-**

सुळेवाडी येथील जि.प. प्राथमिक शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्षपदी समाधान रामचंद्र सुळे तर उपाध्यक्षपदी लक्ष्मण विलास करे यांची बिनविरोध निवड केली. सदस्यपदी कार्तिका सुळे, जमुना बरकडे, माया बिडे, काजल माने, वनिता सुळे, शशिकला सुळे, शिवाजी सुळे, उमाजी बोडरे, रामचंद्र सोलंकर, पुंडलिक लोखंडे, प्रदीप सुळे यांच्या निवडी केल्या. निवडीनंतर नूतन पदाधिकाऱ्यांचा सन्मान शाळेचे मुख्याध्यापक शेटे व सर्व शिक्षकांनी केला.



### वामनराव शिंदे साहेब आदर्श विद्यालयात गुरुपौर्णिमा

**सांगोला,दि. ३० जुलै-**

सांगोल्यातील वामनराव शिंदे साहेब आदर्श विद्यालयात गुरुपौर्णिमा उत्साहात साजरी करण्यात आली. कार्यक्रमाच्या सुरुवातीस संस्थापक वामनराव शिंदे व सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन व पुष्पहार अर्पण संस्थाध्यक्षा कौशल्यादेवी शिंदे, माणदेशी साहित्यिक म.ज.घोंगडे, मुख्याध्यापक विठ्ठल शिंदे यांच्या हस्ते करण्यात आले. म.ज.घोंगडे यांनी विद्यार्थ्यांनी गुणवत्तेत अग्रस्थानी राहण्याचे आवाहन केले. ऋतुजा उबाळे, सोफिया पठाण, ईश्वर चव्हाण, रोहन निंबाळकर, नेहा ठोकळे, जितू निंबाळकर या विद्यार्थ्यांनी शिक्षकांप्रती कृतज्ञता व्यक्त केली. प्रास्ताविक अर्चना गोडसे, सूत्रसंचालन ताई भालके यांनी केले. आभार विठ्ठल शिंदे यांनी मानले.

### सैराट फेम अरबाज शेख यांचे वडील असलम शेख यांचे निधन

**करमाळा, दि. ३० जुलै-**



सैराट चित्रपटातील सल्ल्या या भूमिकेमुळे प्रसिद्ध झालेल्या अरबाज शेख यांचे वडील असलम रसूल शेख (वय ६०) यांचे गुरुवारी सोलापूर येथे उपचारादरम्यान निधन झाले. हृदयविकाराचा त्रास झाल्यानंतर त्यांच्यावर प्रथम करमाळा उपजिल्हा रुग्णालयात, त्यानंतर सोलापूरमधील रुग्णालयात उपचार सुरू होते. त्यांच्या उपचारासाठी मुख्यमंत्री वैद्यकीय सहायता कक्षाकडून आर्थिक मदतही मिळाली होती. मात्र उपचार सुरू असतानाच त्यांची प्राणज्योत मालवली. त्यांच्या पश्चात पत्नी, तीन मुले, सुना आणि नातवंडे असा परिवार आहे. रात्री उशिरा करमाळा तालुक्यातील जेऊर येथील मुस्लिम कब्रस्तानमध्ये त्यांच्यावर दफनविधी करण्यात आला.

## निधन वृत्त...

### कमलबाई झिंगाडे



**सोलापूर, दि. ३० जुलै-**

कमलबाई विश्वनाथ झिंगाडे यांचे वृद्धापकाळाने गुरुवार, दि.३० जुलै रोजी निधन झाले. मृत्युसमयी त्या ८७ वर्षांच्या होत्या. त्यांच्या पश्चात एक मुलगा, पाच मुली, सून, जावई, नातवंडं असा परिवार आहे. शुक्रवार, दि.३१ जुलै २०२६ रोजी सकाळी १० वाजता धाराशिव जिल्ह्यातील लोहारा येथील त्यांच्या राहत्या घरापासून अंत्ययात्रा काढण्यात येणार आहे. ज्येष्ठ छायाचित्रकार नागेश दंतकाळे यांच्या त्या सासू होत.

### पोशव्वा महेशन



**सोलापूर, दि.३० जुलै-**

येथील पोशव्वा यल्लप्पा महेशन यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. मृत्युसमयी त्या ८८ वर्षांच्या होत्या. त्यांच्या पश्चात पाच मुली, चार मुले, सुना, जावई, नातवंडे असा परिवार आहे. त्यांच्या पार्थिवावर पद्मशाली समाजाच्या अक्कलकोट रोड येथील शांतीधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. माजी नगरसेविका इंदिरा कुडक्याल यांच्या त्या मातोश्री होत.

### नर्मदा अडसूळ



**मंगळवेढा, दि. ३० जुलै -**

नागणे गल्ली येथील नर्मदा उर्फ बबाबाई गोपीनाथ अडसूळ यांचे गुरुवार दि. २९ जुलै रोजी वृद्धापकाळाने निधन झाले. मृत्यू समयी त्या ९२ वर्षांच्या होत्या. त्यांचे पश्चात तीन मुले, एक मुलगी, सुना, जावई, नातवंडे असा परिवार आहे. वारी परिवाराचे सदस्य दिलीप अडसूळ यांच्या त्या मातोश्री होत.

## नदीतून वाहत आलेले प्रेत काढण्यात बचाव पथकाला यश

**तभा वृत्तसेवा**
**मंगळवेढा, दि. ३० जुलै -**

माचणूर येथील भीमा नदीच्या पात्रात स्मशान भूमीजवळ पाण्याच्या प्रवाहाबरोबर एक ५५ वर्षीय स्त्री जातीचे प्रेत वाहत आले आहे. या प्रेतास बचाव पथकाने पाण्यातून बाहेर काढले आहे. दरम्यान या बेवारस मयताच्या नातेवाईकांनी मंगळवेढा पोलीसांशी संपर्क साधण्याचे आवाहन केले आहे.

माचणूरचे पोलीस पाटील सुहास डोके हे दि.२९ रोजी दुपारी ३ वाजता गावात असताना मंगळवेढ्याचे मंडल अधिकारी धनंजय इंगोले यांचा कॉल आला की, भीमा नदी पात्रात एका महिलेचे प्रेत वाहत आले आहे. सदरचे प्रेत काढणे कामी बचाव पथक येत असून त्यांना मदत करावी असे त्यांनी सांगितले. बचाव पथकासह सुहास डोके यांना माचणूर गावच्या स्मशान भूमी लगत असलेल्या भीमा नदी पात्रात एक स्त्री जातीचे प्रेत सायंकाळी ४.३० वाजता सापडले. मयताच्या नातेवाईकांनी मंगळवेढा पोलीसांशी संपर्क साधावा असे आवाहन केले आहे. दरम्यान हे स्त्री जातीचे प्रेत सकाळी बठाण को.प.बंधाऱ्यातून पाण्याच्या वेगाने माचणूरकडे वाहत गेले होते. याबाबचा व्हिडीओ सोशल मिडीयावर सर्वत्र व्हायरल झाला होता. सध्या भीमा नदीत उजनी धरणातून व वीर धरणातून मोठ्या प्रमाणात पाणी सोडल्यामुळे भीमा नदी काठोकाठ भरुन वाहत आहे.

## पांगरे हद्दीत अडीच लाखांचा गांजा जप्त



### तरुणास अटक; कारसह साडेदहा लाखांचा मुद्देमाल

**तभा वृत्तसेवा**
**करमाळा, दि. ३० जुलै -**

करमाळा पोलीस ठाण्याच्या पथकाने पांगरे (ता. करमाळा) गावच्या हद्दीत मोठी कारवाई केली आहे. बेकायदेशीररित्या गांजाची विक्री व वाहतूक करणाऱ्या एका तरुणाला अटक करत त्याच्याकडून २ लाख ५२ हजार ५०० रुपये किमतीचा १० किलो १०० ग्रॅम गांजा आणि ८ लाख रुपये किमतीची पजेरो स्पोर्ट्स कार, असा एकूण १०,५२,५०० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

रोहित शिवाजी केचे (वय २४, रा. गारअकोले, ता. माढा, जि. सोलापूर) या च्यावर गुन्हा दाखल केला आहे. १७ जुलै रोजी रात्री ८:५० ते १०:०० वाजण्याच्या सुमारास टेंभुर्णी ते जेऊर जाणाऱ्या रोडच्या बाजूला, पांगरे स्मशानभूमीजवळ एक संशयित इसम उभा असल्याची गोपनीय माहिती करमाळा पोलीस ठाण्याचे पोलीस उपनिरीक्षक संदीप बनकर यांना मिळाली. पोलिसांचे पथक पांगरे हद्दीत पोहोचले असता, अंधारामध्ये एक पजेरो कार उभी दिसली. पथकाने गाडीतील इसमाची चौकशी केली असता, त्याने आपले नाव रोहित केचे असल्याचे सांगितले. गाडीची झडती घेतली असता, कारमध्ये (क्रमांक एमएच-१२-केएफ -९८९९) पाच प्लास्टिकच्या पिशव्यांतून गांजा सापडला.

ही कामगिरी पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी, अप्पर पोलीस अधीक्षक विजय कबाडे आणि सहाय्यक पोलीस अधीक्षक (करमाळा उपविभाग) अंजना कृष्णा यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक रणजीत माने, सहा. पोलीस निरीक्षक दिलीप ढेरे, पो.उप.निरीक्षक संदीप बनकर, पोहेकॉ दुष्यंत ढेंबरे, पो.हे.कॉ. लोहार, पो.हे.कॉ. अलिममलिक शेख, पो.कॉ. अर्जुन गोसावी, पो. कॉ. गणेश शिंदे, पो.कॉ. रमेश फुगे, पो.कॉ. चेतन पवार आणि चा.पो.कॉ. ज्योतीराम बारकुंड यांच्या पथकाने केली.

## कोळेगांव दारूबंदी प्रकरणी ६९३ महिलांच्या सह्यांची पडताळणी



**तभा वृत्तसेवा**
**पिलीव, दि. ३० जुलै-**

माळशिरस तालुक्यातील कोळेगांव येथे दारूबंदी व्हावी, या प्रमुख मागणीसाठी गावातील तब्बल ८७० महिलांनी सह्यांचे निवेदन जिल्हाधिकारी आणि राज्य उत्पादन शुल्क विभागाला दिले होते. या निवेदनावरील सह्यांची कायदेशीर पडताळणी गुरुवारी ३० जुलै रोजी कोळेगाव ग्रामपंचायत कार्यालय येथे पार पडली. त्यामध्ये ६९३ महिलांच्या सह्यांची पडताळणी पार पडली.

अश्विनी प्रवीण सावंत यांच्या नेतृत्वाखाली ८७० महिलांनी सह्यांचे निवेदन जिल्हाधिकाऱ्यांना दिले होते. पडताळणीच्या दिवशी सकाळपासूनच ग्रामपंचायत परिसरात महिलांची उपस्थिती लक्षणीय होती. दारूबंदीच्या या लढ्यात महिलांचा उत्साह आणि संताप स्पष्टपणे दिसून येत होता. गुरुवारी सकाळी १० वाजल्यापासून सायंकाळी ४ वाजेपर्यंत सह्यांची तपासणी आणि पडताळणीचे काम सुरू होते.

प्रक्रिया पार पाडण्यासाठी राज्य उत्पादन शुल्क निरीक्षक सचिन भवड, ग्रामपंचायत अधिकारी विलास बाबर, सरपंच सुषमा धनंजय दुपडे, पोलीस पाटील बिभीषण दुपडे आदींनी काम पाहिले. सह्यांची पडताळणी पूर्ण झाल्यामुळे प्रशासन यावर काय निर्णय घेते आणि कोळेगाव पूर्णपणे दारूमुक्त कधी होते, याकडे संपूर्ण तालुक्याचे लक्ष लागले आहे.

> **ग्रामपंचायतीकडून संपुर्ण सहकार्य**
>
> दारू बंदी होण्यासाठी महिलांनी सकारात्मक प्रतिसाद देत सह्या नोंदवल्या. ग्रामपंचायत प्रशासनाच्या वतीने संपूर्ण सहकार्य करण्यात आले.
>
> **- सुषमा दुपडे,सरपंच कोळेगांव**

> **संपुर्ण दारुबंदी झाली पाहिजे**
>
> दारुमुळे अनेकांची कुटूंब उद्धवस्त झाली आहेत. ज्या कुटूंबातील सदस्य दारुमुळे दगावले आहेत त्यांचे दुःख इतरांना समजणार नाही, कोळेगांवमधून दारू पूर्णपणे बंद झाली पाहिजे.
>
> **- गौरी बेंदगुडे, महाविद्यालयीन युवती.**

## संजय गांधी निराधार योजनेचा लाभ मिळवून देऊ : रणवीर राऊत

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी दि ३० जुलै -**

संजय गांधी निराधार अनुदान योजना समितीचे अध्यक्ष ॲड. रणवीर राऊत यांच्या प्रमुख उपस्थितीत बुधवार दि. २९ जुलै रोजी तहसील कार्यालय, बार्शी येथे महत्वपूर्ण बैठक पार पडली.



संजय गांधी निराधार योजना व श्रावणबाळ राज्य निवृत्ती वेतन प्रलंबित असणाऱ्या अर्जांची छाननी करण्यासाठी ही बैठक तहसीलदार एफ.आर. शेख यांनी आयोजित केली होती.

यावेळी ॲड.रणवीर राऊत यांनी तालुक्यातील निराधार माता, भगिनी, जेष्ठ व्यक्ति यांना या योजनेचा सुलभ व सरळ लाभ मिळवून देण्यासाठी समितीच्यावतीने कार्य करण्याची विनंती सर्व सदस्य व प्रशासकीय कर्मचाऱ्यांना केली. संजय गांधी निराधार योजनेचा लाभ समाजाच्या शेवटच्या निराधार व्यक्तिंना मिळवून देण्यासाठी व पारदर्शक कारभार करण्यासाठी आम्ही सर्वजण कटिबद्ध आहोत अशा भावना व्यक्त केल्या.

यावेळी संजय गांधी निराधार योजना समितीचे सदस्य हनुमंत जाधव, संतोष कांबळे, नागनाथ आडसुळ, महेश गोरे, संतोष पाटील, अर्चना चव्हाण, राहुल जाधवर, शांतीकुमार चोबे, अविनाश वाघमोडे तसेच गटविकास अधिकारी पंचायत समिती व प्रशासकीय अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

## घोकंपट्टीला फाटा, कौशल्यावर भर

### चाटे शिक्षण समूहाने महाराष्ट्रात उभी केली आधुनिक शिक्षण प्रणाली

**तभा वृत्तसेवा**
**बार्शी, दि ३० जुलै -**

'नवीन शैक्षणिक धोरण २०२०' देशात मोठी शैक्षणिक क्रांती घडवून आणत आहे. परंतु, ग्रामीण व निमशहरी भागात डिजिटल दरी आणि पालकांची केवळ गुणांवर आधारित मानसिकता ही मोठी आव्हाने आहेत. या आव्हानांवर मात करत नवीन धोरणाची मूळ उद्दिष्टे प्रत्येक विद्यार्थ्यापर्यंत पोहोचवण्यात चाटे शिक्षण समूहाचे कार्य संपूर्ण महाराष्ट्रात अग्रधुरीचे ठरले आहे, असे प्रतिपादन चाटे शिक्षण समूह बार्शी शाखेचे संचालक प्रा. पांडुरंग घाडगे यांनी केले.

बार्शी येथे आयोजित विशेष परिसंवादात ते बोलत होते. याप्रसंगी शिक्षण क्षेत्रातील विविध आव्हानांवर आणि चाटे शिक्षण समूहाच्या सुवर्ण इतिहासावर प्रकाश टाकण्यात आला. प्रा. पांडुरंग घाडगे पुढे म्हणाले की, महाराष्ट्राच्या शैक्षणिक जडणघडणीत 'चाटे शिक्षण





समूह' ही गुणवत्तेची अखंड परंपरा म्हणून ओळखली जाते. समूहाचे संस्थापक अध्यक्ष प्रा. गोपीचंद चाटे आणि प्रा. मच्छिंद्र चाटे यांच्या दूरदृष्टी आणि अथक परिश्रमांतून हा सुवर्ण इतिहास साकारला गेला आहे. गेल्या तीन दशकांहून अधिक काळ चाटे शिक्षण समूहाने महाराष्ट्राला हजारो डॉक्टर्स, इंजिनिअर्स आणि यशस्वी उद्योजक दिले आहेत. केवळ पाठांतर करुन गुण मिळवण्यापेक्षा 'संकल्पना स्पष्ट असणे', शिस्त, सातत्य आणि नियमित परीक्षा या त्रिसूत्रीच्या जोरावर संस्थापकद्वयींनी ग्रामीण व निमशहरी भागातील उपजत प्रतिभेला जागतिक पातळीवर चमकण्याची संधी दिली. घोकंपट्टीला फाटा देत उपाय योजनावर भर दिला जात आहे. वैयक्तिक मेंटॉरशिप व शंका निरसनच्या माध्यमातून विद्यार्थ्यांची आकलन क्षमता ओळखून त्यावर वैयक्तिक लक्ष दिले जाते. नवीन अभ्यासक्रमानुसार आणि जेइइ, नीट, सीईटी यांसारख्या कठीण स्पर्धा परीक्षांसाठी समूहाने स्वतःचे अपडेटेड स्टडी मटेरियल व अचूक टेस्ट सिरीज विकसित केली आहे.

> **एनइपी २०२० आणि चाटे शिक्षण समूहाची आधुनिक सांगड**
>
> नवीन धोरणाच्या उद्दिष्टांशी सुसंगत अशी पावले चाटे शिक्षण समूहाने आधीच उचलली आहेत. समूहाचे अद्वितीय कार्य खालील प्रमुख वैशिष्ट्यांद्वारे समोर आले आहे. अत्याधुनिक डिजिटल क्लासरूम्स ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना डिजिटल दरी जाणवू नये, यासाठी सर्व वर्गांचे आधुनिक डिजिटल क्लासरूम्समध्ये रूपांतर केले आहे. ३डी ॲनिमेशन आणि ऑडिओ-व्हिज्युअल माध्यमाद्वारे क्लिष्ट विषय अत्यंत सोपे करून शिकवले जातात.

> नवीन शैक्षणिक धोरण कागदावर कितीही आदर्श असले, तरी त्याची खरी यशोगाथा ही त्याच्या प्रत्यक्ष अंमलबजावणीत आहे. प्रा. गोपीचंद चाटे व प्रा. मच्छिंद्र चाटे यांच्या ध्येयाचा वारसा पुढे नेत, महाराष्ट्रातील व विशेषतः बार्शी परिसरातील ग्रामीण भागातील एकाही विद्यार्थ्याला मार्गदर्शनाभावी व आधुनिक सोयींभावी शिक्षणापासून वंचित राहू न देणे, हीच आमची मुख्य नैतिक जबाबदारी आहे,' असे प्रा. पांडुरंग घाडगे यांनी नमूद केले.

# जुळे सोलापुरातील नाट्यगृहाचा मार्ग झाला मोकळा

**सोलापूर, दि.३० जुलै-**

जुळे सोलापुरात महानगरपालिकेच्या वतीने उभारण्यात येणाऱ्या अत्याधुनिक नाट्यगृहाचा मार्ग मोकळा झाला आहे. जागेची मालकी, सातबारा उतारा, जागेचे नाव आणि अन्य आवश्यक कागदपत्रांची पूर्तता करुन सुधारित प्रस्ताव शासनाकडे सादर करण्याची प्रक्रिया अंतिम टप्प्यात असल्याची माहिती महापौर विनायक कोंड्याल यांनी दिली.

जुळे सोलापूरसह हद्दवाढ भागातील सांस्कृतिक उपक्रमांसाठी सुसज्ज नाट्यगृहाची मागणी अनेक वर्षांपासून करण्यात येत आहे. त्यानुसार आरटीओजवळील सुमारे दोन एकर जागेवर अत्याधुनिक नाट्यगृह उभारण्याचे नियोजन करण्यात आले आहे. शासनाची मंजुरी मिळाल्यानंतर प्रत्यक्ष कामाला सुरुवात होणार आहे.

प्रारंभी ५०० आसन क्षमतेचे नाट्यगृह प्रस्तावित होते. मात्र वाढती गरज लक्षात घेऊन आसन क्षमता ७५० पर्यंत वाढविण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. नाट्यगृहात अत्याधुनिक ध्वनी व प्रकाशयोजना, सौरऊर्जा प्रकल्प, प्रशस्त वाहनतळ, व्यावसायिक गाळे, कलाकारांसाठी स्वतंत्र मेकअप रूम, सराव कक्ष आणि अन्य आधुनिक सुविधा उपलब्ध करुन देण्यात येणार आहेत.

दरम्यान, अखिल भारतीय नाट्य परिषदेचे अध्यक्ष तथा ज्येष्ठ अभिनेते प्रशांत दामले यांनी महापालिका आयुक्त डॉ.सचिन ओंबासे यांची भेट घेऊन प्रस्तावित आराखड्याबाबत सविस्तर चर्चा केली होती. आमदार सुभाष देशमुख यांच्या पुढाकाराने झालेल्या बैठकीत भविष्यातील गरजा लक्षात घेऊन नाट्यगृह अधिक भव्य, प्रशस्त आणि अत्याधुनिक करण्याच्या सूचना करण्यात आल्या.





सोलापूर : एशियाटिक सोसायटी ऑफ मुंबईचे अध्यक्ष, माजी खासदार डॉ. विनय सहस्त्रबुध्दे यांनी गुरुवारी दै.'तरुण भारत' कार्यालयास सदिच्छा भेट दिली. याप्रसंगी दै.'तरुण भारत'चे कार्यकारी संचालक तथा मुख्य समूह संपादक दिलीप पेठे आणि मुख्य संपादक प्रशांत माने यांनी त्यांचे स्वागत केले. यावेळी भारतीय जनता पार्टीच्या शहराध्यक्षा तथा नगरसेविका रोहिणी तडवळकर, नगरसेवक ज्ञानेश्वर म्याकल, राम तडवळकर, संतोष कुलकर्णी, माधव देशपांडे उपस्थित होते.

## महत्वाचे...



### गुरुशिष्य संवाद भजनातून गुरुभक्तांनी अनुभवले सद्गुरुंचे दर्शन

**सोलापूर, दि.३० जुलै-**

गुरुपौर्णिमेनिमित्त श्री दिगंबर मुनिनाथ भजनी मंडळाच्या वतीने ७० फुट रोड परिसरातील विजय नगर येथील विष्णू महाराज कारमपुरी यांच्या निवासस्थानी आयोजित केलेल्या गुरुपुजा अंतर्गत गुरुशिष्य संवाद भजनातून गुरुभक्तांनी सद्गुरुंचे दर्शन अनुभवले. प्रारंभी गुरुपताका झेंडावंदन, रुद्राभिषेक, गुरु पादपुजा करण्यात आले. विविध भजनी मंडळांनी तेलुगु, मराठी, हिंदी भक्ती व भावगीते सादर केली. महाप्रसाद वाटपाने गुरुपौर्णिमा उत्सवाची सांगता करण्यात आली. यावेळी श्रीनिवास चिलवेरी, श्रीनिवास कुसुरकर, शंकर कुडक्याल, अंबादास उसाकोयल, बालाजी कारमपुरी, सत्यनारायण जोगू, आयलय्या बोल्लू, अनिल श्रीचिप्पा, लक्ष्मण देवीदास, हरिदास बोडा, बालाजी कोटा, मुनिनाथ कारमपुरी, ज्योती चिलवेरी, आप्पा चिलवेरी, शुभम कारमपुरी, अजय कारमपुरी, रेखा आडकी, विठ्ठल कुऱ्हाडकर, श्रीनिवास बोगा, श्रीनिवास गाजूल, व्यंकटेश कारमपुरी, नरसिंग कारमपुरी, अक्षय चिलवेरी आदी उपस्थित होते.



### महापौर विनायक कोंड्याल यांनी केले राज्यपाल जिष्णू देव वर्मा यांचे स्वागत

**सोलापूर, दि.३० जुलै-**

महाराष्ट्र राज्याचे राज्यपाल जिष्णू देव वर्मा यांचे सोलापूर विमानतळावर आगमन होताच शहरवासीयांच्या वतीने महापौर विनायक कोंड्याल यांनी स्वागत केले. यावेळी पोलीस दलाकडून त्यांना शिस्तबद्ध गार्ड ऑफ ऑनर देत मानवंदना आणि सलामी देण्यात आली. यावेळी भाजपाच्या शहराध्यक्षा तथा नगरसेविका रोहिणी तडवळकर प्रशासनातील वरिष्ठ अधिकारी, पोलिस अधिकारी तसेच विविध मान्यवर उपस्थित होते.

### मरिआई यात्रेनिमित्त म्हशी पळविण्याच्या कार्यक्रमास प्रारंभ

**सोलापूर, दि.३० जुलै-**

आषाढी श्री मरिआई यात्रेनिमित्त तुळजापूर वेस येथे बलिदान चौक, तुळजापूर वेस येथे मरिआई लक्ष्मीची विधिवत पूजा करून पारंपरिक म्हशी पळविण्याच्या कार्यक्रमास उत्साहपूर्ण वातावरणात प्रारंभ झाला. या कार्यक्रमाला समाज बांधवांची मोठ्या संख्येने उपस्थिती लाभली. यावेळी गवळी समाज बांधव व मित्रपरिवाराचे उत्साहात स्वागत करण्यात आले. कार्यक्रमास गवळी समाजातील मान्यवर, समाज बांधव तसेच मित्रपरिवार मोठ्या संख्येने उपस्थित होता. पारंपरिक संस्कृती आणि सामाजिक ऐक्याचे दर्शन घडविणारा हा सोहळा उत्साहात पार पडला. यावेळी केदार जानगवळी, किसन अंजीखाणे, संतोष रानसर्जे, मनोज मलकोनाईक, शिवा भागानगरे, राजू अंजीखाणे आणि सिद्धू बडवणे यांचा समाजाच्या वतीने सत्कार करण्यात आला.

### करंजकर विद्यालयात गुरुपौर्णिमा उत्साहात

**सोलापूर दि. ३० जुलै-**

करंजकर विद्यालय येथे गुरुपौर्णिमा उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी संस्थेच्या सचिवा मधली ताई, मुख्याध्यापिका राजश्री तडकासे उपस्थित होते. सावित्रीबाई प्रतिमेचे पूजन करून श्री. पवार यांनी प्रास्ताविक केले. विद्यार्थ्यांनी गुरुपौर्णिमा निमित्त कृतज्ञता व्यक्त केले. तसेच सचिवा मधली यांनी गुरुपौर्णिमा निमित्त शुभेछा दिल्या. विद्यार्थी, विद्यार्थीनीना खाऊ वाटप करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्रीदेवी यळमेली यांनी केले. श्री. स्वामी यांनी आभार मानले.

# बनावट मद्य निर्मितीचा कारखाना उघडकीस; २ कोटीहून अधिकचा मुद्देमाल जप्त

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.३० जुलै-**

चिंचोली एमआयडीसी (ता.मोहोळ) हद्दीत बनावट देशी दारु निर्मितीचा कारखाना सुरु असल्याचे उघडकीस आले. राज्य उत्पादन शुल्क विभागाने धडक कारवाई करत २ कोटी १ लाख ४५ हजार २८५ रुपयांचा मुद्देमाल जप्त केला, अशी माहिती राज्य उत्पादन शुल्कचे अधिक्षक भाग्यश्री जाधव यांनी दिली.



या कारवाईत एकुण ४१३ बॉक्स यामध्ये ९० मिलीच्या टँगो पंच, बनावट देशी मद्याच्या ४१३०० बाटल्या, भिंगरी देशी दारु ९० मि.ली. क्षमतेच्या २००० बाटल्या एकुण २० बॉक्स, एकुण ३८९७ ब. लि. व २०० मि.ली. क्षमतेचे स्पिरीटचे ६९ बॅरेलमध्ये १३८०० लि. स्पिरीट, तयार ब्लेंड १२०० लि., बनावट प्लॅस्टीक बाटल्याचे ३२६ बॉक्स, विविध बॅन्डचे बनावट लेबल १६५०३५, विविध बॅन्डचे बनावट बुचे १३५३०००, ऑटोमॅटीक बॉटलिंग मशिन ०१, सेमी ऑटोमॅटीक बॉटलिंग मशिन ०१, स्मॉल इंजेक्ट प्रिंटर ०२, आरओ प्लांट ०५, जनरेटर ०१ व इलेक्ट्रिक मोटर ०४, टँगो बॅन्डचे रिकामे कागदी बॉक्स २९७५०, विविध कंपनीचे ०६ मोबाईल संच, बनावट देशी मद्य निर्मितीसाठी लागणारे आवश्यक इतर साहित्य, ०४ चारचाकी वाहने यात ०२ पिकअप व ०२ कार, ०३ दुचाकी वाहने अशी एकुण ०७ वाहने असा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

सदर कारखान्यासाठी एमआयडीसीमधील भाडेतत्वावर घेण्यात आलेल्या गोडावूनचा वापर करण्यात आला. त्यामुळे जागामालक यांना सहआरोपी करण्यात आले. सदर बनावट मद्याचा पुरवठा सोलापूरसह बीड, लातूर, धाराशिव करण्यात येत होता.

राज्य उत्पादन शुल्क आयुक्त डॉ.राजेश देशमुख, जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन यांनी आखलेल्या विविध विभागांच्या समन्वय अंतर्गत राज्य उत्पादन शुल्क सह आयुक्त प्रसाद सुर्वे, विभागीय उपायुक्त सागर धोमकर यांच्या निर्देशानुसार व राज्य उत्पादन शुल्कचे अधिक्षक भाग्यश्री जाधव, उपअधीक्षक सौरभ अदाटे यांच्या मार्गदर्शनाखाली निरीक्षक जे.एन. पाटील,.ए.व्ही. घाटगे, दुय्यम निरीक्षक आर.के. निंबाळकर, डी.आर. पोवार, ए.बी.सरवदे, एस.बी.सिद, एस.बी. शेळके, एस.डी. कांबळे, विकास थोरात, दिलीप सानप, जवान अनिल पांढरे, चेतन वनगुंटी, प्रशांत इंगोले, गजानन ढब्बे, कपील स्वामी, आण्णा कर्चे, स्वप्नील आरमाळ, मंगेश मारसिंग, शेरखाने, सलगर, सानप, वाघमारे, नवले आदींनी ही कामगिरी बजावली.

## ६.८० लाखांचा 34 ग्रॅम मेफेड्रोन जप्त, एकाला अटक

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.३० जुलै-**

शहर गुन्हे शाखेने ६ लाख ८० हजार रुपये किंमतीचे ३४ ग्रॅम मेफेड्रोन अंमली पदार्थ जप्त केले. जुना पुना नाका परिसरातील छत्रपती संभाजी महाराज पुतळा येथे ही कारवाई करण्यात आली. याप्रकरणी रुपेश प्रदीप थडसरे (वय-३४, रा.मित्रनगर, शेळगी, सोलापूर) यास अटक करण्यात आली.

पोलिसांच्या झडतीदरम्यान त्याच्याकडील प्लास्टिकच्या पाऊचमध्ये पांढऱ्या रंगाची संशयित पावडर आढळून आली. पोलिस आयुक्तालयाच्या फॉरेन्सिक पथकाने घटनास्थळी तपासणी केली असता ती मेफेड्रोन (एमडी) हा अंमली पदार्थ असल्याचे निष्पन्न झाले. त्याने सदरचा एमडी अंमली पदार्थ विक्रीसाठी आणल्याची कबुली दिली.

आरोपीला न्यायालयात हजर केले असता न्यायालयाने त्याला पोलीस कोठडी सुनावली असून पुढील तपास सुरु आहे. याप्रकरणी फौजदार चावडी पोलिस ठाण्यात गुन्हा रजिस्टर क्रमांक ६१५/२०२६ अन्वये एनडीपीएस कायद्याच्या कलम ८(क), २२(ब) आणि २९ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या गुन्ह्याचा तपास पोलीस उपनिरीक्षक विजय बनसुडे करत आहेत.

पोलिस आयुक्त एम. राजकुमार, पोलिस उपायुक्त डॉ.अश्विनी पाटील, सहाय्यक पोलिस आयुक्त दिलीप पवार यांच्या मार्गदर्शनाखाली शहर गुन्हे शाखेचे वपोनि अरविंद माने, सपोनि दत्तात्रय काळे, पोउनि मनोज मोरे, बापू साठे, युवराज गायकवाड, सुभाष मुंढे, सैपन सय्यद, रामेश्वर साखरे, धीरज सातपुते, अभिजित पवार, शंकर याळगी, बाळू काळे आणि मच्छिंद्र राठोड यांनी ही कामगिरी पार पाडली.

## ४० तासांच्या मध्यस्थी प्रशिक्षण कार्यशाळेचा शुभारंभ

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३० जुलै-**

मुख्य मध्यस्थी देखरेख समिती, मुंबई उच्च न्यायालय यांच्या निर्देशानुसार जिल्हा विधी सेवा प्राधिकरण यांच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या ४० तासांच्या मध्यस्थी प्रशिक्षण कार्यक्रमास शुभारंभ करण्यात आला.



सोलापूरचे प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश तथा जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे अध्यक्ष मनोज शर्मा यावेळी बोलताना म्हणाले, न्यायालयात प्रलंबित असलेले वाद मध्यस्थीच्या माध्यमातून सामोपचाराने निकाली काढणे ही काळाची गरज आहे. प्रशिक्षित मध्यस्थांची संख्या वाढल्यास पक्षकारांना जलद, सुलभ व परिणामकारक न्याय मिळण्यास मोठी मदत होईल.

याप्रसंगी MCPC, नवी दिल्ली येथील वरिष्ठ प्रशिक्षक तथा सिटी सिव्हिल जज व प्रशासकीय न्यायाधीश संजीव भालेराव, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, सोलापूरचे सचिव तथा न्यायाधीश अमोलकुमार देशपांडे तसेच सोलापूर बार असोसिएशनचे अध्यक्ष बाबासाहेब जाधव यांची प्रमुख उपस्थिती होती.

दि. ३० जुलै ते ३ ऑगस्ट २०२६ या कालावधीत आयोजित करण्यात आलेल्या या ४० तासांचे मध्यस्थी प्रशिक्षण कार्यक्रमात सोलापूर, अक्कलकोट व मोहोळ येथील ४९ ज्येष्ठ वकिलांनी सहभाग नोंदविला आहे. मध्यस्थी प्रक्रियेबाबत सखोल सैद्धांतिक व प्रात्यक्षिक प्रशिक्षण या कार्यशाळेत दिले जाणार आहे. सूत्रसंचालन राहुल बिराजदार यांनी केले, तर आभार प्रदर्शन जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे सचिव अमोलकुमार ए. देशपांडे यांनी केले.

या प्रशिक्षण कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश तथा जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे अध्यक्ष मनोज एस. शर्मा यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच सचिव अमोलकुमार ए. देशपांडे यांच्या देखरेखीखाली जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, सोलापूरच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले.

## विनयभंग प्रकरणी तीन वर्षे सश्रम कारावास

**तभा वृत्तसेवा,**
**मंगळवेढा दि.३० जुलै-**



६५ वर्षीय महिलेच्या अंगावर धावून जावून साडीचा पदर ओढून अंगाशी झोंबाझोंबी करुन विनयभंग केल्या प्रकरणात आरोपी शंकर बुरजे (रा.कुंभार गल्ली) याला मंगळवेढा न्यायालयाच्या न्यायाधीश वृषाली पाटील यांनी तीन वर्षे सश्रम कारावास व दहा हजार रुपये दंडाची शिक्षा सुनावली आहे.

पिडीत ६५ वर्षीय महिला दि.१४ मार्च २०१९ रोजी रात्री ११ वाजता घराच्या समोर बसली असता यातील आरोपीने सदर ठिकाणी येवून तुझा मुलगा भांडण करतो काय? त्याला लय मस्ती आली आहे असे म्हणत खालच्या पातळीवर शिवीगाळी करत सदर पिडीतेच्या अंगावर धावून येवून साडीचा पदर ओढून अंगाशी झोंबाझोबी करुन तिला लज्जा वाटेल असे कृत्य केल्याची फिर्यादी दाखल होती. याचा तपास तत्कालीन पोलीस उपनिरीक्षक दत्तात्रय पुजारी यांनी करुन न्यायालयात आरोपपत्र दाखल केले होते. न्यायालयात आरोपीच्या वतीने ॲड.उल्हास माने यांनी काम पाहिले. सरकारी वकील धनंजय बनसे,ॲड. अमोल क्षिरसागर,स्वप्नील अभंग यांनी बाजू मांडली.

## इंडियन ओवरसिज बँकेच्या ५१ खातेदारांवर गुन्हा दाखल

**सोलापूर, दि.३० जुलै-**

सायबर गुन्ह्यातील रक्कम स्वतःच्या खात्यावर घेऊन ती दुसरीकडे वळवून फसवणूक केल्याप्रकरणी सोलापुरातील इंडीयन ओवरसिज बँकेच्या ५१ खातेदारांवर सायबर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत सायबर पोलीस ठाण्याचे शिपाई साळुंखे यांनी फिर्याद दिली आहे.

मागील एक वर्षापासून ते आजतागायत इंडियन ओवरसिज बँकेच्या सोलापूरातील रेल्वे लाईन शाखेतील ५१ खात्यांमध्ये सायबर गुन्ह्यातील रक्कम टाकण्यात आली. त्यानंतर ती रक्कम दुसरकीडे वळवण्यात आली. या बँक खात्यांचा वापर सायबर गुन्ह्यासाठी केला.

फसवणूकीची ही रक्कम ६ लाख १७ हजार रुपये इतकी असून हा फसवणुकीचा प्रकार मागील एक वर्षापासून आज तागायत घडला असल्याचे फिर्यादीत म्हटले आहे. गुन्ह्याचा पुढील तपास फौजदार भोपळे हे करीत आहेत.

# श्री स्वामी समर्थ सेवा मंडळाच्या गुरुपौर्णिमा महोत्सवाची सांगता



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.३० जुलै-**

विजापूर रोडवरील सुंदरम नगर येथील श्री स्वामी समर्थ मंदिरात श्री स्वामी समर्थ सेवा मंडळाच्यावतीने आयोजित श्री गुरुपौर्णिमा महोत्सवाची सांगता पालखी प्रदक्षिणेने झाली. महापौर विनायक कोंड्याल यांनी स्वामींची पालखी खांद्यावर घेऊन प्रदक्षिणा घातली. यावेळी उपस्थित भक्तांनी स्वामी समर्थांचा जयघोष केला त्यामुळे वातावरण भक्तिमय झाले होते.

२६ ते २९ जुलै दरम्यान आयोजित या महोत्सवात विविध धार्मिक, आध्यात्मिक व सांस्कृतिक कार्यक्रम पार पडले. चारही दिवस भाविकांनी प्रचंड गर्दी केली होती. २९ जुलै रोजी सकाळी श्री स्वामी समर्थ महाराजांच्या मूळ मूर्तीवर रुद्राभिषेक विनय शिंदे, प्रसाद राऊत, केदारनाथ मेंढापूरकर दांपत्याच्या हस्ते करण्यात आले. यावेळी पौरोहित्य वैभव कामतकर आणि कुबेरदत्त शुक्ला या गुरुजींनी केले.

सकाळी श्री स्वामी समर्थ सारामृत पोथीचे सामूहिक पारायण रोहिणी पावडशेट्टी यांच्या मार्गदर्शनाखाली झाले. ४०० भाविक पारायणासाठी बसले होते. दुपारी महापालिकेचे सभागृह नेते नरेंद्र काळे व त्यांच्या पत्नी रजनी काळे यांच्यासह सतीश दिवेकर, अजित कुमार गुरव , निलेश झिमबल , पृथ्वी सुरवसे, सुरेंद्र चिलका यांच्या हस्ते श्रींची आरती करण्यात आली. त्यानंतर पाच हजार भाविकांनी महाप्रसाद घेतला.

रात्री महापौर विनायक कोंड्याल, महापालिका स्थायी समितीच्या सभापती रंजिता चकोते,ॲड. मिलिंद थोबडे, डॉ. लक्ष्मीकांत दामा, महापालिकेचे लेखाधिकारी रत्नराज जवळगेकर, योगी कोंडावतीन, सचिन चव्हाण, अभिषेक आपटे यांच्या हस्ते श्रींची आरती करण्यात आली. यावेळी महापौरांच्या हस्ते ॲड. थोबडे यांचा सत्कार करण्यात आला.

महोत्सवात पहिले तीन दिवस श्री गुरुलीलामृत पोथीचे सामूहिक पारायण जयश्री शिनगुडे यांच्या मार्गदर्शनाखाली झाले. आदिती भजनी मंडळाने सुरेल भजनसेवा सादर करून उपस्थित भाविकांना भक्तिरसात तल्लीन केले. मान्यवरांचे हस्ते आरती झाली. किरण जोजारे यांनी भक्ती संगीताचा कार्यक्रम तर स्वरा महिला भजनी मंडळाने भजनाचा कार्यक्रम सादर केला. त्यानंतर भारतीय शास्त्रीय नृत्यातील कुचीपुडी नृत्यांगना मायश्रीये यांनी महिषासुर मर्दिनी हे दिव्य नृत्य सादर केले

रमेश मेंढापूरकर, पंडित गायकवाड, श्रीशैल लिगाडे, रविशंकर हत्याळीकर, नागेश हत्याळीकर व स्वामी भक्तांनी परिश्रम घेतले. योगीनाथ वनारोटे यांनी सूत्रसंचालन केले.

**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून सोलापूर, धाराशिव, लातूर,संपूर्ण मराठवाडा तसेच पश्चिम महाराष्ट्र सातारा,सांगली,कोल्हापूर येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. ● प्रबंध संपादक : **विवेक कृष्णाजी घळसासी.** ● समूह मुख्य संपादक : **दिलीप यशवंत पेठे.**● मुख्य संपादक :**प्रशांत वसंतराव माने** दैनिक सोलापूर तरुण भारत रजि.नं.G2/RNP/SLP/D/32/2024-26.RNI Reg.No.46878/87. दूरध्वनी -संपादकीय-(०२१७)-२६००४९८ ● जाहिरात विभाग (०२१७)-२६००३९८. **E-mail starunbharatgmail.com.** ● **Website:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

Mr. Dilip Shivmurthi Dulange is the publisher on behalf of the Company **Solapur Tarun Bharat Media Limited.**, and Daily Solapur Tarun Bharat. We print/publish and distribute these Editions like Solapur, Dharashiv, Latur Nanded, Parbhani, Hingoli, Jalna, and Beed from Register Address 19/20, Industrial Estate, Hotgi Road, Solapur – 413003. ● **Mr. Vivek Krishnaji Ghalsasi -** Dissertation Editor / ● **Mr. Dilip Yeshwant Pethe** - Group Chief Editor ● **Mr. Prashant Vasantrao Mane** - Chief Editor, Daily Solapur Tarun Bharat Postal Register No. G2/RNP/SLP/D32/2024-26. RNI Register No. 4687/87. Editorial Department Tel. No. – 0217-2600398) **Email ID starunbharat@gmail.com** and Advertisement Department Tel. No. – 0217-2600498, ● Website: **https://dainiktarunbharat.com/**, ● Epaper: **https://epaper.dainiktarunbharat.com/.** The Editors / Directors do not necessarily agree with the views expressed in the news and articles published in this issue. (responsible as per PRB Act)

सोलापूर
# तरुण भारत
SOLAPUR TARUN BHARAT
न मे कर्मफले स्पृहा
सोलापूर | शुक्रवार, ३१ जुलै २०२६
dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com


# सहानुभुती आणि करुणेविना तंत्रज्ञानाला अर्थ नाही : राज्यपाल

**पद्मभूषण प्रा.डॉ.ज्येष्ठराज जोशी यांना मानद डी.एस्सी., पद्मश्री गिरीश प्रभुणे यांना डी.लिट.पदवी प्रदान**

**१६२ पी.एचडीधारक, ११ हजार ८५१ विद्यार्थ्यांना पदवीदान**

**विद्यापीठे राष्ट्र उभारणीची केंद्रे बनली पाहिजेत**





**तभा वृत्तसेवा-**
**सोलापूर, दि.३० जुलै-**

विद्यार्थ्यांनी नेहमी जिज्ञासू राहावे, स्वतंत्रपणे विचार करावा, उद्योजकतेचा स्वीकार करावा आणि आयुष्यभर ज्ञान संपादन करावे. तंत्रज्ञान आपले जीवन सुधारु शकते. परंतु सहानुभूती आणि करुणेविना तंत्रज्ञानाला अर्थ नाही. हे लक्षात घेत नवीन तंत्रज्ञानाचा स्वीकार करत असताना नेहमी मानवता जपावी, असा मौलिक सल्ला महाराष्ट्राचे राज्यपाल जिष्णूदेव वर्मा यांनी दिला.

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाच्या २२ व्या पदवीप्रदान समारंभात ते बोलत होते. यावेळी पद्मभूषण प्रा.डॉ.ज्येष्ठराज भालचंद्र जोशी यांना मानद डी.एस्सी. तर पद्मश्री गिरीश यशवंत प्रभुणे यांना मानद डी.लिट. पदवी देऊन सन्मानित करण्यात आले. तसेच १६२ पी.एचडीधारक, ११ हजार ८५१ विद्यार्थी असे एकूण १२ हजार १३ जणांना पदवीदान करण्यात आले.

सुवर्णपदक विजेत्यांमध्ये विद्यार्थिनींचा समावेश सर्वाधिक आहे; ही कौतुकाची बाब असल्याचे सांगून ते पुढे म्हणाले, मुलींचे हे यश महिलांचा वाढता आत्म विश्वास आणि आकांक्षांचे प्रतिबिंब आहे. शिक्षण हे सामाजिक परिवर्तनाचे शक्तिशाली साधन आहे. आजन्म शिक्षण ही यशाची गुरुकिल्ली असून शिकणे कधीही थांबवू नका, सचोटीशी कधीही तडजोड करु नका.

विद्यापीठे केवळ पदव्या देण्यापर्यंत मर्यादित न राहता ती ज्ञान, संशोधन, नवोपक्रम, उद्योजकता आणि राष्ट्र उभारणीची केंद्रे बनली पाहिजेत. तरुणांना बदलांशी जुळवून घेण्यासह बदलांचे नेतृत्व करण्यासाठीदेखील तयार केले पाहिजे. विद्यापीठांनी न्याय, समानता, सर्वसमावेशकता, पर्यावरणीय जबाबदारी आणि समाजसेवेला चालना दिली पाहिजे, असेही ते म्हणाले.



दीक्षांत मिरवणुकीच्या अग्रभागी परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ.श्रीकांत अंधारे हे ज्ञानदंड घेऊन, त्यानंतर पद्मभूषण प्रा.डॉ.ज्येष्ठराज जोशी, पद्मश्री गिरीश प्रभुणे, राज्यपाल जिष्णूदेव वर्मा, माजी खासदार डॉ.विनय सहस्त्रबुध्दे, कुलगुरु प्रा.डॉ.प्रकाश महानवर, प्र.कुलगुरु प्रा.डॉ.लक्ष्मीकांत दामा, प्रभारी कुलसचिव अतुल लकडे आणि इतर असा मिरवणुकीचा क्रम होता. कुलगुरु प्रा.डॉ.प्रकाश महानवर यांनी अहवाल वाचन केले. विनायक धुळप यांनी पद्मभूषण प्रा.डॉ. ज्येष्ठराज जोशी तर ज्योती माशाळे यांनी पद्मश्री गिरीश प्रभुणे यांच्या गौरव पत्राचे वाचन केले. डॉ.प्रशांत पवार, डॉ.शिवाजी शिंदे, डॉ.महेश खरात, डॉ.आर. एस. हिरेमठ यांनी आपापल्या शाखेच्या विद्यार्थ्यांना पदवी प्रदान करण्याची सूचना केली. यशपाल खेडकर यांनी सूत्रसंचालन केले. तेजस्विनी कांबळे यांनी आभार मानले.

### अधिसभा सदस्यांची अशीही नाराजी

प्राधिकरणातील व्यवस्थापन परिषद सदस्यांची मंचावर आणि राहिलेल्या प्राधिकरणातील सदस्यांची व्यवस्था पुढे करण्यात आली होती. परंतु आधिसभा सदस्यांच्या आसनावर सामान्य पालक व काही निमंत्रित सदस्य बसले होते. त्यांना बसण्यास जागा नसल्यामुळे आधिसभा सदस्य सुदर्शन यादव व काही सदस्यांनी चक्क खाली बसून निषेध नोंदवित नाराजी व्यक्त केली. दरम्यान, बैठक व्यवस्था सांभाळणाऱ्या कर्मचाऱ्यांनी अधिसभा सदस्यांना जागा करुन दिली.

### सुवर्णपदक विजेते व पीएचडी विद्यार्थ्यांचा हिरमोड

सुवर्णपदक विजेते व पीएचडी पदवीप्राप्त विद्यार्थी हे पाहुण्यांचे हस्ते पदक व पदवी मिळेल याची वाट पहात बसले होते. परंतु एकाही विद्यार्थ्याला पाहुण्यांच्या हस्ते पदक व पदवीही मिळाली नाही. सर्वांना स्टेजच्या खालूनच गळ्यात गोल्ड मेडल व हातात पदवी देऊन रांगेने पाठविले. पाहुण्यांच्या मागे उभा राहून ग्रुप फोटो काढून ग्रुप-ग्रुपने परत पाठविण्यात येत होते. त्यामुळे त्यांचा हिरमोड झाल्याचे दिसून आले.

### 'सोलापूर' व्यापार, उद्योग, उद्योजकतेचे केंद्र

सोलापूर हे दीर्घकाळापासून व्यापार, उद्योग आणि उद्योजकतेचे केंद्र राहिले आहे. येथील वस्त्रोद्योगाने तर देशभरात ओळख मिळवली आहे. यापुढील काळात नवोपक्रमाला प्रोत्साहन देऊन, सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योगांना प्रोत्साहन, मूल्यवृध्दी उद्योग निर्माण आणि तरुणांसाठी रोजगाराच्या अधिक संधी निर्माण करण्याची नितांत गरज आहे, असेही राज्यपाल वर्मा यांनी सांगितले.

### अनुभव केंद्रित अध्यापन पध्दतीचा अवलंब

माजी खासदार डॉ.विनय सहस्त्रबुध्दे याप्रसंगी बोलताना म्हणाले, आपली अध्ययन अध्यापन प्रक्रिया ही तक्षशिला आणि नालंदाच्या काळापासून गुरु-शिष्य संबंधांचे अधिष्ठान ठेवून विकसित झाली आहे आणि त्यातही जीवनानुभवांच्या आधारे शिक्षणावर भर दिला गेला होता. त्यामुळे आजच्या शिक्षणात अनुभव केंद्रित अध्यापन पध्दतीचा अवलंब करणे आवश्यक आहे.

---

## महत्वाचे...

### वृध्द इसमाला बेदम मारहाण

**सोलापूर, दि.३० जुलै-**

शेतीच्या वादातून काडगाव येथील एका ८० वर्षीय वृध्द इसमाला आठ-दहा जणांनी मिळून लाथाबुक्याने मारहाण करण्यात आल्याची घटना शिवाजी महाराज चौकात बुधवारी सायंकाळी घडली. रियाज बाबू पटेल (रा.काडगाव, ता.तुळजापूर, जि.धाराशिव) असे मारहाण झालेल्या वृध्द इसमाचे नाव आहे. बुधवारी सायंकाळी ४ वाजता शिवाजी महाराज चौकातील दिलखुश हॉटेलसमोर असताना त्यांना शेतीच्या वादातून शिवकुमार महांकाळ, अमोल सावंत व इतर दहा जणांनी मिळून लाथाबुक्याने मारहाण केली. त्यांना उपचाराकरिता शासकीय रुग्णालयात नातेवाईक सलाउद्दीन यांनी आज गुरुवारी दुपारी अडीच वाजता दाखल केले.



### पैशाच्या व्यवहारातून एकास मारहाण

**सोलापूर, दि.३० जुलै-**

पैशाच्या व्यवहारातून एका तरुणाला तिघा जणांनी लाथाबुक्क्यांनी मारहाण करण्यात आल्याची घटना अमराई परिसरात बुधवारी रात्री ८.३० वाजता घडली. सागर नामदेव गेजगे (वय-३२, रा.देशमुख पाटील वस्ती, आमराई, सोलापूर) असे त्या तरुणाचे नाव आहे. तो बुधवारी रात्री साडेआठ वाजता घराजवळ असताना त्याला पैशाच्या व्यवहारातून रजाक मुल्ला व इतर दोन जणांनी मिळून लाथाबुक्क्यांनी मारहाण केली. त्याला उपचाराकरिता येथील शासकीय रुग्णालयात तर मित्र प्रवीण अलकुंटे यांनी आज गुरुवारी पहाटे दाखल केले.

### साखर कारखान्याजवळ तिहेरी अपघात

**सोलापूर, दि. ३० जलै-**

ब्रेक न लागल्याने मालाची वाहतूक करणारा डंपर समोरच्या टिप्परला धडकल्याने डंपर चालक जखमी झाला. हा अपघात आज बुधवारी पहाटे ५ वा.च्या सुमारास होडगी रोडवरील शिवशाही कारखान्यासमोर घडला. सानु कुमार रझाक (वय २२ रा.होटगी ता.दक्षिण सोलापूर) असे जखमी झालेल्या ड्रायव्हरचे नाव आहे. तो पहाटेच्या सुमारास रस्ते कामाचा कच्चा माल डंपर मध्ये घेऊन साखर कारखान्याच्या पाठीमागून आसरा चौकाच्या दिशेने निघाला होता.शिवशाही जवळ कारचा अपघात झाला होता.त्यावेळी ब्रेक न लागल्याने त्याचा डंपर समोरच्या टिपरला धडकला. यात जखमी झाल्याने त्याला उपचाराकरिता येथील शासकीय रुग्णालयात मालक अर्पित गायकवाड यांनी सकाळी दाखल केले.

---

## सोलापूर शहर-जिल्ह्यात जोरदार पाऊस

### उजनी धरण वगळता इतर प्रकल्पांत अत्यल्प पाणीसाठा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३० जुलै-**

शहर आणि जिल्ह्यात गुरूवार, दि. ३० जुलै रोजी सायंकाळी ५ च्या सुमारास जोरदार पाऊस झाल्याने शेतकरी बांधवांतून समाधान व्यक्त होत आहे. दरम्यान, ज्या शेतकरी बांधवांनी गेल्या आठवड्यात खरिपाच्या पेरण्या केल्या आहेत; त्यांच्या पिकांना या पावसाचा चांगला फायदा होणार असल्याची माहिती काही शेतकऱ्यांनी दिली. दरम्यान, उजनी धरण वगळता इतर सर्व प्रकल्पात अद्यापही अत्यल्पच पाणीसाठा असून, आता मोठ्या पावसाची जिल्ह्याला गरज आहे.

उजनी धरण कार्यक्षेत्रात सध्या मुसळधार पाऊस पडू लागल्याने उजनी धरण १०० टक्के भरले असून, भीमा नदीत मोठ्या प्रमाणावर पाण्याचा विसर्ग सुरू आहे. यामुळे पंढरपूर आणि अक्कलकोट परिसरातील काही बंधारे पाण्याखाली गेले असून, प्रशासनाने नदीकाठच्या गावांना सतर्कतेचा इशारा दिला आहे. पुणे परिसरात झालेल्या मुसळधार पावसामुळे उजनी धरण पूर्ण क्षमतेने (१००%) भरले आहे. धरणातून भीमा नदीच्या पात्रात मोठ्या प्रमाणावर पाणी सोडण्यात येत आहे. पंढरपूरमध्ये पाण्याचा विसर्ग वाढल्याने जुना दगडी पूल पाण्याखाली गेला आहे. अक्कलकोट तालुक्यातील खानापूर आणि हिळ्ळी बंधाऱ्यावर पाणी आल्याने या भागातील वाहतूक विस्कळीत झाली होती.

आपत्कालीन स्थितीसाठी रेस्क्यू बोट आणि पथके तैनात करण्यात आली आहेत. गुरूवारी दिवसभर ढगाळ वातावरण होते तर सायंकाळी जोरदार पावसाचे आगमन झाले. तब्बल तासभर पावसाने हजेरी लावल्याने शहराच्या सखल भागात पाणी साचले होते. जिल्ह्याच्या काही भागात तुरळक तर काही ठिकाणी मध्यम स्वरुपाचा पाऊस पडला. आज सोलापूरमध्ये कमाल तापमान २९.१ अंश सेल्सिअस होते. तर हवेतील आर्द्रता ८४.४% पर्यंत राहील, ज्यामुळे वातावरणात गारवा जाणवेल. पावसाच्या असमतोलपणामुळे जिल्ह्यात खरिपाची सुमारे ४८ टक्के पेरणी अद्यापही अर्धवट ओलीवरच अडकली आहे.



#### ५० ते ५५ टक्केच पेरणी

जून, जुलै महिन्यात पावसाच्या अनियमितपणामुळे खरीप पेरण्यास विलंब लागला असून, आजतागायत अवघ्या ५० ते ५५ टक्केच पेरणी झाली असल्याची माहिती कृषी विभागाकडून मिळाली.

#### जुलै महिन्यात असा पडला जिल्ह्यात पाऊस

जूनमध्ये ९४ मिमीपर्यंत पाऊस यंदा पडला असून, जुलैमध्ये तर सरासरीच्या अवघा ६२.१ मिमी पाऊस नोंदला गेला आहे. या महिनाभरातील तालुकानिहाय पाऊस पहाता उत्तर सोलापूर ६३.२ मिमी, दक्षिण सोलापूर ७७.८, बार्शी १०४.८, अक्कलकोट ७९.१, मोहोळ ५१.०, माढा ५२.०, करमाळा ९१.९, पंढरपूर ६०.९, सांगोला ३८.५, माळशिरस ३०.३, मंगळवेढा ३५.४ मिमी अशी जिल्ह्यात सरासरी ६५.५ मिमी पावसाची नोंद झाली आहे. बाशी, द. सोलापूर अक्कलकोटकरमाळा हे तालुके वगळता इतर सर्व तालुक्यात अत्यल्पच पाऊस झाला आहे.

### यंदा जिल्ह्याच्या सरासरीत २९ मिमीची तफावत

सोलापूर जिल्ह्यात जुलै महिन्यात सरासरी ९४ मिमीच्या पुढे पाऊस पडत असतो. यंदा मात्र ३० जुलैपर्यंत ६२.१ मिमी इतकाच पाऊस नोंदला गेला आहे. यामुळे उजनी परिसर वगळता सोलापूर जिल्ह्यावर दुष्काळाचे सावटच आहे. जिल्ह्यातील जवळपास सर्व प्रकल्पात अत्यल्पच पाणीसाठा असून, पाणी साठवणुकीसाठी आता मोठ्या पावसाची नितांत गरज आहे. अजून मोठ्या पावसाची नक्षत्रे पुढे येणार असल्याने शेतकरी बांधव आगामी नक्षत्राच्या पावसावर भरोसा ठेवून शेतीचे नियोजन करीत असल्याचे दिसून येत आहे. काही असले तरी जून-जुलै महिन्यात कमी पाऊस पडल्याने सर्वांचीच चिंता वाढली आहे.

---

### दोन महिन्याच्या बाळाचा झोपल्या ठिकाणी मृत्यू

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.३० जुलै-**

घरामध्ये झोपल्या ठिकाणी एका दोन महिन्याच्या बाळाचा मृत्यू झाल्याची घटना शेळगी येथे गुरुवार, दि.३० जुलै २०२६ रोजी पहाटे ६ वाजता उघडकीस आली. फैसल सोहेल शेख (रा.शेळगी, सोलापूर) असे त्या बाळाचे नाव आहे.

सदर बाळ आज पहाटे आईसोबत घरात झोपला होता. पहाटे ५ वाजता बाळाने दूध पिले आणि झोपी गेले. त्यानंतर सकाळी ६ वाजता आईने बाळाला उठविण्याचा प्रयत्न केला असता तो कसल्याही प्रकारची हालचाल करीत नव्हता. बेशुध्दावस्थेत त्याला उपचाराकरिता येथील शासकीय रुग्णालयात काका शोएब शेख यांनी दाखल केले असता डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केले.

### सुनेने घेतला सासूचा चावा

**सोलापूर, दि.३० जुलै-**

घरगुती भांडणात सुनेने सासुला मारहाण करत चावा घेतल्याची घटना जुळे सोलापुरातील संतोष नगर येथे गुरुवार, दि.३० जुलै २०२६ रोजी सकाळी ८ वाजण्याच्या सुमारास घडली. भागीरथी चंद्रकांत चाबुकस्वार (वय-५०, रा.शांती इंग्लिश मीडियम स्कूलजवळ, संतोष नगर, सोलापूर) असे जखमी सासूचे नाव आहे. गुरुवारी सकाळी झालेल्या घरगुती भांडणात सून सुप्रिया चाबुकस्वार हिने सासू भागीरथी चाबुकस्वार यांना मारहाण करुन चावा घेतला. त्यांना मुलगा सिध्दाराम चाबुकस्वार यांनी शासकीय रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले.

---

## ८ पर्यावरणपूरक दाहिन्यांवर वर्षाला 1.30 कोटींचा खर्च

**कोट्यवधींची दाहिनी, चितेला मात्र गवऱ्या, लाकूडच**

**चार महिन्यांत तीन दाहिन्यांवर ११७ अंत्यसंस्कार**

**पाच दाहिन्यांमध्ये एकही वापर नाही**

**लाकूड, गोवऱ्यांसाठी १५ हजार तर विद्युत दाहिनीसाठी ५००, गॅससाठी २ हजार रुपये शुल्क**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.३० जुलै-**

वृक्षतोडीला आळा घालून धूरमुक्त व पर्यावरणपूरक अंत्यसंस्कारासाठी महानगरपालिकेने शहरात पाच गॅस आणि तीन विद्युत दाहिन्या उभारल्या आहेत. मात्र सामाजिक-धार्मिक समजुती आणि जनजागृतीच्या अभावामुळे नागरिकांकडून अद्यापही लाकूड व गौऱ्यांच्या पारंपरिक चितेलाच प्राधान्य दिले जात आहे. कोट्यवधी रुपये खर्चून उभारलेल्या दाहिन्या अनेक ठिकाणी वापराविना अक्षरशः धूळ खात पडून आहे. परिणामी, लाखो रुपयांचा खर्च करून उभारलेली यंत्रणा अपेक्षित उद्देशापासून दूर गेल्याचे दिसून येत आहे.

महानगरपालिकेने नागरिकांना पर्यावरणपूरक, धूरमुक्त आणि स्वच्छ अंत्यसंस्काराची सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी शहरातील विविध स्मशानभूमींमध्ये गॅस व विद्युत दाहिन्या उभारल्या आहेत. मात्र पारंपरिक पद्धतीने लाकूड व गौऱ्यांचा वापर करण्याची प्रथा आणि सामाजिक-धार्मिक समजुती यामुळे या सुविधांचा अपेक्षित वापर होत नसल्याचे चित्र आहे. अनेक ठिकाणी दाहिन्या असूनही नागरिक पारंपरिक चितेलाच पसंती देत आहेत. त्यामुळे पर्यावरण संरक्षणासाठी उभारलेली ही यंत्रणा केवळ नावापुरती राहण्याची शक्यता निर्माण झाली आहे. या पार्श्वभूमीवर महापालिकेसह सामाजिक व धार्मिक संस्थांनी पुढाकार घेऊन पर्यावरणपूरक अंत्यसंस्काराबाबत व्यापक जनजागृती करण्याची गरज आहे.

सोलापूर शहरातील देगाव, कारंबा नाका, पद्मशाली चौक, अक्कलकोट रोड व कुमठे येथे गॅस दाहिन्या, तर मोदी, रूपाभवानी व जुना पुना नाका येथे विद्युत दाहिन्या आहेत. तीन विद्युत दाहिन्यांच्या वीज बिलासाठी वर्षाला सुमारे ६० लाख, देखभाल-दुरुस्तीसाठी १५ लाख आणि २१ सेवकांच्या वेतनासाठी वर्षाला सुमारे ५५ लाख रुपये खर्च होतो. सर्व मिळून या व्यवस्थेवर वर्षाला सुमारे १ कोटी ३० लाख रुपये खर्च होत आहेत, असे महापालिका विद्युत विभागाचे कार्यकारी अभियंता राजेश परदेशी यांनी सांगितले. प्रिल ते जुलै २०२६ या चार महिन्यांत रूपाभवानी विद्युत दाहिनीत ३४, मोदी विद्युत दाहिनीत ८१, तर अक्कलकोट रोड गॅस दाहिनीत अवघे २ अंत्यसंस्कार झाले. उर्वरित पाच दाहिन्यांमध्ये एकही अंत्यसंस्कार झाला नाही. विशेष म्हणजे गॅस दाहिनीत एका अंत्यसंस्कारासाठी सुमारे १९ किलोचा एक सिलिंडर पुरेसा ठरतो, अशी माहिती महापालिका विद्युत विभागाचे अभियंता महादेव इंगळे यांनी दिली.

### शहरातील दाहिन्यांचे वास्तव

- आठ दाहिन्या आणि सेवक वर्गासाठी महापालिकेचा वर्षाला सुमारे १.३० कोटींचा खर्च.
- एप्रिल-जुलैदरम्यान पाच दाहिन्यांमध्ये एकही अंत्यसंस्कार झाला नाही.
- रुपाभवानी, मोदी आणि अक्कलकोट रोड दाहिन्यांवर चार महिन्यांत मिळून केवळ ११७ अंत्यसंस्कार.
- विद्युत दाहिनीचे शुल्क ५०० रुपये, गॅस दाहिनी साठी दोन हजार रुपये तर लाकूड पारंपरिक खर्च सुमारे १५ हजार रुपये.
- महापालिका, सामाजिक व धार्मिक संस्थांनी जनजागृतीसाठी पुढाकार घेण्याची गरज.

### खर्च कमी, पर्यावरणाचा फायदा अधिक

विद्युत दाहिनीचे शुल्क केवळ ५०० रुपये, तर गॅस दाहिनीचे शुल्क २ हजार रुपये आहे. पारंपरिक पद्धतीने लाकूड व गौऱ्यांचा वापर केल्यास सुमारे १५ हजार रुपये खर्च येतो. त्यामुळे आर्थिकदृष्ट्याही पर्यावरणपूरक दाहिन्या नागरिकांसाठी अधिक किफायतशीर आहेत. मात्र सामाजिक व धार्मिक समजुतींमुळे त्यांचा वापर वाढत नसल्याचे दिसते.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/



## ज्ञानामृत आनंदलहरी-१५१८

**तंव आत्मसिध्दि न ठकेचि । आणि मागुतें न येववेचि।**
**ऐसा अस्तु गेला माझारींचि ।आयुष्यभानु ।**

योगाभ्यासासाठी मन नियंत्रित करणे अत्यंत महत्वाचे असल्याचे भगवंतांनी अर्जुनाला सांगीतले. चंचल मनाला कसे नियंत्रित करावे, असे अर्जुनाने श्रीकृष्णांना विचारले असता, श्रीकृष्णांनी त्या बाबत सविस्तर विवेचन केले. विरक्ती आणि अभ्यास यांच्या मदतीने माणसाने कधीही मनाला स्वाधीन करण्याचा प्रयत्न केला नाही तर त्याला योग प्राप्त होणे अवघड असते. परंतु जो आत्मसंयमन करुन, मनाला वश करण्याचा प्रयत्न करतो, त्याला योग शास्त्रात सांगीतलेल्या उपायाने योग प्राप्त होणे शक्य असल्याचे भगवंत म्हणाले. ज्या योगाने मनाचा निग्रह होतो, अशा साधनाला, मार्गाला अगोदर अर्जुनाने प्रारंभ करावा म्हणजे त्याचे मन आपोआप ताब्यात येऊ लागेल असे भगवंतांना वाटते. मनाच्या नियंत्रणाच्या मार्गाबद्दल भगवंत बोलत असतांना अर्जुनाला एक शंका आली. ती शंका भगवंतांना विचारतांना अर्जुन म्हणाला, तंव आत्मसिध्दि न ठकेचि । आणि मागुतें न येववेचि । ऐसा अस्तु गेला माझारींचि । आयुष्यभानु । अर्जुन म्हणाला, हे गोविंदा एखादा साधक श्रध्देने योग्य परिश्रम न करता मोक्ष प्राप्ती करिता प्रयास करीत होता. इंद्रियांवर नियत्रंन करुन तो पुढे आत्मसाक्षात्काररुपी श्रध्देच्या मार्गाला लागला, परंतु आत्म साक्षात्कारा पर्यन्त पोहोचला नाही. त्यातच वैराग्यामुळे तो पुन्हा संसारातही येऊ शकला नाही. आणि अशा मध्यंतरीच्या अवस्थेतच त्याचा मृत्यू झाला तर त्याला कोणते सुख मिळाले म्हणून समजायचे ? कारण आत्मसुखही तो प्राप्त करु शकत नाही व प्रपंचसुखालाही तो मुकलेला असतो. अर्थात, तो कोणत्याही एका किना-यावर न पोहचता मध्येच अडकला जातो. म्हणजेच धड आत्मसुखात ही नाही व प्रपंचसुखातही नाही अशी अचानक पणे त्याला आलेल्या मृत्युमुळे त्याची अवस्था होते. यावर मार्गदर्शन करतांना भगवंत म्हणाले, अर्जुना अशा योग्याने इंद्रिय निग्रह करुन योगाभ्यासाच्या मार्गावरुन चालण्याची मनात खूणगाठ बांधल्याने, तो आत्मसुखाच्या मार्गावरच चालत होता. त्यामुळे मार्गावर चालण्याची निश्यचपुर्वक झालेली सुरुवातच एक प्रकारचे यश आहे. त्याच्या हातात नसलेला मृत्यू त्याला आल्याने त्याचे दोष त्याला लागत नाहीत. मृत्यूच्या कालावधीपर्यन्त तो योगाभ्यासाच्या प्रथम पायरीवर का असेना पण योगी म्हणून जगू शकला हे कांही कमी नाही. तो साम्यावस्थेच्या, समतेच्या मार्गावर धांवू लागला म्हणजेच चांगल्या सुखाच्या मार्गावर त्याचा प्रवास चालू असतांना त्याचा मृत्यू झाला असे समजायला हरकत नाही. मृत्यू हा आपल्या हातात नाही. पण अंतिम क्षणापर्यन्त चांगले वागणे एवढे तरी आपल्या हातात आहे. म्हणून आपण असा विचार करावा की, आपण आपली इंद्रिये, मन जर ताब्यात घेतली तर आपल्या हातून नको त्या गोष्टी घडत नाहीत. स्वत:चा स्वत:ला खरा परिचण होण्यासाठी मनाची एकाग्रता अत्यंत आवश्यक आहे. बाहय गोष्टी पाहण्यापेक्षा अंतर्गत बाबी पाहणे आवश्यक आहे. स्वत:ला स्वत:चा अभ्यास होण्यासाठी मनाची स्थिरता होणे गरजेचे असते. विषय वासनेत अडकलेल्या या मनाला विषयातुन बाहेर काढणे अत्यंत गरजेचे आहे. मनाला त्याच्या इच्छेप्रमाणे धावू दिले तर, आपली इंद्रिये त्याच्या मागे धावू लागतात आणि इंद्रियांकडून नको त्या गोष्टी घडू लागतात. आपण पराधीन झाल्यासारखे वागतो. म्हणून ख-या सुखासाठी, आनंदासाठी मन आणि इंद्रिये आपल्या आधीन राहतील असा आपण प्रयत्न करावा. जय राम कृष्ण हरी।



**- ज्ञानदास डॉ. विजयकुमार फड**
**मो. ९४२२२१६४४८**

## सुप्रभात

### आजचा दिवस

**वार : शुक्रवार,**
**दि. ३१ जुलै २०२६**
**विक्रम संवत् २०८३ ।**
**शके -१९४८**
**संवत्सर - पराभव**
**मास - आषाढ कृ. प्रतिपदा**
**ऋतु - वर्षा ।**
**नक्षत्र- धनिष्ठा (१९.२६)**
**योग - सौभाग्य (२३.५३)**
**करण - तैतिल (१०.०३)**
**राहू काल : शुक्रवार**
**स. १०.३० ते १२.००**

**दिनविशेष :**
**१६५७: मुघलांनी विजापूरचा कल्याणी किल्ला जिंकला.**
**१९५४: जगातील दुसऱ्या क्रमांकाचे के-२ हे शिखर प्रथमच सर करण्यात आले.**
**१९६४: रेंजर ७ या अंतराळ यानाने चंद्राचे पहिले स्पष्ट छायाचित्र टिपले.जन्म (जयंती)१८८०: प्रसिद्ध हिंदी साहित्यिक मुन्शी प्रेमचंद यांचा जन्म.**

# पोवाड्यांच्या माध्यमातून महापुरुषांच्या पराक्रमाला उजाळा

## शाहीर महोत्सवाचा सोलापुरात समारोप

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३० जुलै-**

छत्रपती शिवाजी महाराज, छत्रपती संभाजी राजे, शाहू फुले आंबेडकर, यांच्या पराक्रमाचे आणि कर्तुत्वाचे चित्र उभा करत शाहिरांनी महाराष्ट्राची ऐतिहासिक परंपरा पोवाड्याच्या माध्यमातून मांडली. महाराष्ट्र राज्य सांस्कृतिक कार्य संचालनालयाच्या वतीने तीन दिवसीय शाहिरी महोत्सवाचे आयोजन सोलापूरमध्ये हुतात्मा स्मृती मंदिरात करण्यात आले होते त्याचा समारोप बुधवारी करण्यात आला.

प्रारंभी गर्जा महाराष्ट्र माझा या राज्य गीताने सुरूवात करण्यात आली. त्यानंतर समन्वयक अमोल धाबळे यांनी प्रास्ताविक केले. तीन दिवसात राज्यातील विविध भागातील सुप्रसिध्द शिवशाहीरांनी या शाहिरी महोत्सवात येवून सहभाग घेतला आणि आपली कला सादर केली. महिला शाहीरांनीही आपली कला सादर करण्यात कुठेच कमतरता दाखवली नाही. सोलापूरसाठी या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते असेही धाबळे यांनी सांगितले. त्यानंतर शाहीर वामन बावळे यांच्या हस्ते शाहिर संतोष साळुंखे आणि त्यांचे सहकारी, शाहिर



बजरंग आंबी, शाहिर सुभाष गोरे आणि त्यांचे सहकारी यांचा सन्मान करण्यात आला. शाहिर संतोष साळुंखे यांनी शिवचरित्रावर पोवाडा आणि गर्जा महाराष्ट्र माझा हे राज्यगीत आणि शाहिर बजरंग आंबी आणि शाहिर सुभाष गोरे यांनी त्यांच्या सहकाऱ्यांसह आपल्या पहाडी आवाजात पोवाडे सादर करून रसिक श्रोत्यांची दाद मिळवली. शिवकालीन युगात मिडियाचे काम करणाऱ्या शाहिरांनी सोलापूरमध्ये तीन दिवसाच्या शाहिरी महोत्सवात शाहिरी कला जिवंत ठेवण्याचे महत्वाचे काम केले.

महाराष्ट्र राज्याचे सांस्कृतिक कार्य मंत्री ॲड.आशिष शेलार यांच्या संकल्पनेतून आणि संचालक श्रीराम पांडे यांच्या नियोजनातून हा शाहिरी महोत्सव सोलापूरमध्ये आयोजित करण्यात आलेला होता. सोमवारी या शाहिरी महोत्सवाच्या पहिल्या दिवशी शाहिर सुरज राऊळ, शाहिरा मंगल दळवी, शाहिर कल्याण काळे आणि त्यांच्या सहकऱ्यांनी तसेच दुसऱ्या दिवशी शाहिर गणेश गलांडे, शाहिरा प्रा.संगीता मावळे आणि शाहिर राजेंद्र कांबळे आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी पोवाडे आणि लोककला सादर करत गोंधळ घातला.समारोपाच्या दिवशी शिवव्याख्याते डॉ.शिवरत्न शेटे, शाहिर खाडे, पत्रकार शिवाजी सुरवसे, शंकर जाधव, रवि हलसगीकर यांनी हजेरी लावली होती.

## धनाला मर्यादा आहेत




ध्येय सुंदर असेल आणि रस्ता खडतर असेल तरी मार्गक्रमण करा.आपण ज्या मार्गावर मार्गक्रमण करत आहोत तो मार्ग जाणण्यासाठी सम्यक दर्शन हवे. सम्यक दर्शनामुळे आपण किती पाण्यात आहोत हे समजते.कोणताही निर्णय घेताना विचारपूर्वक घ्या.आपण विचार करत नाही. कृती करताना अगोदर त्या कृतीच्या परिणामांचा अभ्यास करा,विचार करा मगच कृती करा. मुळात ध्येय निवडतानाच योग्य ध्येय निवडा.लक्ष योग्य असेल आणि स्वतःवर विश्वास असेल तर आपण निवडलेल्या मार्गावर उत्तम रीतीने आपण वाटचाल करू शकतो.

या जगात धनदौलत,सोनेचांदी काहीच विश्वासार्ह नाही.विश्वासार्ह आहे ते फक्त आत्मा.आत्म्याला साक्षी ठेवून जीवनाची साधना करा. चातुर्मास म्हणजे वर्षावास. या वर्षावासात वर्षाची सुरुवात झाल्यामुळे योगी आणि भोगी दोघेही खुश होतात.या वर्षावासात सम्यक रुपी श्रावण आपल्या आंतर आत्म्यात उतरू द्या. सम्यकत्व आणि सम्यक दर्शनाची प्राप्ती आपल्याला या चातुर्मासात करून घ्यायची आहे. धन या शब्दाबद्दल बोलताना त्या म्हणाल्या, धन हे इच्छापूर्तीचे साधन नव्हे.अनुभवाअंती आपण या निर्णयापर्यंत पोहोचतो की धन हे इच्छापूर्तीचे परफेक्ट साधन नव्हे.आपल्याकडे धन असेल तर काही प्रमाणात आपल्या गरजा, इच्छा-आकांक्षा आपण पूर्ण करू शकतो.परंतु धनामुळे सर्वच इच्छा आकांक्षा पूर्ण होतीलच असे नव्हे. धनाला मर्यादा आहे.लहान मुले झोपताना एखादा मिकीमाऊस घेऊन झोपतात,त्यावर ते विश्वास ठेवतात.आपण मात्र जवळ धन बाळगून झोपतो. धनावर विश्वास ठेवतो. परंतु धन हे विश्वासार्ह आहे का? साधन आणि साधना यातील फरक समजून घ्या. उगाच अजूनच्या मागे धावू नका. जे आहे त्यात समाधानी रहा.

# रेबीजने मृत्यू प्रकरण : समर्थ स्वामीच्या कुटुंबाला मदतीसाठी मुख्यमंत्र्यांना निवेदन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३० जुलै-**

भवानी पेठेतील घोंगडे वस्ती येथील ९ वर्षीय समर्थ स्वामी याचा संशयित रेबीजमुळे झालेल्या मृत्यूच्या पार्श्वभूमीवर त्याच्या कुटुंबाला मुख्यमंत्री सहाय्यता निधीतून विशेष आर्थिक मदत मिळावी, यासाठी पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्या मार्गदर्शनाखाली आमदार देवेंद्र कोठे व महापौर विनायक कोंड्याल यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना निवेदन दिले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना निवेदन देऊन समर्थ स्वामी यांच्या कुटुंबाची हलाखीची आर्थिक परिस्थिती मांडत मुख्यमंत्री सहाय्यता निधीतून तातडीची मदत मंजूर करण्याची मागणी केली. तसेच पालकमंत्री जयकुमार गोरे यांनाही निवेदन सादर करण्यात आले असून त्यांच्या मार्गदर्शनानुसार आवश्यक कार्यवाही सुरू करण्यात आली आहे.मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्ष व धर्मादाय रुग्णालय मदत कक्षाचे कक्ष



प्रमुख रामेश्वर नाईक यांची भेट घेऊन या प्रकरणाची माहिती देण्यात आली. समर्थ स्वामी यांच्या वडिलांवर कर्करोगावरील उपचार सुरू असल्याने कुटुंबाची आर्थिक परिस्थिती अत्यंत बिकट असून मानवीय दृष्टिकोनातून तातडीने विशेष आर्थिक मदत मंजूर करावी, अशी मागणी करण्यात आली.

# गुरुपौर्णिमेनिमित्त सुधीर खरटमल यांचा सत्कार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३० जुलै-**

गुरुपौर्णिमेच्या पावन पर्वानिमित्त कार्यकर्त्यांचे मार्गदर्शक आणि निःस्वार्थ समाजसेवक सुधीरजी खरटमल यांचा मित्र परिवारातर्फे सत्कार करण्यात आला. यावेळी त्यांना गुरुवंदना देण्यात आली.

श्री, खरटमल यांनी आपल्या कर्तृत्वाने, साधेपणाने आणि निःस्वार्थ नेतृत्वातून अनेक कार्यकर्त्यांना समाजसेवेची प्रेरणा दिली आहे. त्यांचे मार्गदर्शन आम्हा सर्वांसाठी सदैव प्रेरणादायी राहील. त्यांचे व्यक्तिमत्त्व म्हणजे साधेपणा, प्रामाणिकपणा आणि कार्यकर्त्यांवरील प्रेम यांचा संगम आहे. प्रत्येक



कार्यकर्त्याला कुटुंबातील सदस्याप्रमाणे जपणारे आणि समाजसेवेला जीवनाचे ध्येय मानणारे त्यांचे कार्य प्रेरणादायी असल्याचे उपस्थित कार्यकर्त्यांनी सांगितले. यावेळी माजी नगरसेवक एन.के. क्षीरसागर, काँग्रेसचे माजी सेवादल अध्यक्ष अशोक कलशेट्टी, पत्रकार रवि मस्के, सुनील इंगळे, विठ्ठल व्हनमारे, सुरेश कुंभार, एम.डी. बिराजदार, सूर्यकांत शेरखाने, ज्ञानेश्वर सोनवणे, प्रवीण वाडे, संतोष कदम, द्वारकासदास तावनीया, रामप्रसाद शागालोलू, पुरुषोत्तम श्रीगादी, शक्ती कटकधोंड, जाविद शिकलकर, अनवर बागवान, रवि गेंट्याल, आनंद जगताप उपस्थित होते.



## ज्ञान प्रबोधन विद्यालयात एक पेड माँ के नाम उपक्रम

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३० जुलै-**

संकल्प युवा मंचच्या माध्यमातून ज्ञान प्रबोधन विद्यालय प्राथमिक शाळेत एक पेड माँ के नाम हा उपक्रम पार पडला.

कार्यक्रमाचे उद्घाटन व प्रमुख पाहुणे शंकर नरोटे व संकल्प युवा मंच फाउंडेशनचे अध्यक्ष अजयकुमार देवकते व संकल्प युवा फाउंडेशनचे सचिव संजीवनी गायकवाड व संकल्प युवा फाउंडेशनचे उपाध्यक्ष क्रांती दर्गो-पाटीलतसेच संकल्प युवा फाउंडेशनचे खजिनदार विजयकुमार देवकते उपस्थित होते. आभार मुख्याध्यापक छाया कोळेकर यांनी मानले. यावेळी शाळेचे संस्थापक सतीश दरेकर उपस्थित होते.

# एसव्हीसीएस प्रशालेत गुरुपौर्णिमा साजरी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३० जुलै-**

गुरु- शिष्याचे पवित्र व अतूट नाते समजला जाणारा गुरुपौर्णिमेचा सण एसव्हीसीएस प्रशाला एमआयडीसी येथे साजरा करण्यात आला.

प्रथम मुख्याध्यापक धनंजय नकाते यांच्या हस्ते श्री वीरतपस्वी चन्नवीर शिवाचार्य महास्वामीजी व तपोरत्न योगीराजेंद्र शिवाचार्य महास्वामीजी यांच्या प्रतिमेचे पूजन करून गुरुचरणी वंदन करण्यात आले. यावेळी उपमुख्याध्यापक सुहास काटगांव व पर्यवेक्षक केदार पटणे यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी नववी व अकरावीच्या विद्यार्थ्यांनी शिक्षकांना लेखणी व गुलाब पुष्प देऊन गुरुप्रति कृतज्ञता व्यक्त केले. सौपणी हिरेमठ या विद्यार्थिनीने गुरु- शिष्य परंपरेवर



आधारीत प्रेरणादायक विचार मांडली. मुख्याध्यापक धनंजय नकाते म्हणाले, गुरूंच्या शिकवणीमुळे विद्यार्थ्यांचे व्यक्तिमत्व घडते आणि ते समाजात आदर्श स्थान मिळवतात. त्यामुळे प्रत्येकाने गुरूंचा सन्मान राखून त्यांच्या मार्गदर्शनाचे पालन करणे आवश्यक असल्याचे सांगितले. राशी पाटणकर व श्रावणी माने यांनी सूत्रसंचालन तर रजनी जटला यांनी आभार मानले.



## स्वप्ना सादूल यांना पीएच.डी. पदवी प्रदान

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३० जुलै-**

पद्मशाली समाजातील कन्या स्वप्ना प्रज्ञेश सादूल यांनी सोलापूरातील पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाकडून पीएच.डी. पदवी प्राप्त केल्या.

स्वप्ना सादूल यांनी प्रा. डॉ. गौतम कांबळे यांच्या मार्गदर्शनाखाली इम्पॅक्ट ऑफ वेल्फेअर स्कीम्स फॉर बिडी वर्कर इन सोलापूर या विषयावर शोध प्रबंध सादर केल्या. याविषयी विद्यापीठाने मान्यता देवून त्यांना पीएच. डी. पदवी प्रदान करण्यात आले होते.

याबद्दल प्रा. डॉ. शेंडगे, प्रा. डॉ. श्रुती वडकबाळ, पद्मशाली शिक्षण संस्थेचे सचिव दशरथ गोप, ज्ञाती संस्थेचे अध्यक्ष सुरेश फलमारी यांच्यासह अनेकांनी अभिनंदन करुन कौतुक करत आहेत.

# आयुर्वेदिक उपचाराने व्यक्ती निरोगी राहू शकतो : वैद्य शर्मा

दूषित पाण्यामुळे जर काही रोगांचे लक्षण दिसू लागल्यास आयुर्वेदिक उपचाराने रोगनिवारण होऊन व्यक्ति निरोगी राहू शकतो, परंतु ही आयुर्वेदिक औषधे आयुर्वेद डॉक्टरांच्या सल्लयाने घेणे उचित आहे, असे मार्गदर्शन प्रधान वैद्य रमेश शर्मा (एम.डी.आयू.) यांनी केले आहे.

पावसाळा एक असा ऋतू आहे, ज्याची सर्वच आतुरतेने वाट बघत असतात. ३-४ महिने सतत होणाऱ्या भयंकर उकाड्यामुळे प्रत्येक जीव, प्राणीमात्र पावसाळा लवकर यावा, अशी आस लावून असतात. पावसाळा येताच सर्वच प्राणी, जीवजंतू, वृक्षवल्ली यांच्यात नवजीवन, चैतन्याचा संचार होतो. सर्वत्र दाट हिरवळ पसरलेली असते. श्रावणातील ढगाळ वातावरण आणि निसर्गसौंदर्य मनाला आनंदित करते आणि माणूस प्रफुल्लित होतो.

निसर्गाने सहा ऋतू प्रदान केले आहेत. प्रत्येक ऋतूचे महत्त्व आगळेवेगळे आहे. प्रत्येक दोन ऋतूंमध्ये संधिकाळ असतो, ज्याचे आयुर्वेदामध्ये आरोग्याच्या दृष्टीने महत्व दिले गेले आहे. ग्रीष्म, वर्षा, शरद, हेमंत, शिशिर व वसंत या सहा ऋतूत आहार-विहार कशा प्रकारे असावा, दिनचर्या, रात्रीचर्या, ऋतुचर्या यांचे नियम पालन निरोगी राहण्यासाठी कसे करावे, यांचे विस्तृत विवेचन केले आहे. या सर्व ऋतूंमध्ये पावसाळा जितका आनंददायी, मनोहारी तितकाच कधीकधी कष्टदायी सुद्धा होतो. पावसात भिजल्यावर सर्दी, पडसे, खोकला, ताप, अतिसार, मलेरिया इत्यादी रोग त्वरित उद्भवतात. या ऋतूत हवा ओलसर, दमट असल्यामुळे डास, माश्या यांचा प्रसार अधिक होतो. पाणी दूषित होऊन फळ, भाजीपाला चांगला मिळत नाही आणि त्यामुळे अनेक रोग उत्पन्न होतात. त्यात काही सामान्य रोग व त्यावरील आयुर्वेदिक उपचार खालील प्रमाणे वर्णित केले आहेत. वर्षा ऋतूत सर्वप्रथम रोगांपासून बचाव करण्याचा उपाय केला पाहिजे. त्यासाठी पावसात शक्यतो न भिजणे, भिजल्यास घरी येऊन पुन्हा स्वच्छ पाण्याने स्नान करून शरीर पुसून कोरडे करावे. घरात स्वच्छता ठेवावी, जड पदार्थ खाणे टाळावे. दिवसा झोपू नये. घराबाहेर साचलेल्या पाण्यावर, डबक्यावर कीटकनाशक औषध शिंपडावे. या सर्व उपायांनी रोगापासून बचाव होऊ शकतो. तरीही जर मिथ्या आहारविहाराने रोग निर्माण झाल्यास खालील उपचार करावे. सामान्यतः पावसाळ्यात सर्दी, पडसे, खोकला यांचा प्रकोप होतो. सर्दी झाली की काही दिवस खोकला असतोच. वारंवार शंका येणे, खाण्यात अरुची वाटणे, शरीरात (अंग) दुखणे इ. अशा अवस्थेत वैद्यनाथ लक्ष्मीविलास नारदीय १-१ टॅबलेट सकाळी-संध्याकाळी मध व अदरक रसासोबत बारीक वाटून घ्यावी. वैद्यनाथ कासामृत २-२ चमचे दिवसातून ३ वेळा घ्यावे. खोकल्याचा जोर जास्त असल्यास सितोपलादी चूर्ण अर्धा चमचा मधात मिसळून घ्यावे.

थंडी वाजून ताप सतत येत असल्यास वैद्यनाथ महासुदर्शन घन बटी १-१ टॅबलेट सकाळी-संध्याकाळी घेऊन त्यावर महासुदर्शन काढा ४-४ चमचे समभाग पाण्यासोबत जेवणानंतर घ्यावा. जेवण हलके व सुपाच्य घ्यावे. दूषित पाण्यामुळे पचनक्रिया बिघडून पातळ शौचास होते, अशा स्थितीत वैद्यनाथ संजीवनी बटी १-१ टॅबलेट दिवसातून ३ वेळा घ्यावी. पाणी उकळून प्यावे. कधीकधी आंवयुक्त शौचास होते, तेव्हा अमीबिका टॅबलेट १-१ टॅबलेट सकाळी-संध्याकाळी घेऊन त्यावर कुटजारिष्ट ४-४ चमचे समभाग पाण्यात घ्यावे. या ऋतूत सहसा पीलिया होण्याची शक्यता अधिक असते. रोग्याला भूक लागत नाही. लघवी पिवळी होते. डोळ्यात पिवळेपणा दिसतो. अशा स्थितीत वैद्यनाथ पुनर्नवादि मण्डूर २-२ टॅबलेट सकाळी-संध्याकाळी घ्यावी. वैद्यनाथ कुमार्यासृत ३-३ चमचे समभाग पाण्यासोबत सकाळी-सायंकाळी जेवणानंतर घ्यावे. अशा प्रकारे जर सावधगिरी बाळगली तर काही मर्यादे पर्यंत रोगांपासून बचाव होऊ शकतो. जर काही रोगांचे लक्षण दिसू लागल्यास वरील निर्देशित केलेल्या आयुर्वेदिक उपचाराने रोगनिवारण होऊन व्यक्ति निरोगी राहू शकते. व आनंददायी पावसाळ्याचा आनंद लुटू शकतो.

**- प्रधान वैद्य रमेश शर्मा**
**(एम. डी. आयू.)**

Customer Care No.: ८४४८४४४९३५

## दाहिन्या आधुनिक, मन मात्र परंपरेतच अडकले..! आता लोकप्रबोधन अन् कृतीची नितांत आवश्यकता




**किरण बनसोडे**
**मो. ९८२२६१६१४१**

सोलापूर महानगरपालिकेने पर्यावरण संवर्धन, वृक्षतोड कमी करणे आणि धूरमुक्त अंत्यसंस्काराची संकल्पना प्रत्यक्षात आणण्यासाठी शहरात पाच गॅस व तीन विद्युत दाहिन्या उभारल्या. या सुविधांवर वर्षाकाठी तब्बल १.३० कोटी रुपये खर्च होत आहे. मात्र चार महिन्यांच्या आकडेवारीकडे पाहिले, तर केवळ तीन दाहिन्यांवर ११७ अंत्यसंस्कार झाले, तर उर्वरित पाच दाहिन्यांचा एकदाही वापर झाला नाही. ही केवळ यंत्रणेची नव्हे, तर समाजमनाचीही वस्तुस्थिती आहे.

पारंपरिक पद्धतीने लाकूड आणि गौऱ्यांच्या चितेवर अंत्यसंस्कार करण्याची अनेक वर्षांची परंपरा आहे. धार्मिक भावना आणि सामाजिक समजुती यांचा आदर राखलाच पाहिजे. परंतु बदलत्या काळात पर्यावरणाचे वाढते प्रश्नही तितकेच गंभीर आहेत. एका पारंपरिक चितेसाठी मोठ्या प्रमाणावर लाकूड लागते, धूर निर्माण होतो आणि प्रदूषणात भर पडते. याउलट विद्युत व गॅस दाहिन्या कमी खर्चिक, जलद, स्वच्छ आणि पर्यावरणपूरक आहेत. विशेष म्हणजे, लाकूड व गौऱ्यांवर होणारा सुमारे १५ हजार रुपयांचा खर्च टाळून विद्युत दाहिनीत केवळ ५०० रुपये, तर गॅस दाहिनीत २ हजार रुपयांत अंत्यसंस्कार होऊ शकतात. आर्थिकदृष्ट्याही ही सुविधा सर्वसामान्यांसाठी लाभदायक आहे. तरीही तिचा वापर अत्यल्प आहे. याचा अर्थ सुविधा उपलब्ध करून देणे पुरेसे नाही; त्या समाजापर्यंत विश्वासाने पोहोचविणेही तितकेच आवश्यक आहे. महापालिकेने आता केवळ दाहिन्या उभारून थांबू नये. प्रत्येक स्मशानभूमीवर माहिती देणारे आकर्षक जनजागृती फलक लावले पाहिजेत. 'एक पर्यावरणपूरक अंत्यसंस्कार म्हणजे अनेक झाडांचे संरक्षण', 'धूरमुक्त अंत्यसंस्कार', 'कमी खर्च, स्वच्छ पर्यावरण, आधुनिक सुविधा' असे संदेश नागरिकांपर्यंत पोहोचले पाहिजेत. तसेच दाहिनीची प्रक्रिया, धार्मिक विधींना असलेली मान्यता, शुल्क, सुविधा आणि संपर्क क्रमांक यांची स्पष्ट माहिती फलकांवर असावी. यासोबतच सामाजिक, धार्मिक संस्था, पुरोहित, वारकरी संप्रदाय, विविध समाज मंडळे आणि पर्यावरणप्रेमी संघटनांनी पुढाकार घेत लोकप्रबोधन करणे गरजेचे आहे. धार्मिक श्रद्धेला धक्का न लावता पर्यावरणपूरक पर्याय स्वीकारणे ही काळाची गरज आहे, हा संदेश सातत्याने दिला पाहिजे. अंत्यसंस्कार करणाऱ्या कुटुंबांशी समुपदेशनाच्या माध्यमातून संवाद साधण्याचाही विचार होऊ शकतो. कोट्यवधी रुपये खर्चून उभारलेली यंत्रणा वापराविना पडून राहणे हे कोणत्याही शहरासाठी योग्य नाही. पर्यावरणाचे रक्षण, सार्वजनिक पैशांचा योग्य उपयोग आणि आधुनिक सुविधांचा स्वीकार या तिन्ही गोष्टी एकत्र साधायच्या असतील, तर व्यापक जनजागृती हाच सर्वात प्रभावी मार्ग आहे. महापालिकेने आता दाहिन्या उभारण्यापेक्षा त्या वापरल्या जातील यासाठी लोकांच्या मनात विश्वास निर्माण करणे आवश्यक आहे.पर्यावरणपूरक अंत्यसंस्कार ही केवळ सुविधा नसून, पुढील पिढ्यांसाठी निसर्गाला अबाधित राखण्यासाठी पर्यावरण रक्षणाचा कृतिशील प्रयत्न राहणार आहे.

## महत्वाचे...



### राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांचे सोलापुरात आयुक्तांकडून स्वागत

**सोलापूर, दि. ३० जुलै -**
राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांचे आज सोलापूर दौऱ्यानिमित्त सोलापूर विमानतळावर आगमन झाले. यावेळी जिल्हा प्रशासनाच्यावतीने त्यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. याप्रसंगी महानगरपालिकेचे आयुक्त डॉ. सचिन ओंबासे, सोलापूर शहर पोलिस आयुक्त एम. राजकुमार, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. प्रकाश महानवर, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुशल जैन, निवासी उपजिल्हाधिकारी अभिजित पाटील, उपविभागीय अधिकारी सदाशिव पडदुणे उपस्थित होते.



### रोटरी क्लब टेंभुर्णी अध्यक्षपदी पाटील, सचिवपदी सपाटे

**टेंभुर्णी, दि. ३० जुलै -**
रोटरी क्लब ऑफ टेंभुर्णीच्या रोटरी २०२६-२७ साठी अध्यक्षपदी रुपेश पाटील तर सचिवपदी बाळासाहेब सपाटे यांनी पदभार स्वीकारला. मावळते अध्यक्ष दीपक व्यवहारे व सचिव संतोष तांबडे तसेच संदीप मोकाशी यांनी नूतन पदाधिकाऱ्यांकडे पदभार सुपूर्द केला. रोटरी क्लबचे क्रियाशील संस्थापक सदस्य अनिल बाबर यांच्या निधनामुळे पदग्रहण कार्यक्रम साधेपणाने साजरा झाला. नूतन अध्यक्ष पपेश पाटील यांनी अनिल बाबर यांच्या स्मरणार्थ रोटरी क्लबतर्फे टेंभुर्णी शहरासाठी कायमस्वरूपी उपयुक्त ठरेल असा सामाजिक उपक्रम राबवणार असल्याचे सांगितले. रोटरी डिस्ट्रिक्ट ३१३२ चे गव्हर्नर जयेश पटेल यांच्या मार्गदर्शनाखाली वर्षभर रक्तदान शिबिरे, स्वच्छ टेंभुर्णी सुंदर टेंभुर्णी, पर्यावरण संवर्धनासाठी वृक्षारोपण आदी उपक्रम राबवणार असल्याचे सांगितले. कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून असिस्टंट गव्हर्नर रवी सुरवसे, रोटरीचे संस्थापक यशवंत हांडे, असिस्टंट गव्हर्नर महेश कोठारी, माजी अध्यक्ष वैभव गांधी, नागेश कल्याणी, संदीप जाधव, शब्बीर जहागीरदार, श्रीकांत लोंढे, मुकुंद अटकळे, रणजित बोत्रे, प्रशांत गांधी, सुदाम मस्के आदींसह अनेक सदस्य उपस्थित होते. सूत्रसंचालन संदीप मोकाशी यांनी तर आभार प्रदर्शन सचिव बाळासाहेब सपाटे यांनी केले.



### गो सन्मान अभियानतर्फे जिल्हाधिकाऱ्यांना मागण्यांचे निवेदन

**दक्षिण सोलापूर, दि. ३० जुलै -**
गो सन्मान अभियान सोलापूर जिल्ह्याच्या वतीने गोमातेला राष्ट्रमाता जाहीर करण्यासाठी जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन देण्यात आले. याप्रसंगी गो सन्मान अभियान जिल्हा संयोजक डॉ. करवा व संगमेश्वर शरणार्थी, गोशाळा महासंघ राज्य सदस्य महेश भंडारी, जिल्हाध्यक्ष ह.भ.प. ज्ञानेश्वर जोगदंड महाराज, सचिवा प्रा. उमा बिराजदार, वकील यशवंत सुर्वे, सुचित्रा गडद, धन्यकुमार पाठवा, ह.भ.प. पुष्पलता पाटील, अश्विनी बिराजदार, राजेश वडशेरला, अरुण कुलकर्णी, ह.भ.प. सुपनर, ह.भ.प. आदिनाथ भोसले महाराज, ह.भ.प. सत्तू महाराज, श्री लकीरे, श्री विजय यादव, मनोज सोळशे, देविदास मिटकरी, वारकरी गुरुकुल विद्यार्थी, रा.स्व. संघ, बजरंग दल, विश्व हिंदू परिषद आदींचे कार्यकर्ते व गोपालक, गोभक्त उपस्थित होते.

### श्री साईबाबा ट्रस्ट मार्फत गुरुपौर्णिमेचा उत्सव साजरा

**अकलूज, दि. ३० जुलै -**



अकलूज संग्राम नगर येथील श्री साईबाबा ट्रस्टमार्फत दरवर्षीप्रमाणे याही वर्षी गुरुपौर्णिमेचा उत्सव मोठ्या प्रमाणावर साजरा झाला. श्री साईबाबांच्या मूर्तीवर पहाटे अभंगानंतर दुग्धाभिषेक व पूजा ट्रस्टचे सदस्य नीरजा व अजित राखले तसेच प्राध्यापक दिपाली व रोहित कुंभार यांच्या हस्ते करण्यात आले. तत्पूर्वी पहाटे हरिपाठ व साई चरित्र वाचन झाले. दुपारी मध्यान पूजा व आरती करुन प्रसाद वाटप केले. सायंकाळी शिवशंभो भजनी मंडळाचा भजन व भारुडाचा कार्यक्रम झाला. त्यानंतर सायंकाळची आरती व नामजप केला. यावेळी ट्रस्टचे अध्यक्ष किशोरसिंह माने पाटील, सचिव राजेंद्र आर्वे, पूजा कमिटीचे अरुण राऊत, अजित माने, देवचंद ओसवाल, हनुमंत खडके, विजय टोंगळे व नागरिक उपस्थित होते. अकलूजमधील दत्त मंदिर, शंकर महाराज मंदिर, संग्राम नगर, गोंदवलेकर महाराज मंदिर लोणकर वस्ती येथील दत्त मंदिर, महर्षी शंकरराव मोहिते प्रशाला, सदाशिवराव माने विद्यालय, जिजामाता कन्या प्रशाला, शंकरराव मोहिते महाविद्यालय या ठिकाणीही गुरुपौर्णिमा साजरी झाली.

# शाळांच्या सुरक्षिततेवर थेट तपासणीचा बडगा

## उच्च न्यायालयाच्या समितीकडून अक्कलकोट तालुक्यात अचानक पाहणी

- त्रुटी तातडीने दूर करण्याचे आदेश
- जेऊरच्या जिल्हा परिषद शाळेचे विशेष कौतुक



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.३० जुलै -**
विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेसह शैक्षणिक गुणवत्तेबाबत मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने नियुक्त केलेल्या समितीने मंगळवारी भर पावसात अक्कलकोट तालुक्यातील जिल्हा परिषद व नगरपालिका शाळांची अचानक तपासणी केली. पाहणीत नगरपालिका शाळांमधील मूलभूत सुविधांच्या गंभीर त्रुटी समोर आल्या, तर जेऊर येथील जिल्हा परिषद शाळेने उत्कृष्ट शैक्षणिक गुणवत्ता आणि प्रभावी व्यवस्थापनामुळे समितीची विशेष दाद मिळवली.

जनहित याचिका क्रमांक १/२०१८ अंतर्गत शैक्षणिक गुणवत्ता, विद्यार्थ्यांची सुरक्षितता आणि विविध शासकीय योजनांच्या प्रभावी अंमलबजावणीचा आढावा घेण्यासाठी ही तपासणी करण्यात आली. समितीने तालुक्यातील तीन जिल्हा परिषद शाळा आणि चार नगरपालिका शाळांना भेट देऊन स्वच्छता, पिण्याच्या पाण्याची उपलब्धता, शाळेची सुरक्षितता, अध्यापनाचा दर्जा, प्रधानमंत्री पोषण शक्ती निर्माण योजनेची अंमलबजावणी, विद्यार्थी सुरक्षा समित्यांचे कार्य तसेच इतर मूलभूत सुविधांची सखोल पाहणी केली.

तपासणीत नगर परिषद वरिष्ठ शाळा क्र. १ आणि प्रमिलाराजे गर्ल्स स्कूल येथे स्वच्छतागृहांची अपुरी व्यवस्था, पिण्याच्या पाण्याचा अभाव, काही धोकादायक वर्ग खोल्या, संरक्षण भिंतीलगत झालेली अतिक्रमणे आणि परिसरातील अस्वच्छता समितीच्या निदर्शनास आली. या बाबी विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने अत्यंत गंभीर असल्याचे नमूद करत समितीने संबंधित नगरपालिका प्रशासनाला तातडीने आवश्यक उपाययोजना करण्याचे आदेश दिले. संबंधित अधिकाऱ्यांनी मुख्याधिकाऱ्यांशी समन्वय साधून सर्व त्रुटी त्वरित दूर कराव्यात, अशा स्पष्ट सूचना दिल्या.

दुसरीकडे, जेऊर येथील जिल्हा परिषद कन्नड-मराठी शाळेने शैक्षणिक गुणवत्ता, संगणक शिक्षण, विद्यार्थ्यांची शिस्त, प्रज्ञाशोध शिष्यवृत्ती परीक्षेची तयारी, विविध शैक्षणिक उपक्रम आणि समाधानकारक उपस्थिती यामुळे समितीवर सकारात्मक छाप पाडली. शाळेतील शिक्षक, मुख्याध्यापक आणि शाळा व्यवस्थापनाच्या कार्याचे समितीने विशेष कौतुक केले.

मात्र स्वच्छतागृहासाठी जागेची कमतरता असल्याचे निदर्शनास आल्याने ग्रामपंचायतीच्या सहकार्याने तातडीने आवश्यक सुविधा उपलब्ध करण्याच्या सूचना दिल्या. जेऊर येथील उर्दू शाळेतील भौतिक सुविधांचीही पाहणी केली. तसेच सर्व जिल्हा परिषद शाळांमध्ये प्रधानमंत्री पोषण योजनेंतर्गत विद्यार्थ्यांना दिल्या जाणाऱ्या अन्नधान्याच्या गुणवत्तेबाबत तडजोड होऊ नये, खराब धान्य तातडीने नष्ट करण्याचे निर्देश समितीने दिले. शिक्षकांनी गुणवत्तापूर्ण शिक्षणासाठी अधिक जबाबदारीने कार्य करावे, अशी अपेक्षाही व्यक्त केली.

तपासणीदरम्यान समितीचे अध्यक्ष डॉ. शब्बीर औटी, तहसीलदार जयश्री पंचे, सार्वजनिक बांधकाम विभागाचे प्रतिनिधी पी. आर. मामड्याल, पोलीस उपनिरीक्षक ती एस. व्ही. पवार, उपशिक्षणाधिकारी (माध्यमिक) प्रकाश नांगरे, प्राथमिक विभागाचे प्रतिनिधी बापूराव जमादार तसेच विविध विभागांचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

> **प्रशासनाने अधिक सतर्क राहण्याची गरज**
> उच्च न्यायालयाच्या समितीच्या या अचानक पाहणीमुळे शाळांमधील मूलभूत सुविधा, विद्यार्थ्यांची सुरक्षितता आणि शैक्षणिक गुणवत्ता या मुद्द्यांवर प्रशासन अधिक सतर्क होण्याची गरज अधोरेखित झाली आहे. विद्यार्थीकेंद्रित शिक्षण व्यवस्थेला अधिक सक्षम करण्यासाठी हा उपक्रम महत्त्वपूर्ण मानला जात आहे.



## मोडनिंब येथे श्री स्वामी समर्थ मंदिरात पाच हजार भाविकांकडून दर्शन

**तभा वृत्तसेवा,**
**मोडनिंब, दि. ३० जुलै -**
मोडनिंब (ता.माढा) येथील श्री स्वामी समर्थ मंदिरात गुरुपौर्णिमेनिमित्त विविध धार्मिक कार्यक्रम झाले.दिवसभरात सुमारे पाच हजार भाविकांनी दर्शन घेतले.

सायंकाळी सात वाजता उपविभागीय अधिकारी माढा विभाग जयश्री आव्हाड यांच्या हस्ते महाआरती झाली. यावेळी अधिकारी ठोंबरे, बनसोडे यासह श्री स्वामी समर्थ देवस्थानचे पदाधिकारी व भाविक उपस्थित होते. मंदिर समितीच्या वतीने दर्शन, महाप्रसाद व भाविकांच्या सोयीसाठी व्यवस्था केली होती. मंदिर परिसराची स्वच्छता आकर्षक फुलांची सजावट केली होती. संपूर्ण सोहळा भक्तिमय आणि उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला.

यावेळी तुळशी जप, तारक मंत्र, भजन, आरती व पालखी सोहळा मोठ्या भक्तिभावात पार पडला. श्री स्वामी समर्थ, अक्कलकोट निवासी श्री स्वामी समर्थ महाराज की जय अशा जयघोषाने मंदिर परिसर दुम दुमून गेला होता. सायंकाळी महाआरतीनंतर पालखी सोहळा मंदिर प्रदक्षिणा झाली. त्यानंतर भाविकांना महाप्रसादाचे वाटप केले. सायंकाळी महाआरती झाल्यानंतर स्वामींच्या पालखीची प्रदक्षिणा झाली. श्री स्वामी समर्थ, दिगंबरा दिगंबराच्या गजराने संपूर्ण परिसर दुमदुमून गेला होता. पालखी सोहळ्यानंतर महाप्रसादाचे वाटप करण्यात आले.

## रातंजन येथे गुरुपौर्णिमेनिमित्त नागटिळक महाराजांच्या दर्शनाला गर्दी

**तभा वृत्तसेवा**
**बार्शी, दि. ३० जुलै -**
तालुक्यातील रातंजन येथे जय महाकाली मातादेवीच्या मंदिरात गुरुपौर्णिमेला भविकांनी मोठी गर्दी होती. अशोक नागटिळक महाराजांच्या दर्शनासाठी महाराष्ट्रातील भाविकांनी मोठी गर्दी होती. प्रत्येक शिष्याने लाल काला पांढरा पोशाख घालून होम जपास सुरुवात केली. तसेच गुरुला फुलाचा हार घालून अशोक महाराजांची आरती ओवाळून गुरुपौर्णिमेच्या शुभेच्छा दिल्या. भाविकांना जेवण्याची उत्तम सोय केली होती.



सर्व शिष्यांनी पुष्पहार घालून आरती ओवाळणी गुरुचे दर्शन घेतले. अशोक महाराजांचे हजारो भविकांनी दर्शन घेतले. सोशल मिडिया आणि फोन वरुन गुरुपौर्णिमेच्या शुभेच्छा दिल्या. शिष्य आणि गुरु महत्व या कार्यक्रमातून दिसून आले.सोहळ्यासाठी आप्पासाहेब नागटिळक, बापू नागटिळक, भैरवनाथ चौधरी, स्वप्निल भालशंकर, समर्थ पुराणिक, मनोज कुलकर्णी, सूरज रसाळ, महेश जाधव, गणेश लंगोटे, समाधान डवरी, दादा लोंढे, बबन काटकर, विजय गुजर, महेश पिंपळे, किरण डोलारे, अस्मित मांजरे, बाळू जाधव, मनोज वाले व इतर लोकांनी सहकार्य केले. कार्यक्रमाच्या शेवटी महाकाली देवीची आरती करण्यात आली. भाविकांनी महाप्रसादाचा लाभ घेतला.

## मळोली परिसरात चोऱ्यांच्या घटनेत वाढ

### शेतकरी वर्ग त्रस्त; पोलिसांवर नाराजी

**तभा वृत्तसेवा,**
**वेळापूर, दि. ३० जुलै -**
मळोली (ता. माळशिरस) आणि परिसरात गेल्या दोन महिन्यांपासून चोरीच्या घटनांमध्ये वाढ झाली आहे. शेतातील विहिरींचे मोटर पंप, स्टार्टर आणि जनावरे चोरट्यांकडून लक्ष्य केली जात आहेत. वारंवार घडणाऱ्या या प्रकारांमुळे शेतकरी त्रस्त झाले असून, पोलिसांवर नाराजी व्यक्त होत आहे.

घुमरे ओढ्यानजीक असलेले शेतकरी अभिजित जाधव यांचा ७.५ एचपीचा मोटर पंप २ जून रोजी विहिरीतून चोरीला गेला होता. याबाबत वेळापूर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करूनही पोलिसांना चोरट्यांचा माग काढता आला नाही.२७ जुलै रोजी पुन्हा त्याच विहिरीतून अभिजित जाधव यांचा नव्याने बसवलेला ७.५ एचपीचा मोटर पंप चोरट्यांनी लांबवला. एकाच शेतकऱ्याचा दोन महिन्यात दोनदा मोटर पंप चोरीला गेल्याने मोठे नुकसान झाले आहे.

आठ दिवसांपूर्वी ज्ञानेश्वर जाधव यांच्या विहिरीवरील मोटर पंपाचा स्टार्टर चोरीला गेला. तसेच घुमरे ओढ्याजवळून निलेश जाधव यांच्या शेतातून चार दिवसांपूर्वी ७.५ एचपीची मोटर चोरीला गेली.



याच परिसरातून जयसिंग जाधव यांची गाय देखील चोरट्यांनी लांबवली आहे. पोलिसांनी या चोरट्यांचा तात्काळ बंदोबस्त करावा,अशी मागणी मळोली परिसरातील शेतकऱ्यांमधून होत आहे.

> **चोरीमुळे माझे मोठे नुकसान**
> ‘दोन महिन्यांत दोनदा विहिरीतील मोटर चोरीला गेल्याने माझे मोठे नुकसान झाले आहे. पोलिसांकडे रीतसर तक्रार देऊनही काहीच तपास होत नसेल तर आम्ही दाद कोणाकडे मागायची? वेळापूर पोलिसांनी या चोऱ्यांचा त्वरित छडा लावावा.
> **- अभिजित जाधव (बाधित शेतकरी, मळोली)**

## कमळे गुरुजींनी शिक्षणातून समाजविकास साधला : प्रा. डॉ. खेडकर


**तभा वृत्तसेवा,**
**दक्षिण सोलापूर, दि. ३० जुलै-**
दी. शि. कमळे गुरूजी विचारवंत होते, तसे आचारवंतही होते. त्यांनी शिक्षणाच्या माध्यमातून समाजाचा विकास साधला, असे प्रतिपादन सोलापूर येथील वक्ते प्रा. डॉ. यशपाल खेडकर यांनी केले.



ते मंद्रूप येथील संतोष भीमराव पाटील महाविद्यालयाच्या रौप्य महोत्सवी वर्षाच्या सांगता समारंभात बोलत होते. या वेळी विचारंवत नरेश बदनोरे, विश्वस्त नागेश बिराजदार, प्राचार्य डॉ. एम. एन. जगताप आदी उपस्थित होते. नरेश बदनोरे यांनी नवीन तंत्रज्ञान आत्मसात केले पाहिजे. नवनवीन पुस्तके वाचून यशाची शिखरं गाठली पाहिजेत, अहसा सल्ला तरुणांना दिला. प्रास्ताविक प्राचार्य डॉ. एम. एन. जगताप यांनी केले. प्रा.डॉ. ए. बी. तांबोळी यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. डॉ. जवाहर मोरे यांनी आभार मानले.

# महिलांसाठी कल्याण योजनांची सुवर्णसंधी

- पंचायत समितीत ३० ऑगस्टपर्यंत अर्ज करण्याचे आवाहन
- जि. प. च्या ३ कोटी २५ लाखांच्या योजनांचा ग्रामीण महिलांना थेट लाभ




**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३० जुलै-**
ग्रामीण भागातील महिलांना शासकीय योजनांचा लाभ अधिक सुलभपणे मिळावा, यासाठी जिल्हा परिषदेच्या महिला व बालकल्याण विभागाने महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. २०२६-२७ मधील विविध वैयक्तिक लाभाच्या योजनांसाठी १ ऑगस्ट ते ३० ऑगस्ट या कालावधीत अर्ज स्वीकारले जाणार आहेत. यंदा प्रथमच जिल्ह्यातील सर्व ११ पंचायत समित्यांमधूनच अर्ज सादर करण्याची सुविधा उपलब्ध करून दिली आहे. त्यामुळे लाभार्थी महिलांना जिल्हा परिषद कार्यालयात येण्याची आवश्यकता राहणार नसल्याची माहिती महिला व बालकल्याण सभापती अमृता वाघे यांनी दिली.

महिला सक्षमीकरणाला चालना देण्यासाठी महिला व बालकल्याण विभागाच्या विविध योजनांसाठी यंदा ३२५.४८ लाख रुपयांची तरतूद केली आहे. या निधीतून महिलांच्या स्वावलंबनासाठी शिलाई मशीन, पिठाची गिरणी, एमएस-सीआयटी, ब्युटी पार्लर प्रशिक्षण, कराटे प्रशिक्षण, उच्च शिक्षणासाठी आर्थिक मदत अशा योजनांची अंमलबजावणी होणार आहे. सायकल अनुदान योजनसाठी १५ लाख रुपयांची तरतूद केली आहे. अधिकाधिक विद्यार्थिनींना लाभ मिळेल.

अर्जदारांनी पंचायत समितीतील महिला व बालकल्याण विभाग किंवा बालविकास प्रकल्प अधिकारी कार्यालयात कागदपत्रांसह अर्ज सादर करावेत. ३० ऑगस्टनंतर अर्ज स्वीकारले जाणार नसल्याने मुदतीत अर्ज करण्याचे आवाहन सभापती अमृता वाघे यांनी केले आहे.

> **लाभ घेण्यासाठी अर्ज दाखल करा**
> महिलांना योजनांचा लाभ मिळवण्यासाठी जिल्हा परिषदेत येण्याची गरज भासू नये, यासाठी सर्व पंचायत समित्यांमध्ये अर्ज स्वीकारण्याची व्यवस्था केली आहे. पात्र महिलांनी मुदतीची वाट न पाहता आवश्यक कागदपत्रांसह वेळेत अर्ज करून शासनाच्या योजनांचा लाभ घ्यावा.
> **- अमृता वाघे, सभापती, महिला व बालकल्याण समिती**

> **आवश्यक कागदपत्रे**
> आधार कार्ड, रहिवासी दाखला, उत्पन्नाचा दाखला, बँक पासबुक, शाळेचा दाखला (सायकल अनुदानासाठी)

> **अर्जासाठी आवश्यक माहिती**
> **अर्ज कालावधी :** १ ऑगस्ट ते ३० ऑगस्ट
> **अर्ज स्वीकारण्याचे ठिकाण :** संबंधित तालुक्याची पंचायत समिती
> **महिला व बालकल्याण विभाग :** बालविकास प्रकल्प अधिकारी कार्यालय

CMYK

# आपला जिल्हा

**सोलापूर तरुण भारत,** सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## शिवाजी महाविद्यालयाच्या दोन विद्यार्थ्यांना सुवर्णपदक

**तभा वृत्तसेवा**
**बार्शी, दि ३० जुलै -**
येथील श्री शिवाजी महाविद्यालयाच्या मराठी विभागातील स्वाती सुरवसे -म्हेत्रे आणि जगन्नाथ शिनगारे या विद्यार्थ्यांना पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाकडून सुवर्ण पदकाने सन्मानित करण्यात आले.



महाविद्यालयातील मराठी विभागाच्या पदव्युत्तर विभागातील स्वाती सुरवसे-म्हेत्रे यांना डॉ. निर्मलकुमार फडकुले सुवर्णपदक आणि दत्तात्रय शिनगारे यांना डॉ. राजशेखर हिरेमठ यांच्या नावे दिल्या जाणाऱ्या सुवर्ण पदकाने विद्यापीठात सर्वप्रथम आल्याने राज्यपाल जिष्णुदेव वर्मा आणि उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, कुलगुरु डॉ. प्रकाश महानवर यांच्या उपस्थितीत दीक्षांत समारंभात गौरविण्यात आले.

यशाबद्दल श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष डॉ. बी. वाय. यादव, उपाध्यक्ष नंदन जगदाळे, सचिव प्रकाश पाटील, सहसचिव अरुण देबडवार, खजिनदार जयकुमार शितोळे, प्राचार्य डॉ. अब्दुल शेख, विभाग प्रमुख डॉ. बिरा पारसे आदींनी अभिनंदन केले.



### महत्त्वाचे...



## एमआयटी व्हीजीएसमध्ये गुरुपौर्णिमा सोहळा उत्साहात

**बार्शी, दि. ३० जुलै -**
गुरु-शिष्य परंपरेचे महत्त्व विद्यार्थ्यांच्या मनात रुजावे, या उद्देशाने एमआयटी व्हीजीएस शाळेत गुरुपौर्णिमा उत्साहात साजरी करण्यात आली. प्रारंभी देवी सरस्वतीचे पूजन केले. यानंतर विद्यार्थ्यांनी श्लोक पठण व विशेष परिपाठाचे सादरीकरण केले. संस्कृत श्लोकांचे अर्थासह सादरीकरण करताना विद्यार्थ्यांनी भारतीय संस्कृतीतील गुरु-शिष्य परंपरेचे महत्त्व उलगडून सांगितले. यावेळी गुरुपौर्णिमेवर आधारित भावस्पर्शी गीत व समूहनृत्य सादर करण्यात आले. मुख्याध्यापिका रेखा पाटील यांनी, गुरु हे केवळ ज्ञान देणारे नसून विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्वाला दिशा देणारे दीपस्तंभ असल्याचे सांगितले. यानंतर विद्यार्थांना गुरुमहतीवर आधारित श्लोकांची ध्वनी चित्रफीत दाखवण्यात आली.

## कर्मवीर भाऊराव पाटील विद्यालयात गुरुपौर्णिमा साजरी

**पिलीव दि. ३० जुलै-**
माळशिरस तालुक्यातील पिलीव येथील कर्मवीर भाऊराव पाटील विद्यालय व रमेश खलीपे ज्युनिअर कॉलेजमध्ये गुरुपौर्णिमा उत्साहात साजरी झाली. यावेळी मुख्याध्यापक अशोक बागल व इतर मान्यवरांच्या हस्ते प्रथम कर्मवीर अण्णा व लक्ष्मीबाई पाटील यांच्या प्रतिमेचे पूजन झाले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मुख्याध्यापक अशोक बागल होते. उपस्थित सर्व शिक्षकांचा गुरुपौर्णिमेनिमित्त विद्यार्थ्यांनी सन्मान केला. कार्यक्रमास ज्युनिअर कॉलेज विभाग प्रमुख सचिन पाटील, पावले, भंडारे, कोळेकर , पाटील, मस्के, माने, इंगळे, नवले, शिंगाडे यांच्यासह सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. पावले यांनी आभार मानले.




## चाटे कोचिंग क्लासेसमध्ये गुरुपौर्णिमा उत्साहात साजरी

**बार्शी, दि.३० जुलै -**
लायन्स क्लब बार्शी युनिकच्यावतीने बार्शी येथील चाटे कोचिंग क्लासेसमध्ये गुरुपौर्णिमा सोहळा साजरा केला. याप्रसंगी क्लासेसमधील सर्व गुरुजणांना पेन आणि नॅपकिन बुके देऊन सन्मानित करण्यात आले. प्रारंभी चाटे कोचिंग क्लासेसचे संचालक ला. पांडुरंग घाडगे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांनी जीवनात यशस्वी होण्यासाठी शिक्षकांच्या मार्गदर्शनाचा लाभ कसा घ्यावा, याविषयी कानमंत्र दिला. लायन्स क्लब बार्शी युनिकचे अध्यक्ष ला. अल्ताफ शेख यांनी लायन्स क्लबच्या जागतिक व स्थानिक सामाजिक कार्याची माहिती दिली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन सचिव ला. विराज पाटील यांनी केले. सोहळ्याला ला. पांडुरंग घाडगे, ला. अल्ताफ शेख, ला. विराज पाटील, ला. साहिल खडके, ला. संतोष जोशी यांच्यासह क्लासचे सर्व शिक्षक, शिक्षिका आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. लायन्स क्लबच्या उपक्रमाचे कौतुक होत आहे.

## अमरावती-पंढरपूर, मिरज-कलबुर्गी रेल्वे नियमित करा

**सांगोला,दि. ३० जुलै-**



आषाढी एकादशी निमित्त रेल्वे प्रशासनाने हंगामी अनारक्षित मिरज-कलबुर्गी, अमरावती-पंढरपूर-मिरज एक्सप्रेस या रेल्वे सेवा सुरु केल्या आहेत. या रेल्वेला प्रवाशांचा उत्स्फूर्तपणे प्रतिसाद मिळत आहे. त्यामुळे या रेल्वे सेवा नियमित सुरू ठेवाव्यात अशी मागणी मुंबई मध्य रेल्वेचे महाव्यवस्थापक व सोलापूरचे विभागीय व्यवस्थापक यांच्याकडे निवेदनाद्वारे सांगोल्यातील शहीद अशोक कामटे बहुउद्देशीय सामाजिक संघटनेने केली आहे. सकाळच्या सत्रात सोलापूर, अक्कलकोट, गाणगापूर जाण्याकरता कोणतीही सोय नसल्याने मिरज-कलबुर्गी अनारक्षित रेल्वे सर्व थांबे घेऊन पोहचत असल्याने व परतीच्या प्रवासात देखील ही रेल्वे सोईस्कर आहे. तसेच मिरज-न्यू अमरावती रेल्वे देखील दररोज सुरू राहावी कारण प्रवाशांना थेट सांगोला, पंढरपूर, अहिल्यानगर, मनमाड, चाळीसगाव, जळगाव, भुसावळ, शेगाव, अकोला, मुर्तीजापुर, बडनेरामार्गे अमरावतीला जाण्याची सोय होणार आहे. या गाडीमुळे कोकण, पश्चिम महाराष्ट्र, खानदेश, विदर्भ जोडला जाणार आहे, असे संघटनेने निवेदनात नमूद केले आहे.

# विठ्ठल मूर्तीवरील रासायनिक लेपनाला पुन्हा आव्हान

## वारकरी संघटनेकडून कोल्हापूर खंडपीठात याचिका

- ३ ऑगस्ट रोजी सुनावणी
- मंदिर समिती, वारकरी संघटनांचे निकालाकडे लक्ष

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.३० जुलै -**
श्री विठ्ठल-रुक्मिणी मूर्तीवर रासायनिक लेपन प्रक्रिया करण्यास पुन्हा न्यायालयीन आव्हान देण्यात आले आहे. याप्रकरणी मुंबई उच्च न्यायालयाच्या कोल्हापूर खंडपीठात वारकरी संघटनेने याचिका दाखल केली आहे. याचिकेवर ३ ऑगस्ट रोजी सुनावणी होणार आहे.

श्री विठ्ठलाच्या दर्शनासाठी वर्षभरात एक कोटीहून अधिक भाविक पंढरपुरात येतात. भाविकांकडून विठ्ठलाच्या चरणाला होणारा स्पर्श तसेच दररोज होणाऱ्या अभिषेकामुळे मूर्तीची झीज होत असल्याचे पुरातत्त्व विभागाच्या पाहणीत निदर्शनास आले आहे. मूर्तीचे संरक्षण करण्यासाठी रासायनिक लेपन प्रक्रिया करण्याचा अहवाल पुरातत्त्व विभागाने श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिर समितीला दिला होता.

या अहवालाच्या आधारे मंदिर समितीने २२ ते २४ जून दरम्यान विठ्ठल-रुक्मिणी मूर्तीवर रासायनिक लेपन प्रक्रिया करण्याचा निर्णय घेतला होता. मात्र, या प्रक्रियेला काही हिंदू संघटनांनी विरोध केला. रासायनिक लेपनाऐवजी पारंपरिक पद्धतीने लेपन करण्यात यावे, अशी मागणी करत पंढरपूर येथील प्रथमवर्ग न्यायालयात याचिका दाखल करण्यात आली. या प्रकरणात सुनावणी झाल्यानंतर प्रथमवर्ग न्यायालयाने मूर्तीवरील लेपन प्रक्रियेला स्थगिती दिली होती. त्यानंतर मंदिर समितीने जिल्हा न्यायालयात धाव घेतली. जिल्हा न्यायालयाने प्रथमवर्ग न्यायालयाने दिलेली स्थगिती उठवली. मात्र, जिल्हा न्यायालयाच्या निर्णयानंतर वारकरी संघटनेने मुंबई उच्च न्यायालयाच्या कोल्हापूर खंडपीठात याचिका दाखल केली आहे. या याचिकेवर आता ३ ऑगस्ट रोजी सुनावणी होणार आहे. वारकरी संघटनेच्या वतीने अॅड.सारंग आराध्ये काम पाहत आहेत. विठ्ठल-रुक्मिणी मूर्तीवरील लेपन प्रक्रियेबाबत कोल्हापूर खंडपीठ काय निर्णय देणार ? याकडे मंदिर समिती, वारकरी संघटना तसेच भाविकांचे लक्ष लागले आहे.

### मुर्ती लेपनाला कधी मिळणार मुहूर्त?

प्रथमवर्ग न्यायालयाने लेपनास स्थगिती दिल्यानंतर मंदिर समितीने जिल्हा न्यायालयात याचिका केली. जिल्हा न्यायालयाने स्थगिती उठवली. आता पुन्हा जिल्हा न्यायालयाच्या निर्णयाविरोधात उच्च न्यायालयात वारकरी संघटनेने याचिका दाखल केली. आता उच्च न्यायालयाचा निर्णय तरी सर्वमान्य होणार का याचिका-पुन्हा याचिका हा प्रकार चालूच राहणार असा प्रश्न निर्माण झाला आहे.

# श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिरास आषाढी यात्रेत ९ कोटींचे उत्पन्न

## मागील वर्षीपेक्षा सुमारे २ कोटी रुपयांची घट

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.३० जुलै -**
आषाढी यात्रा कालावधीत वारकरी भाविकांनी श्री विठ्ठल- रुक्मिणी मातेच्या चरणी ८ कोटी ९२ लाख रुपयांचे दान केले आहे. तसेच सोन्या चांदीचे दागिनेही अर्पण केले आहेत. मात्र यंदा गतवर्षीपेक्षा १ कोटी ९१ लाख ३६ हजार ५३ इतकी उत्पन्नात घट झाली आहे.

मंदिर समितीला लाडू प्रसाद, देणगी, भक्तनिवास, हुंडीपेटी, श्रींच्या चरणाजवळ आदी विविध देणग्यांच्या माध्यमातून उत्पन्न मिळाल्याची माहिती मंदिरे समितीचे सह अध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर यांनी दिली. यंदा आषाढी यात्रा कालावधीत दर्शन रांगेत भाविकांनी मोठ्या प्रमाणात गर्दी केली होती. भाविकांचे सुलभ जलद दर्शन होण्याच्या दृष्टीने उपाययोजना देखील मंदिर समितीने केल्या होत्या. आषाढ शुध्द ०१ (दिनांक १५ जुलै) ते आषाढ शुध्द १५ (दिनांक २९ जुलै) या कालावधीत भाविकांनी श्रींच्या चरणाजवळ ७ कोटी १४ लाख ४ हजार ७८ रुपये अर्पण, २ कोटी ९३ लाख ९७ हजार ७६ रुपये देणगी, ८३ लाख ४७ हजार रुपये लाडू प्रसाद विक्री, ४६ लाख ३१ हजार १०३ रुपये, भक्तनिवास २ कोटी ४० लाख ३२ हजार ४०२ रुपये, हुंडीपेटी १५ लाख २७ हजार ४४३ रूपये परिवार देवता तसेच ९६ लाख ७२ हजार ९३७ रुपये सोने-चांदी अर्पण केले. तसेच अगरबत्ती, चंदन खोड, चंदन पावडर, महावस्त्रे, फोटो, मोबाईल लॉकर आदी माध्यमातून ४५लाख २० हजार ४३९ इतके उत्पन्न प्राप्त झाले आहे.

गतवर्षी २०२५ च्या आषाढी यात्रेत १० कोटी ८४ लाख ८ हजार ५३१ रुपयांचे उत्पन्न मिळाले होते. या वर्षीच्या यात्रेत ८ कोटी ९२ लाख ७२ हजार ४७८ रुपयांचे उत्पन्न प्राप्त झाले आहे. मागील यात्रेच्या तुलनेत १ कोटी ९१ लाख ३६ हजार ५३/- इतकी घट झाल्याचे दिसून येत आहे.

मिळालेल्या दानातून श्री विठ्ठल रूक्मिणी मातेच्या दर्शनासाठी येणा-या वारकरी भाविकांना पुरेसा प्रमाणात सोई सुविधा उपलब्ध करून देण्याचा मंदिर समितीचा प्रयत्न राहील असे व्यवस्थापक प्रविणकुमार घम यांनी सांगीतले.

### मागील वर्षीच्या आषाढी यात्रेतील उत्पन्न

मागील वर्षी श्रींच्या चरणाजवळ ७५ लाख ५ हजार २९१ रुपये अर्पण, २ कोटी ८८ लाख ३३ हजार ५६९ रुपये देणगी, ९४ लाख ४ हजार ३४० रुपये लाडू प्रसाद विक्री, ४५ लाख ४१ हजार ४५८ रुपये भक्तनिवास, १ कोटी ४४ लाख ७१ हजार ३४८ रुपये हुंडीपेटी, ३२ लाख ४५ हजार ६२८ रूपये परिवार देवता तसेच ३ कोटी ५९ लाख ६१ हजार ७६८ रुपये सोने-चांदी अर्पण, तसेच अगरबत्ती, चंदन खोड, चंदन पावडर, महावस्त्रे, फोटो, मोबाईल लॉकर आदी माध्यमातून १२ लाख ४५ हजार ७५ रुपये व ३ इलेक्ट्रिक रिक्षा /बसचे ३२ लक्ष इतके उत्पन्न प्राप्त झाले होते.



### पदस्पर्श आणि मुखदर्शनाची आकेडवारी

यावर्षी आषाढी यात्रा कालावधीत श्री विठ्ठल-रुक्मिणी मातेचे पदस्पर्श दर्शन सुमारे ४ लाख ९५ हजार ०२२ भाविकांनी, तर मुखदर्शन सुमारे ५ लाख ४२ हजार भाविकांनी घेतल्याची माहिती मंदिर समिती प्रशासनाकडून देण्यात आली.



# हजारो भाविकांच्या उपस्थितीत महाद्वार काला

- आषाढी यात्रा सोहळ्याची सांगता; गुलाल, बुक्क्याची उधळण

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.३० जुलै -**
श्री विठ्ठलाच्या पादुकांवर गुलाल व बुक्क्याची उधळण करीत हजारो भाविकांच्या उपस्थितीमध्ये महाद्वार काला उत्साहात पार पडला. या उत्सवानंतर आषाढी यात्रेची खऱ्या अर्थाने सांगता झाली असल्याचे मानले जाते.

संत नामदेव महाराज व संत पांडुरंग महाराज हरिदास यांच्या वंशजाकडून महाद्वार काला करण्याची परंपरा आहे. गोपाळपूरचा काला झाल्यानंतर सर्व संतांच्या पालख्या पंढरीचा निरोप घेतात. यानंतर स्थानिकांचा उत्सव अर्थात महाद्वार काला करण्याची गेल्या चारशे वर्षाहून अधिक काळापासून परंपरा आहे.

परंपरेनुसार संत नामदेव महाराज यांच्या वंशजाची दिंडी हरिदास यांच्या घरी आल्यानंतर श्री विठ्ठलाच्या पादुका मदन महाराज हरिदास यांच्या मस्तकावर पुजाऱ्यांनी बांधल्या. यानंतर श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिरातील सभा मंडप येथे पाच प्रदक्षिणा झाल्यानंतर काल्याची दहीहंडी फोडण्यात आली. यावेळी श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर समितीच्या वतीने व्यवस्थापक प्रवीणकुमार घम यांनी पादुकांवर लाह्यांची उधळण केली. यानंतर हा उत्सव महाद्वार घाटावरून वाळवंटात घेऊन जातात, परंतु यंदा चंद्रभागेला पूर असल्यामुळे घाटापासूनच तो फिरविण्यात आला. तेथून माहेश्वरी धर्मशाळा, आराध्ये गल्ली, हरिदास वेस येथे परंपरेप्रमाणे दहीहंडी फोडण्यात आली. यावेळी रस्त्यावर हजारो भाविकांनी देवाच्या पादुकांचे दर्शन घेतले. गुलाल, बुक्का व फुलांची उधळण करण्यात आली.

### चारशे वर्षांपासूनची परंपरा

पंढरपूर येथील हरिदास घराण्यातील संत पांडुरंग महाराज यांना प्रत्यक्ष श्री विठ्ठलाने दर्शन देऊन आपल्या पादुका प्रसाद रूपाने दिला होत्या. गेल्या ११ पिढ्यापासून हा उत्सव सुरू आहे.

# बेकायदेशीर कुंटणखान्यावर कारवाई; मॅनेजरला अटक

## एका महिलेची सुटका

**तभा वृत्तसेवा**
**बार्शी, दि. ३० जुलै -**
बार्शी शहर पोलिसांनी बायपास रोडवरील छेडा प्लॉट परिसरातील बेकायदेशीर कुंटणखान्यावर मध्यरात्री छापा टाकला. कारवाईत पश्चिम बंगालमधील एका ३३ वर्षीय पीडित महिलेची सुटका केली. कुंटणखाना चालवणाऱ्या टोळींचा मॅनेजर सादिक युसुफ सय्यद याला रंगेहाथ अटक केली.

पोलिसांनी या कारवाईत घटनास्थळावरुन रोख रक्कम, मोबाईल आणि ऑनलाईन क्यूआर कोड स्कॅनरसह एकूण २१ हजार ३० रूपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. सोलापूर ग्रामीण पोलीस दलाचे पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी, अप्पर पोलीस अधीक्षक विजय कबाडे आणि उपविभागीय पोलीस अधिकारी सुहास जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली ही कारवाई पार पडली.

बार्शी शहर पोलीस निरीक्षक गणेश कुंभार यांना मिळालेल्या गुप्त माहितीनुसार, त्रिवेणी मंगल कार्यालयामागे, छेडा प्लॉट, बायपास रोड येथे मनीषा राऊत नावाची महिला आपल्या घरात कुंटणखाना चालवत असल्याची माहिती मिळाली होती. तेथे परराज्यातील महिलांना कामाचे आमिष दाखवून आणून त्यांच्याकडून सक्तीने देहविक्री करुन घेतली जात होती.

छाप्यांच्या वेळी घटनास्थळी उपस्थित असलेला कुंटणखान्याचा मॅनेजर सादिक युसुफ सय्यद, (वय २५, रा. बारंगुले प्लॉट, बार्शी) याला पोलिसांनी ताब्यात घेतले. त्याच्याकडून रोख रक्कम, ग्राहकांशी संपर्कासाठी वापरले जाणारे मोबाईल फोन आणि पैसे स्वीकारण्यासाठीचा ऑनलाईन क्यूआर कोड स्कॅनर जप्त केला.

जप्त मुद्देमालाची एकूण किंमत २९ हजार ३० रुपये आहे. या प्रकरणी बार्शी शहर पोलीस ठाण्याचे अंमलदार पोकॉ बाळकृष्ण मुदाळ यांचा फिर्यादीवरुन गुन्हा नोंदवला आहे. आरोपींविरुद्ध अनैतिक व्यापार प्रतिबंध अधिनियमान्वये गुन्हा दाखल केला आहे.

कारवाई पोलीस निरीक्षक गणेश कुंभार यांच्या नेतृत्वाखाली पार पडली. त्यांच्यासोबत पोलीस उपनिरीक्षक अभय माकणे, सापोफौ अजित वरपे, पोहे प्रविण साठे, पोहे कोतवाल, पोशि अंकुश जाधव, पोशि कादर तांबोळी, पोशि सचिन देशमुख, पोशि बाळकृष्ण मुदाळ, पोशि रमेश मस्के, पोशि अवि पवार, पोशि राहुल उदार, पोशि अविज शेख, पोशि राऊत आणि पोशि प्रल्हाद अकुलवार यांचा समावेश होता. पीडित महिलेला वैद्यकीय तपासणीसाठी पाठवले आहे. प्रकरणाचा पुढील तपास बार्शी शहर पो

# 'डायल १०८' ठरली जीवनदायी

## आषाढी वारी काळात १२ हजार १७ रुग्णांना दिली सेवा

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर,दि.३० जुलै -**
आषाढी यात्रा कालावधीत वारकरी, भाविकांना तात्काळ आरोग्य सुविधा उपलब्ध होण्यासाठी पालखी मार्ग व पंढरपूर शहरात डायल १०८ च्या एकूण ११० रुग्णवाहिका कार्यरत होत्या. त्यासाठी ईओसी (कंट्रोल रुम) कक्ष तयार केले होते. त्याद्वारे पंढरपूरातील सर्व भाविकांना २४ तास मोफत सेवा दिली गेली.




यात्रा कालावधीत गर्दी मोठ्या प्रमाणात असल्याने मोबाईल नेटवर्कला अडथळे वारंवार येत असतात. त्या पार्श्वभुमीवर या वर्षी सेवा लवकरात लवकर मिळावी, यासाठी २ जी मोबाईल व वॉकी टॉकीची सुविधा सर्व रुग्णवाहिकामध्ये उपलब्ध करुन दिली होती. पंढरपूरात अद्ययावत असणारी कंट्रोल रुम वॉकीटॉकी सुविधा, जिओ मॅपिंग या सर्व गोष्टीमुळे १०८ रुग्णवाहिका वारकऱ्यांसाठी जीवनदायी ठरली.

भाविकांना आरोग्य सेवा देण्यासाठी जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. वर्षा डोईफोडे बीव्हीजी ग्रुप चे सीईओ डॉ. ज्ञानेश्वर शेळके व डॉ किशोर देव यांच्या मार्गदर्शनाखाली १०८ रुग्णवाहिकेचे नियोजन केले होते.

आषाढी यात्रेचा सांगता समारोप दि. ३०जुलै रोजी एकात्मिक संनियंत्रण कक्ष, जुने एस.टी स्टॅन्ड येथे करण्यात आला.

वारीमध्ये काम करणाऱ्या सर्व डॉक्टर व पायलट व कंट्रोल रुममधील सर्व कर्मचाऱ्यांचा प्रशासनाकडून सन्मान करण्यात आला. समारंभास मुख्याधिकारी महेश रोकडे, जिल्हा नगर प्रशासन अधिकारी अशिष लोकरे, उपजिल्हा रुग्णालयाचे वैद्यकीय अधिक्षक डॉ.विजयकुमार सरडे, तालुका वैद्यकीय अधिकारी डॉ.एकनाथ बोधले, आयसीयु नोडल अधिकारी डॉ. महेश सूडके, सोलापूर जिल्हा व्यवस्थापक डॉ.अनिल काळे, डॉ.कौस्तुभ घाटोळे, सुनील चव्हाण, दिलीप शिंदे, युवराज वाघ तसेच १०८ वरील काम करणारे डॉक्टर व ड्रायव्हर उपस्थित होते.

### ९२३ भाविकांना अत्यावश्यक सेवा

यात्रा काळात यावर्षी गंभीर स्वरुपाच्या ९२३ रुग्णांना व किरकोळ आजार असणाऱ्या ११ हजार ९४ रुग्णांना सेवा देण्यात आली. एकूण १२ हजार १७ रुग्णांनी १०८ या मोफत रुग्णवाहिकेतून सेवा देण्यात आली. एकात्मिक संनियंत्रण कक्षातून पोलिस प्रशासनाच्या समन्वयातून वारकरी, भाविकांना तात्काळ आरोग्य सुविधा मिळण्यासाठी 'एआय' तंत्रज्ञानाचा वापर करुन ज्याठिकाणी भाविकाला रुग्णवाहिकेची आवश्यकता आहे त्याठिकाणी तात्काळ रुग्णवाहिका पोहोचण्यात आली.